आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, २३ जून २०२४




# गझलसम्राट मदन मोहन आणि लता दीदी

आधुनिक केसरी

**25 वर्षाहून अधिक काळ चित्रपट सृष्टीत मोलाचे योगदान देणाऱ्या संगीतकार मदन मोहन यांना 25 जूनला शंभर वर्षे होत आहेत. चित्रपट संगीत रसिकांमध्ये गझल सम्राट नावाने ओळखला जाणाऱ्या मदन मोहन यांनी 1950 ते 75 सुमारे अडीच दशकात चित्रपटात गझलांना प्रस्थापित करून महत्त्वाची कारकीर्द केलेली आहे.**

गझल गायनासाठी त्यांची पहिली पसंत लतादीदी होत्या. दोघांनी मिळून चित्रपटसृष्टीला एकाहून एक सुंदर गझला दिल्या आहेत. मदन मोहन यांनी चित्रपटातील प्रसंगाला अनुरूप चाल आणि त्या चालीला अनुरूप आवाज हे एकच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून काम केले. 'अदालत'' चित्रपटात एकापेक्षा एक सुंदर गझल रचना करून त्यांनी इतिहास रचला. नर्गिस, प्रदीप कुमार सारखे कसलेले अभिनेते, लतादीदींचा आवाज आणि मदन मोहनचे संगीत, प्रत्येक गझल त्या- त्या प्रसंगाशी अक्षरशः एक जीव झालेली वाटते. 'जाना था हमसे दूर' शब्द उच्चारताना दूर गेलेल्या व्यक्तीचा निर्माण झालेला आभास अप्रतिम असाच आहे. हे कसब मदन मोहन यांनी उत्कृष्ट रीतीने प्रदर्शित केले आहे. लतादीदींनी तितक्याच भावूकतेने ही गझल गायली आहे. त्यांच्या आवाजातील आक्रोशातून प्रतारणेचे त्यांना झालेले दुःख सुंदरपणे व्यक्त झाले आहे आणि त्यामुळे ही गझल ऐकणाऱ्याच्या मनात घर करून बसते.




डॉ. नीता पांढरीपांडे

संपर्क क्र. 7659064555


चित्रपटातील दुसरी गझल 'उनको ये शिकायत है कि हम कुछ नही कहते' म्हणताना दीदींच्या आवाजातून त्यातील सरळ सोप्या शब्दातून व्यक्त होणारे हृदयस्पर्शी भाव निर्माण होतात. 'घरसे चले थे हम तो खुशी की तलाश मे, गम राहो मे खडे थे वही साथ हो लिये' म्हणताना दीदींच्या आवाजातील दर्द, मनोव्यथा, वेदना माणूस अनुभवतो. दुसऱ्या कोणत्याही आवाजात या गझलांची कल्पना देखील करता येत नाही. कोणत्याही रसातील गाण्याला संगीत देताना गाण्यातील त्या त्या रसाचा पूर्ण परिपोष साधलेला मदन मोहन यांच्या संगीतात आढळतो. त्यांच्या प्रत्येक संगीतातील स्वर कानाची ओंजळ करून त्यात साठवावा असाच आहे. याच चित्रपटातील आणखी एक गझल 'युं हसरतों के दाग' मधील खुद दिल की दिल से बात हुई और रोज लिए,म्हणताना दीदींच्या आवाजातील दुःख, वेदना माणूस अनुभवतो. प्रेमात अशी वेळी आली आहे की स्वतःशीच बोलायचं,, रडायचं... आनंद शोधायला निघाले पण वाटेवरील दुःखच माझ्याबरोबर चालू लागलं. गप्प राहून दुःख सोसावं म्हटलं तरी लोकांनी गप्प का? म्हणून भांडावून सोडले. प्रियकराच्या सुखासाठी, त्याच्या आनंदासाठी प्रेयसी काट्यावर झोपायला तयार आहे. या भावना व्यक्त करताना दीदींच्या गळ्यातून निघालेला प्रत्येक शब्द जवळचा वाटतो. जे काही मनातून उमलून येते ते हृदयाला स्पर्श करते. ।पूर्वी एकाच चित्रपटात अशा अनेक सुंदर गझल रचना कधीच आल्या नव्हत्या. एक वेगळेच वलय आणि प्रसिद्धी या चित्रपटाने संगीतकार मदन मोहन यांना मिळवून दिली. या गझलांमधून संगीतकाराच्या सृजनक्षमतेने चकित व्हायला होतं. गझलेचं सौंदर्य अतिशय नजाकतीने खुलवून मदन मोहन यांनी आपली एक वेगळी जागा निर्माण केली आहे.


मदन मोहनमध्ये शब्दांच्या आधारे आशयाचे विविध तरंग निर्माण करण्याची विलक्षण क्षमता होती. त्यांच्या रचनेत गाण्याच्या आशयाबरोबर संगीत रचना हातात हात घालून आपले अस्तित्व दाखवते, म्हणूनच दोघांचा फार सुरेख मेळ घालून गाणे जेंव्हा रसिकांसमोर येते तेंव्हा रसिक त्या गाण्यात एकरूप होतो. ते गाणे त्यांच्या हृदयापर्यंत पोहोचते. मदन मोहन यांनी आपल्या संगीताद्वारे गझलचे पावित्र जपले आणि गझलला एक नवीन आयाम दिला. अदालत, अनपढ, गझल, चित्रपटांत त्यांनी आपल्या संगीतातील गझलाचा ठसा उमटविला आणि आपल्या प्रतिभेचे मनोज्ञ दर्शन घडवले.

मदन मोहनचे उर्दू भाषेवर प्रभुत्व होते, त्यामुळे त्यांनी दिलेल्या संगीताच्या चालीवर उर्दू संगीताचा बाज होता. त्यांच्या चाली अत्यंत कठीण असत. दीदींच्या शब्दार्थाच्या पलीकडील तरल संवेदनेच्या भावी विश्वास नेणाऱ्या अलौकिक सुरांसाठी मदन मोहन गझलांना कठीण चाली लावीत आणि लावलेल्या चालीतील बारकावे समजून घेऊन लतादीदी पूर्ण ताकदीने गात असत. अशीच एक 'वह कौन थी' चित्रपटातील 'जो हमने दास्ता अपनी सुनाई, आप क्यूँ रोये' विरह भावना व्यक्त करणारी ही गझल सुरांची यात्रा मनात कालवा कालव करून जाते. गाण्याचे सूर थेट काळजात घुसतात. आत्मिक संघर्ष हाच या गझलेचा प्राण आहे. गाण्यातील भावना रसिकां पर्यंत पोहोचवण्याचे अचूक काम मदन मोहन करतात. चित्रपट कथेशी एकरूप होऊन गाण्याच्या प्रकृतीनुसार चपखल चाली बांधण्यात ते माहीर होते. एवढेच नव्हे तर प्रत्येक गायकाची योग्यता ओळखून त्यांनी गायकांना त्यांच्या मर्यादा ओलांडायला लावून त्यांच्याकडून उत्तमोत्तम गाणी गाऊन घेतलेली आहेत. मदन मोहनच्या गाण्यात भारून टाकण्याची शक्ती होती. गाणे न समजणाऱ्या रसिकांवर देखील त्यांच्या गझलांनी मोहिनी घातली होती. 1964 ला 'गझल' चित्रपट आला. त्यात महफिलीतील गझल 'नगमा ओ शेर की सौगात किसे पेश करूं' अतिशय लोकप्रिय झाली. भीमपलासी रागातील स्वर, त्यातील शुद्ध कोमल स्वरांची पकड आणि विस्ताराची पद्धत प्रत्येकाची वेगवेगळी असते. साहिल लुधियानवी,मदन मोहन आणि लतादीदी या तिघांनी साकारलेली ही गझल अत्यंत सुमधुर अशीच आहे. मन प्रेमासाठी तळमळत आहे, मनातील उद्दीपित भावनांचे वर्णन कोणाला सांगू? दिवसभर मनात पेटलेली आग, त्या धगधगणाऱ्या क्षणांचे काय करू? ही गझल अवर्णनीय अशा संगीतामध्ये बांधून मदन मोहन यांनी साहिरच्या शब्दांना पूर्ण न्याय दिलेला आहे. गाण्याला योग्य संगीतात सजवून गायिकेच्या गळ्यातून परिणामकारकपणे गाऊन घेण्याचे कसं संगीतकाराचे असते. ते काम मदन मोहन यांनी उत्कृष्टपणे निभावलेले होते. 1964 ला प्रदर्शित झालेल्या जहाँआरा' चित्रपटातील गझल 'वो चूप रहे तो मेरे दिल के दाग जलते है' मधील जो होठ सी भी लिये, तो सितम ये किस पे किये/ खामोशियों से तो दिल और दिमाग जलते हैं/. अतिशय भावुक, जीव ओतून म्हटलेली गझल हृदयात खोल रुतते. नैराश्य, एकटेपणा, प्रेमभंग या सगळ्याचा एकत्रित होणाऱ्या प्रभावी परिणामांना दीदींच्या आवाजामुळे गहिरेपण प्राप्त होते. गाण्यातील भाव व्यक्त करण्याची त्यांची क्षमता खरोखर अलौकिक अशीच आहे.

मदन मोहन यांना सितार, व्हायोलिन, सरोद आणि सारंगी ही वाद्य अधिक प्रिय होती. आपल्या संगीतात त्यांनी या वाद्यांचा भरपूर उपयोग करून घेतला. यमन, भैरवी, झंझोटी, दरबारी, राग त्यांना अधिक आवडत. आपल्या संगीत रचनेत त्यांनी पाश्चात्य संगीताचा उपयोग करून आपले संगीत अधिक परिश्कृत आणि मधुर बनविले होते. 'दस्तक' चित्रपटातील 'हम है मता- ए-कूचा- ओ बाजार की तरह' मध्ये उस्ताद राईस खां साहेबांची सितार अतिशय लाजवाब अशीच आहे. मदन मोहनच्या गझलामधे अनेकदा त्यांची सुंदर सतार ऐकायला मिळते. या सतारीच्या आर्तस्वराने गझलेला चार चांद लावले आहेत. सरेआम विकली जाणारी स्त्री ही भोगवस्तू आहे. कोणीही येतो आणि आमची किंमत लावतो. मजरूह सुलतानपुरींनी या गझलेत स्त्री जीवनाला व्यापक आयाम दिला आहे. या गझलेतील शब्दांचे उच्चार आणि स्वरांच्या दृष्टीने अत्यंत आव्हानात्मक गाणे दीदींनी मोठ्या ताकतीने पेलले आहे. त्यांच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास असल्यामुळेच मदन मोहन यांनी अतिशय अवघड अशी चाल गझलेला दिली आहे. दुःखात बुडलेला प्रत्येक शब्द आणि नायिकेच्या भरभरून वाहणाऱ्या जखमा, आठवणी, ते दुःख, तिची पीडा आवाजातून व्यक्त करीत दीदींनी ही गझल अजरामर केली आहे. दीदी म्हणतात- 'अनेक संगीतकारांनी मला गाणी दिली पण मदन भैयाने मला संगीत दिले'. दीदींच्या या एका वाक्यानेच मदन मोहनची महानता स्पष्ट होते. 'दिल की राहें' चित्रपटातील 'रस्म- ए- उल्फत को निभाये तो निभाये कैसे' ही वेदनेची गझल लतादीदींनी गायलेल्या सर्वोत्कृष्ट गझलांपैकी एक आहे. यात सितारीचे सुंदर तुकडे वाजविलेले आहेत. ते देखील उस्ताद राईस अली खान साहेबांचेच आहेत. विविध चित्रपटातील वेगवेगळ्या नायिका, चित्रपट कथेतील विषयातील वैविध्य, त्यातील अनेक रंगी भाव, पण संगीतकार आणि गायिकेचा स्वर मात्र तोच. मदन मोहन आणि लतादीदींच्या संगीत आणि स्वरातून सौंदर्य, नाद, धुंदी, चैतन्य, दुःख, उदासी प्रकट होते. संगीताच्या या अफलातून मिलापातून या दोघांनी चंदेरी विश्व निर्माण करून वर्षानुवर्ष रसिकांच्या मनावर अधिराज्य केले आहे.



मांडणी व सजावट : अतुल ह. खंडगावकर






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


पचनक्रिया सुधारते, रक्ताभिसरण वाढते. प्राणायामामुळे फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढते. मेंदूला सुद्धा अधिक प्राणवायू मिळून आपल्याला उत्साह वाटतो. हृदयाची कार्यक्षमता वाढते. योगगुरू रामदेव बाबांना लहानपणी असा आजार झाला होता की डॉ  नी त्यांच्या आईवडिलांना सांगून टाकले होते की हा मुलगा पुढे आधाराशिवाय चालू शकणार नाही. पण त्यांनी योगासने, प्राणायाम, ध्यान इ च्या साहाय्याने आणि आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर या सगळ्यावर मात केली आणि आज ते योगगुरू म्हणून सगळ्या जगापुढे उभे आहेत. आज व्हाट्सअँप, फेसबुक इ सारख्या समाजमाध्यमांवर योग करणाऱ्यांची अनेक उदाहरणे पाहतो. कुठल्या तरी व्हिडिओत नव्वद ब्याण्णव वर्षांच्या आजी कठीण योगासने करताना दिसतात. कुठे तरी एखादे वयोवृद्ध आजोबा योगाच्या साहाय्याने आपले आरोग्य योगाच्या साहाय्याने उत्तम राखताना दिसतात. अशी खूप उदाहरणे आपल्या आजूबाजूला पाहिले तरी सापडतील. पण आपण ते फक्त पाहतो आणि पाहून सोडून देतो. खरी समस्या ही आहे. तुम्ही लहान असा की वयस्कर, स्त्री असा की पुरुष, तुम्हाला आजार असो की नसो, पण कुठल्या ना कुठल्या प्रकारचा व्यायाम हा प्रत्येकासाठी आवश्यक झाला आहे.




## हितगुज



पुष्प
९७वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## नामस्मरणात स्वामींचे रूप जागृत असते

श्री स्वामी महाराजांचे नाव, त्यांचा मंत्र व त्यांचे रूप हे भिन्न नाहीत. पण नाव हे रूपाच्या आधी ही असते आणि नंतरही उरते. श्रीराम जन्माला येण्यापूर्वी  वाल्मिकींनी रामायण लिहिले आणि श्रीरामाने त्यानंतर जन्म घेऊन त्यात वर्णन केल्याप्रमाणे आचरण करून दाखविले. म्हणजे रूप अस्तित्वात येण्यापूर्वी नाव होते आणि अवतार समाप्तीनंतर आजही नाव शिल्लक आहे. देशकालाच्या पलीकडे जे कायम टिकते ते सत्य होय. प्रत्यक्ष आकाराला आलेली रूपे नाहिशी झाली तरी त्यांचे नाव टिकून राहते. म्हणजे नाव हे देशकालाच्या मर्यादेच्या पलीकडे असते म्हणजे ते रूपापेक्षा जास्त सत्य असते. जे सत्य असते ते श्रेष्ठ असलेच पाहिजे म्हणूनच नामस्मरण सर्वश्रेष्ठ आहे. नामस्मरण करताना रूपाचे स्मरण सूक्ष्मरूपाने असतेच. समजा, एका गृहस्थाच्या घरी राम नावाचा  गडी आहे. तो गृहस्थ 'राम-राम' असा जप करीत आहे परंतु त्याचे मनात दुसरेच विचार सुरु आहेत. आपण त्या गृहस्थास विचारले 'आपण कुणाचे नाव घेत आहात?' अर्थात तो उत्तर देईल 'रामाचे' हे उत्तर देताना त्याच्या मनात 'दशरथी रामच' असेल. राम नावाचा गडी नसेल. त्याचा अर्थ नामस्मरण करताना भगवंताच्या रूपाचे ध्यान सूक्ष्मरूपाने आत जागृत असते. रूप ध्यानी येत नाही म्हणून अडून बसू नये. नामस्मरण करण्याचा अट्टहास ठेवावा. भगवंत स्वतः अरूप आहे, म्हणून जे रूप आपण त्याला द्यावे तेच त्याचे रूप असते. नामस्मरणातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. म्हणून 'श्री स्वामी समर्थ' हे नाव श्रेष्ठ नाव आपण आवडीने अखंड व आनंदाने घ्यावे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

॥ श्रीआदिनाथाय नमः ॥ ॐ अस्य श्रीगोरक्ष ग्रंथस्य भगवान आदिनाथ ऋषिः षडाक्षरी छन्दः नवनाथानुग्रह प्राप्त्यर्थे विनियोगः । 



श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीपांडुरंगाय नमः ॥ श्रीलक्ष्म्यै नमः ॥ ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः ॥ ॥ श्री रसेश्वरी प्रसन्न ॥ दत्त गोरक्ष संवाद श्री दत्तात्रेय-गोरक्ष संवाद श्री दत्तात्रेय-गोरक्ष संवाद श्रीशैल ह्या नावाचा अर्थच मुळी "देवीचा पर्वत" असा आहे. तेथील ज्योतिर्लिंगही  प्रसिद्धच आहे. जटाजुट, भस्म, रुद्राक्ष अशी त्यांची अवधूतमूर्ती वैराग्याचे साक्षात प्रतीक. त्रिदेवांचा अंश असलेल्या भगवान दत्तात्रेयांनी आपल्या मातेला अजपा साधनेचा उपदेश केला होता. गोरक्षनाथांनी गौरवलेली "न भूतो न भविष्यती" अशी ही सहज सोपी, कोणालाही करता येण्यासारखी पण अत्यंत प्रभावकारी साधना सर्वच योगसाधकांनी आचारावी अशी आहे. श्रीशंकराने दत्तात्रेयांच्या हस्ते मच्छेंद्रनाथांच्या माध्यमातून नाथ संप्रदायाची गुढी उभारली. त्यामुळे दत्त संप्रदायाबरोबरच नाथ संप्रदायातही दत्तात्रेयांना मानाचे स्थान आहे. अशी मान्यता आहे की सिद्ध गोरक्षनाथ आजही दत्तसेवेत आहेत. याच विषयीची एक कथा पाहू. स्त्री-राज्यातून मच्छिंद्रनाथांची सुटका केल्यावर मच्छिंद्र-गोरक्ष ही गुरू-शिष्यांची जोडगोळी नाना ठिकाणची भ्रमंती करत होती. एके दिवशी मच्छिंद्रनाथांनी गोरक्षनाथांना भिक्षा आणण्यास सांगितले. त्यावेळी त्यांचा मुकाम एका पर्वतावर होता. आजूबाजूस चिटपाखरूही नव्हते. जवळपास गावही दिसत नव्हते. भिक्षा मागायला जाणार कुठे या चिंतेत असताना गोरक्षनाथांना मैनावाती राणीचे बोल आठवले. स्त्री-राज्यातून निरोप घेताना तीने "कधीही भिक्षा मागायला या" असे सांगितले होते. गोरक्षांनी योगसामर्थ्याने आपले भिक्षापात्र आकाशमार्गाने स्त्री-राज्यात धाडले. ते भिक्षापात्र थेट राणीपुढे जाऊन पडले. राणीने नाथाचे पात्र लगेच ओळखले आणि ती आश्चर्यचकीत झाली. तीलाही आपले शब्द आठवले आणि ही गोरक्षांचीच किमया आहे याची खात्री पटली. एवढ्याशा पात्रातली भिक्षा तीघांना (मच्छिंद्र, गोरक्ष आणि मीननाथ) कशी पुरणार अशी काळजी वाटून तीने आपल्या दासींना त्या पात्रात भरपूर भिक्षा वाढण्यास सांगितले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जेवढी भिक्षा घालावी तेवढे ते पात्र  मोठे मोठे होत होते. अगदी मारूतीच्या शेपटासारखे. शेवटी राणी अहंकार सोडून मनातल्यामनात मच्छिंद्रनाथांना शरण गेली. तक्षणी पात्र पूर्ण भरले आणि परत अवकाशमार्गाने गोरक्षनाथांकडे निघाले. वाटेत एका पर्वतावर अत्रिपुत्र दत्तात्रेय बसले होते. त्यांनी आकाशमार्गाने उडत जाणारे हे भिक्षापात्र पाहिले. त्यांना विस्मय वाटला. हे कोणाचे पात्र आहे ते विचारावे या हेतूने त्यांनी हातातला दंड वर केला. पात्र घेवून जाणारी सिद्धी त्या दंडाला आपटून खाली पडली. दतात्रेयांनी तीला ठावठिकाणा विचारला आणि पुढे जाण्याची अनुमती दिली. सिद्धी भिक्षापात्रासह गोरक्षांनाथांकडे पोहोचली आणि म्लान वदनाने उभी राहिली.



आधुनिक केसरी

## लोपला गे माये

लोपला गे माये | मायेचा जिव्हाळा ||
दाटेना उमाळा | अंतरीचा. ||१||
शोधूनी गावेना | सज्जनांची जात ||
दुर्जनांची मात | जग व्यापी. ||२||
कुणाच्या नावाने | फोडू टाहो आता ?||
कलयुगी सत्ता | भ्रष्ट झाली. ||३||
ममतेची बघ | होळी इथे होते ||
वांझोटी पाजते | बाळा पान्हा. ||४||
तुझ्या नावाचाही | व्यापार मांडला ||
भोंदुने गांजला | देश सारा. ||५||
सहावेना देवा | मायेवीन जीणे ||
एकच मागणे | मोक्ष द्यावा. ||६||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

ब्रह्मविद्या परकाश है,
भक्ति मुक्ति सुखधाम ।
गाथा यह अध्यात्म है, अमत सनातन
नाम ।।१४।।(स्वर्वेद प्रथम मण्डल प्रथम
अध्याय) ०१/०१/१४

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ब्रह्मविद्येच्या प्रकाशात चेतन साधन, अनुभव योग-युक्ती द्वारे चेतन धाम, परमात्म्याची प्राप्ती होते. हे तत्त्वज्ञान अध्यात्मिक आहे ; कुठल्या मत-संप्रदायाची गाथा नाहि तर सनातन ब्रह्मविद्येचा प्रकाश आहे. ब्रह्मविद्येचा प्रकाश सृष्टीच्या प्रारंभापासूनच या जगात चालत आला आहे. आधुनिक तत्त्वज्ञान , ज्यात वाचक ज्ञाना व्यतिरिक्त परब्रह्म प्राप्तीचे कोणतेही अनुभव साधन नाही, ती ब्रह्मविद्या नाही,  तर मत-संप्रदाय आहे. शरीर, मन, बुद्धी तसेच वाणीच्या साधनांद्वारे परब्रह्माची प्राप्ती होत नाही, कारण तो परमेश्वर मन, बुद्धी आणि इंद्रियागोचर आहे. प्रकृती पार असणाऱ्या वस्तूच्या प्राप्ती साठी प्रकृती पार साधन हवे. म्हणून तो अप्राकृतिक परब्रह्म या मन-वाणीच्या साधन, मनोरंजनापासून दूर आहे. त्याची प्राप्ती सनातन ब्रह्मविद्येद्वारे होते, जी संप्रदाय, मत आणि विचार रहित आहे.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

# सुख त्यागात आहे, भोगात नाही

आधुनिक केसरी

अमुक हवे असे वाटले आणि ते मिळाले नाही, म्हणजे दुःख होते. अमुक हवे असे वाटूच देऊ नये. परमात्मा ठेवील त्यात समाधान मानावे. याचेच नाव वैराग्य. आपण विषयांत बुडतो आहोत, आणि पुनः विषयाचीच कास धरली तर आपण अधिकाधिक नाही का बुडणार ? विषयाची आस धरणे म्हणजे त्याचे दास होण्यासारखेच आहे. मनुष्य सुखाकरिता धडपड करतो, आणि अंती दुःखमय अशा विषयाची आशा करतो. सुख त्यागात आहे, भोगात नाही, हे पुष्कळांना पटत नाही. परिसाला लोखंड लागले म्हणजे त्याचे सोने होते, पण रुप्याचे काही सोने होत नाही; तसे आपण दीनाहून दीन, म्हणजे अभिमानरहित झाले पाहिजे, आणि असे झाले म्हणजेच परमात्म्याला अनन्य शरण जाता येईल. हे व्हायला त्याची कृपाच पाहिजे, आणि ती नित्य भाकावी. एखाद्या गोष्टीने आपले मन अस्वस्थ होते ते का बरे ? त्या गोष्टीला आपण सत्यत्व देतो म्हणून. हा सर्व खेळ आहे, हे मिथ्या आहे, असे जाणून, ज्याप्रमाणे नट नाटकातली आपली



भूमिका अगदी खऱ्यासारखी करतो, त्याप्रमाणे व्यवहार करावा. सुख, समाधान, सत्यात असते, मिथ्यात नसते. आजपर्यंत आपण विषय उपभोगले पण त्यांत आपल्याला सुख झाले नाही; मग विषय मिथ्या आहेत याची भगवंताने तुम्हांला प्रचीती नाही का दिली ? तरीसुद्धा तुम्ही या विषयांतच प्रपंच कसा सुधारेल असे मला विचारता, याला काय म्हणावे ? जे दुःखमयच आहे त्यात सुख कुठून मिळणार ? दोन लहान मुली भातुकली खेळल्या; जी मुलगी गरीब होती तिने पोळ्या आणि गुळांबा केला, पण जी श्रीमंत होती तिने मात्र श्रीखंड आणि बासुंदी केली. पहिलीचा गुळांबा जितका पोट भरण्याला उपयोगी नाही, तितकेच दुसरीचे श्रीखंडही उपयोगी नाही. तसे प्रपंचाचे खरेपण आहे. प्रपंच असण्यासाठी बायको आणि मुले यांची गरज आहेच असे नाही; जो दुसऱ्यावर अवलंबून असतो तो प्रपंचीच असतो. म्हणून मनुष्य एकटा असला तरी प्रपंचीच असतो. दुसऱ्यापासून सुख मिळविण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य हा प्रपंची होय. पाचजण मिळून प्रपंच बनतो. त्यामध्ये प्रत्येकजण स्वार्थी असतो. मग सर्व सुख एकट्यालाच मिळणे कसे शक्य आहे ? प्रपंचामध्ये अनेक वस्तू आहेत, पण भगवंताजवळ एकच वस्तू आहे. प्रपंचामध्ये कितीही वस्तू आणल्या तरी पुऱ्या पडत नाहीत, कारण एका वस्तूच्या आणण्यामध्येच दुसऱ्या वस्तूच्या आणण्याचे बीज आहे. पण भगवंताचे तसे नाही. भगवंताची वस्तू एकदा आणली की पुनः ती आणायला नको. **१७४. 'अमुक एक वस्तू आहे म्हणून मी सुखी आहे' या वृत्तीत राम नसून, काही नसताना वृत्तीचे समाधान टिकले पाहिजे.**

## निरूपण

आधुनिक केसरी

कासे लाऊन उतरी । पार दुःखाचा ॥ २४॥
बहुतां जन्मांचे सेवटीं । जेणें चुके अटाटी ।
तो हा नरदेह भेटी । करी भगवंतीं ॥ २५॥
म्हणौन धन्य ते भाविक जन । जेंहिं जोडिलें हरिनिधान ।
अनंत जन्मांतरींचें पुण्य । फळासि आलें ॥ २६॥
आयुष्य हेचि रत्नपेटी । माजीं भजनरत्नें गोमटीं ।
ईश्वरीं अर्पूनिया लुटी । आनंदाची करावी ॥ २७॥
हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ ।
सदा सर्वदा संतुष्ट । नैराशबोधें ॥ २८॥
धरून ईश्वराची कास । केली संसाराची नैराश ।
तयां भाविकां जगदीश । सबाह्य सांभाळी ॥ २९॥
जया संसाराचें दुःख । विवेकें वाटे परमसुख ।
संसारसुखाचेनि पढतमूर्ख । लोधोन पडती ॥ ३०॥
जयांचा ईश्वरीं जिव्हाळा । ते भोगिती स्वानंदसोहळा ।
जयांचा जनावेगळा । ठेवा आक्षै ॥ ३१॥
ते आक्षै सुखें सुखावले । संसारदुःखें विसरले ।

रविवार, २३ जून २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २९०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 23 JUNE 2024 | adhunikkesari.com | YEAR-03 • ISSUE-290 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-05

## आश्वासनानंतर प्रा. हाकेंचे उपोषण स्थगित

### अधिवेशन काळात सर्वपक्षीय बैठकीचे नियोजन

आधुनिक केसरी न्यूज



**जालना :** गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेले ओबीसी आरक्षण बचाव उपोषण अखेर लक्ष्मण हाके यांनी अखेर संपवले आहे. ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागणार नाही, तसेच ओबीसी आरक्षणासंबंधी लक्ष्मण हाके यांच्या मागणीवर राज्य सरकार सकारात्मक असल्याचे आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी हे आंदोलन मागे घेतलं आहे. छगन भुजबळांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या मंत्र्यांचे एक शिष्टमंडळ लक्ष्मण हाके यांच्या भेटीला गेले होते. त्यावेळी या शिष्टमंडळाने आरक्षणावर राज्य सरकारची काय भूमिका आहे याची माहिती हाके यांना दिली. त्याचवेळी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी आपले उपोषण मागे घ्यावं अशी विनंती या शिष्टमंडळाकडून करण्यात आली. बोगस सर्टिफिकेट देणाऱ्यांवर आणि घेणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे राज्य सरकारने आश्वासन दिले. त्यावर श्वेतपत्रिका काढावी आणि ते जाहीर करावे. या सरकारकडून न्यायाची अपेक्षा आहे. पंचायत राजच्या निवडणुका आता ओबीसी आरक्षण देऊन घेणार की त्याशिवाय घेणार हे शासनाने स्पष्ट करावे. अधिवेशन काळात सर्वपक्षीय बैठक होणार असून त्यामध्ये चर्चा होऊन निर्णय घेण्यात येईल. या सरकारने आश्वासन दिलं आहे, पण केवळ त्यावर आम्ही विश्वास ठेवणार नाही. त्यामुळे आमच्या मागण्या पूर्णपणे मान्य होईपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार आहे. आता ते फक्त तात्पुरतं स्थगित केलं आहे.

त्यांची दादागिरी चालणार नाही, भुजबळांचा हल्लाबोल राज्याचे मंत्री छगन भुजबळ बोलताना म्हणाले की, आमच्यावरचा अन्याय कधी संपणार? आता त्यांची दादागिरी चालणार नाही. आरक्षण हा गरिबी हटावचा कार्यक्रम नाही, अन्याय झालेले समाज हळूहळू पुढे यावेत यासाठी आरक्षण आहे. लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांना पाडलं. पण लढाई आता संपली नाही. आम्ही कुणालाही घाबरत नाही. यापुढे तुम्ही सगळे एकत्र राहिला तर तुमचं आरक्षण टिकेल. हातावर हात ठेवून बसलात तर काही होणार नाही. यापुढे लोकशक्ती एकत्र आली तर धनशक्तीचा पराभव होणार. विधानसभा आणि लोकसभेत आरक्षण हवे. जातनिहाय जनगणनेला देवेंद्र फडणवीसांचा पाठिंबा आहे. काही जण ओबीसी प्रवर्गातून आणि 10 टक्क्यातूनही आरक्षण घेतात. खोटे कुणबी दाखले देणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणार. ओबीसींना प्रमाणपत्र हवं असेल तर 10 महिने थांबावे लागले. आपल्याला लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांच्या पाठीशी उभं राहिचे आहे. दलित आदिवासी समाज तुमच्यासोबत आहे. राज्यात अनेक ठिकाणी खोटे दाखले वाटले. ज्यांनी खोटे दाखले वाटले, त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी. खोटे दाखले पुन्हा एकदा तपासले जाणार. खोटे दाखले देणाऱ्यांवर गुन्हा दाखल होणार. पूर्वीचे जे नियम आहेत, ते सुप्रीम कोर्टाच्या नियमांनुसार आहेत.

## धरणातील मस्ती तरुणाच्या जीवावर बेतली; पाण्यात बुडताना व्हिडिओ व्हायरल

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** येथून भंडारदरा धरण बघण्यासाठी व फिरण्यासाठी गेलेल्या तरुणांपैकी एकाचा बुडून मृत्यू झाला असून बरोबरचे पाच मित्र मात्र बचावले असल्याचे समजते सदरची दुर्घटना शनिवार दिनांक २२जुन रोजी दुपारी घडली यात शिर्डी येथील सद्दाम हुसेन शेख वय २६या तरुणाचा पाण्यात मित्रा बरोबरपाण्यात उतरला असताना तो तो पाण्यात बुडून त्याचा दुदैवी मृत्यू झाला धरणाच्या पाण्यात तिघे तरुण मस्ती करत होते तर एक मित्र व्हिडिओ काढत होता दोघांना पोहता येत होते तर मयताला पोहता येत नसल्याने तो पाण्यात मित्राच्या डोळ्यासमोर बुडाला मात्र वाचवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला मात्र त्यात यश मिळाले नाही त्या प्रसंगाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाल्याने मोठी खळबळ उडाली आहेभंडारदरा धरण हे निसर्ग रम्य असा परीसर असुन पावसाळी वातावरण असल्याने अधुन मधुन अशा घटना घडत असतात स्थानिक राजुर पोलीस व व उपविभागीय अधिकारी सोमनाथ वाकचौरे यांनी तात्काळ तत्परता दाखवत मृतदेहाच्या शोधासाठी प्रयत्न केल्यानंतर ज्या ठिकाणी घटना घडली त्यापासून काही अंतरावर सदरचा मृतदेह मिळुन आला. अकोले पोलीसांनी अकस्मात मृत्यू म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला असून आधिक तपास अकोले पोलीस करीत आहे या घटनेनंतर शिर्डी परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## टाकळी राजेराय ते काटशेवरी फाटा डांबरीकरण; नागरिकांत समाधान

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील टाकळी राजेराय ते काटशेवरी फाटाम खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम रखडल्याने वाहनधारक नागरिकांचे हाल सुरू होते. ठेकेदार तथा विभाग मात्र अनियमितता चालढकल करीत असल्याने नागरिकांतून रोष व्यक्त करण्यात येत होता. माध्यमांनी सतत पाठपुरावा करून ही विभागाला अवगत केले होते. आता कोठे हे काम मार्गी लागले आहे. नागरिकांनी समाधान व्यक्त करुन माध्यमांचे कौतुक केले आहे. टाकळी राजेराय ते काटशेवरी फाटा पर्यंत रस्त्यांचे कित्तेक वर्षांपासून खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम साठी नागरिक मागणी करुन होते मात्र विभाग या ना त्या कारणे पुढे करत कामात चालढकल करत होता.तर काम सुरू होवून ही कामात सतत चालढकल अनियमितता दिसून आली यामुळे वाहनधारक नागरिक प्रचंड नाराज तथा रोष धरुन होते.यासंदर्भात दैनिकांने सतत पाठपुरावा केला. विभाग मात्र हो.. हो.. म्हणत चालढकल करून होता. मात्र नागरिक आता रस्ता रोको आंदोलन करण्याच्या मनस्थितीत होते. त्यापुर्वीच विभागाने मात्र तातडीने टाकळी राजेराय ते काटशेवरी फाटा रस्ता डांबरीकरण मजबुतीकरण काम करत सिलकोट ही करत असल्याने रस्ता गुळगुळीत झाल्यानें वाहनांचा वेग वाढला असुण अतिशय टाकळी गाव वा काटशेवरी फाटा गाठता येत असल्याचे नागरिकांनी प्रतिनिधीस सांगितले.

## वढा तीर्थक्षेत्राच्या विकास कामात दिरंगाई करू नका


### दोन महिन्यात निविदा प्रकाशित करा : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर : 25 कोटी रुपयांच्या निधीतून वढा तीर्थक्षेत्राचा दैदिप्यमान विकास होणार आहे. हे केवळ एक विकासकाम नसून लाखो भाविकांच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. त्यामुळे या विकासकामात दिरंगाई करू नका. शासन निर्णया प्रमाणे आराखड्याचे सनियंत्रण व अंमलबजावणीसाठी समित्या तयार करून दोन महिन्यांच्या आत कामाची निविदा प्रकाशित करा, असे निर्देश आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नातून वढा तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी 25 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.



दरम्यान, या विकासकामाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील 20 कलमी सभागृहात बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सदर सूचना दिल्या आहेत. या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, जलसंधारण विभागाचे अधीक्षक अभियंता पी. एन. पाटील, जलसंधारण विभागाचे सहायक अभियंता ओमकेश सांगळे, प्रभारी जिल्हा नियोजन अधिकारी आर. बी. कोंडावार, घुग्घूस ठाणेदार एस. एस. सोनटक्के, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुनिल कुंभे, उपविभागीय अभियंता प्रकाश अमरशेट्टीवार, चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी मीना साळुंखे, यंग चांदा ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष राकेश पिंपळकर, वढा सरपंच किशोर वराडकर, देवाळा उपसरपंच सुरज रामटेके, शंकर वराडकर, तालुका उपाध्यक्ष दयानंद नागरकर, तालुका प्रचार प्रमुख जय मिश्रा, गणपत कुडे, कार्तिक बोरेवार, आणि अन्य संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

आमदार किशोर जोरगेवार यांनी बैठकीत बोलताना सांगितले की, विदर्भातील प्रति पंढरपूर म्हणून ओळखले जाणारे वढा तीर्थक्षेत्र लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. श्रद्धेचे हे स्थान असल्यामुळे विकासकामे त्वरित आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. हे काम केवळ सरकारी निधीचे नसून, भाविकांच्या विश्वासाचे प्रतीक आहे. यामुळे कोणत्याही प्रकारची दिरंगाई न करता विकास कामे वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी तत्परता दाखवावी, असे यावेळी आमदार जोरगेवार म्हणाले. वढा तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मंजूर झालेल्या निधीतून मंदिर सभागृह, प्रशासकीय इमारत, पूजा शेड, घाट बांधकाम, छत्री, विसर्जन कुंड, जलनिस्सारण, बायोडायजेस्टर, बागकाम सह इतर सोयी-सुविधांद्वारे मंदिर परिसराचा विकास होणार आहे. यामुळे भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. वढा येथे वर्धा आणि पैनगंगा नदीचा संगम आहे. दोन पवित्र नद्यांचा संगम हा धार्मिक दृष्टिकोनातून पावन आहे. येथे येणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उभारणे गरजेचे आहे. आमदार किशोर जोरगेवार यांनी याबाबत सातत्याने प्रयत्न केले आहेत. पंढरपूर आणि वढा या तीर्थक्षेत्रांमध्ये साम्य आहे. दरवर्षी कार्तिकी एकादशीला येथे भरणाऱ्या यात्रेला आता भव्य स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांची योग्य सोय व्हावी यासाठी विकास कामाची निविदा प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी या बैठकीत दिले आहेत. आराखड्यासाठी आवश्यकतेनुसार सल्लागार नियुक्त करण्यात यावा, आराखड्यातील कामांची तात्काळ तांत्रिक मान्यता घेण्यात यावी आदी सूचना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी संबंधित अधिकार्यांना दिल्या आहेत. वढा तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मंजूर झालेल्या 25 कोटी रुपयांच्या निधीच्या माध्यमातून मंदिर परिसराचा दैदिप्यमान विकास होणार आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी त्यांनी संबंधित अधिकार्यांना सूचना दिल्या आहेत. वढा तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी 44 कोटी रुपयांचा प्रस्ताव आपण सादर केला आहे. यातील पहिल्या टप्प्यात 25 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आपल्याला यश आले आहे. दुस-या टप्प्यातील निधीसाठीही आपले सातत्याने प्रयत्न सुरु आहे. या टप्प्यात वढा ते जुगाद असा हलता पुल तयार करण्याचे प्रस्तावित असुन हे कामही आपण लवकरच करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.




# आमच्या जात जाणिवा टोकदार होत आहेत का ?



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**सामाजिक चळवळी मागे पडून जातीच्या चळवळी पुढे येण्याची अनेक कारणे आहेत. या कारणांचा आणि त्यांच्या सामाजिक परिणामांचा सविस्तर विचार केल्यास, आपण समाजाच्या एकंदर स्थितीवर अधिक स्पष्टपणे प्रकाश टाकू शकतो. आजच्या काळात जातीय अस्मिता आणि जातीय विचार प्रमाणाच्या बाहेर टोकदार झाले आहेत. कोणी कोणाला आणि काय सांगावे हेच समजायला मार्ग नाही. जातीय चळवळीच्या राजकारणात सामान्य माणूस नाहक ओढला जात असून त्याचाही बुद्धिभेद करणे सातत्याने चालू आहे. राजकीय नेत्यांनी जातीच्या आधारावर निवडणुकांमध्ये यश मिळवण्याच्या हेतूने जातीच्या चळवळींना प्रोत्साहन दिले.**



## क्षितिजापल्याड

जातींच्या विभाजनामुळे विविध गटांना आपले मतदार समूह वाढवता येतो, ज्यामुळे राजकीय सत्ता मिळवणे सुलभ होते. आरक्षण धोरणामुळे जात-आधारित गटांना शैक्षणिक आणि नोकरीतील संधी मिळतात. यामुळे जातीच्या चळवळींना पाठिंबा मिळतो, कारण लोकांना वाटते की त्यांची जात विकासासाठी महत्त्वाची आहे. समाजातील असमानता, विशेषतः दलित, आदिवासीच्या बाबतीत जातीच्या चळवळींना महत्त्व आहे. या चळवळी समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवतात आणि समानता व न्यायासाठी लढा देतात. आर्थिक विषमतेमुळे काही जाती आर्थिकदृष्ट्या दुर्बल राहतात, ज्यामुळे त्या जातींच्या लोकांमध्ये असंतोष निर्माण होतो. या असंतोषातून जातीच्या चळवळी उदयास येतात. प्रत्येक जात आपल्या संस्कृती, परंपरा आणि ओळख जपण्यासाठी चळवळी करतात. जातीच्या चळवळींमुळे समाजात ताणतणाव आणि फूट वाढते. जातींच्या आधारे समाजात विभाजन होते, ज्यामुळे सामाजिक एकता आणि सलोखा धोक्यात येतो. जातीच्या चळवळींमुळे असमानतेची भावना अधिक तीव्र होते. जातीयवाद आणि जातीभेदाच्या समस्या अधिक गडद होतात, ज्यामुळे समाजात अन्यायाची भावना बळावते. जातीच्या चळवळी राजकीय अस्थिरतेस कारणीभूत ठरतात. जातीय राजकारणामुळे सरकारे अस्थिर होतात आणि नीतिशास्त्राच्या आधारावर नव्हे, तर जातीच्या आधारावर निर्णय घेतले जातात. जातीच्या संघर्षामुळे आर्थिक विकासाचा वेग कमी होतो. जातीय तणावामुळे उद्योग, शिक्षण आणि रोजगाराच्या संधींवर विपरित परिणाम होतो. काही जातीच्या चळवळी सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी कार्य करतात. उदाहरणार्थ, दलित चळवळींनी दलितांच्या हक्कांसाठी लढा देऊन त्यांना न्याय मिळवून दिला आहे. जातीच्या चळवळींमुळे शैक्षणिक आरक्षण आणि इतर सुधारणा झाल्या आहेत, ज्यामुळे मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांकांच्या शिक्षणात सुधारणा झाली आहे. भारतीय समाजाच्या विविधतेत जात एक महत्त्वाचा घटक आहे. प्राचीन काळापासून जातिव्यवस्था समाजात स्थिरावली आहे, ज्यामुळे सामाजिक विषमता आणि अन्यायाची स्थिती निर्माण झाली आहे. सामाजिक सुधारणा आणि जाती अंत या विषयावर विचार करताना, समाजाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीपासून ते आधुनिक काळातील परिस्थितीपर्यंत विस्तृत दृष्टिकोन आवश्यक आहे. भारतीय समाजात जातिव्यवस्था प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. वेदांमध्ये वर्णव्यवस्थेचा उल्लेख आढळतो, ज्यात समाज चार मुख्य वर्णांमध्ये विभागला होता: ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र. या व्यवस्थेचा मुख्य उद्देश कामांची विभागणी आणि समाजाच्या सुव्यवस्थेसाठी होता, परंतु कालांतराने ही व्यवस्था कठोर आणि अन्यायकारक बनली. विशेषतः शूद्र आणि तथाकथित अस्पृश्य जातींवर मोठ्या प्रमाणात अन्याय झाला. ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले यांनी दलित आणि महिला शिक्षणासाठी मोठे प्रयत्न केले. त्यांचे काम समाजातील दुर्बल घटकांना शिक्षण आणि समान हक्क देण्याच्या दिशेने मोठे पाऊल होते. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या हक्कांसाठी दिलेल्या लढ्याने आणि भारतीय संविधानात समाविष्ट केलेल्या समानतेच्या तत्त्वांनी समाजात महत्त्वपूर्ण बदल घडवले. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना समान हक्क दिले आहेत आणि जातीय भेदभावविरुद्ध कठोर कायदे बनवले आहेत. विविध सरकारांनी आरक्षण धोरण लागू करून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांना शैक्षणिक आणि नोकरीतील संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. या धोरणांमुळे अनेक दलित आणि मागासवर्गीय परिवारांना आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रगती साधता आली आहे. सर्वसामान्य आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण हे जातीय भेदभाव समाप्त करण्याचे प्रभावी साधन आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जातीय समता आणि बंधुतेच्या तत्त्वांचा



समावेश असलेले शिक्षण देणे आवश्यक आहे. समाजात जातीय समानतेबाबत जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. या हेतूसाठी समाज माध्यमे, साहित्य, कला आणि संस्कृती यांचा उपयोग केला जाऊ शकतो. जातीय भेदभावाविरुद्धचे कायदे प्रभावीपणे अंमलात आणले पाहिजेत. भेदभाव करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. सर्वांना समान रोजगार संधी मिळवून देणे आवश्यक आहे. यामुळे आर्थिक विषमता कमी होईल आणि समाजातील दुर्बल घटकांच्या जीवनमानात सुधारणा होईल. विविध जातींमधील संवाद आणि सहकार्य वाढवणे आवश्यक आहे. यासाठी सामूहिक उपक्रम, सहकारी कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाऊ शकते. जातीअंत साधल्यास समाजात अनेक सकारात्मक बदल घडून येतील: जातीय समानतेमुळे समाजात एकता आणि सलोखा निर्माण होईल. विविध जातींच्या लोकांमध्ये परस्पर आदर आणि सहकार्याची भावना वाढेल. सर्वांना समान संधी मिळाल्याने आर्थिक विकासाला चालना मिळेल. विशेषतः मागासवर्गीय आणि दलितांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. शिक्षणाच्या संधी सर्वांसाठी समान झाल्याने समाजाच्या एकूण शैक्षणिक दर्जात सुधारणा होईल. जातीय भेदभाव समाप्त झाल्याने समाजात न्याय आणि समानतेची भावना प्रबळ होईल. त्यामुळे अन्याय आणि अत्याचाराच्या घटना कमी होतील. जातीय तणाव आणि संघर्ष कमी झाल्याने राजकीय स्थैर्य निर्माण होईल. यामुळे शासनाच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी सुलभ होईल. जातीअंत साधण्यासाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्तरावर व्यापक सुधारणा आवश्यक आहेत. समाजाच्या प्रत्येक घटकाने जातीय भेदभावाविरुद्ध आवाज उठवून आणि समानतेच्या तत्त्वांचा अंगीकार करून योगदान देणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या कृतीतून जातीय समानता आणि बंधुतेच्या तत्त्वांना प्रोत्साहन दिले पाहिजे. यामुळेच खऱ्या अर्थाने समतावादी आणि प्रगत समाजाची निर्मिती होऊ शकेल. सामाजिक चळवळी मागे पडून जातीच्या चळवळी पुढे येण्याची कारणे आणि त्याचे सामाजिक परिणाम एकमेकांशी गुंतलेले आहेत. जातीच्या चळवळींनी समाजातील असमानता आणि अन्यायाच्या समस्यांवर लक्ष केंद्रीत केले आहे, पण त्याचवेळी सामाजिक तणाव आणि विभाजनाची समस्याही वाढवली आहे. या चळवळींना सामाजिक एकता आणि विकास साधण्यासाठी सकारात्मक दिशेने वळवणे महत्त्वाचे आहे. समाजाने जातीपार असलेल्या मूल्यांना जपून, समता, न्याय आणि एकतेच्या दिशेने वाटचाल करावी, अशी अपेक्षा आहे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# शिक्षण महाग झालंय...?



दिनेश संन्यासी
जालना

आधुनिक केसरी

**जास्त फीस + जास्त सुविधा = चांगलं शिक्षण. हे आजच्या पालकांचं शिक्षण घेण्याविषयीच समीकरण झालं आहे. या गोष्टी उत्तम दर्जाच्या पुरवल्या गेल्या नाहीत तर पालक म्हणून आपण कमी पडतो आहोत की काय? अशी भावना पालकांच्याही मनात येत असेलच. चारचौघात सांगताना आमचा मुलगा/मुलगी मराठी माध्यमाच्या किंवा इंग्रजी माध्यमाच्या साध्या शाळेत शिकतो/शिकते आहे हे सांगायला कमीपणाचे देखील वाटत असेल. आर्थिक परिस्थिती उत्तम किंवा अत्युत्तम असेल तर खर्च करायला हरकत देखील नाही. परंतु परिस्थिती साधारण असेल तर अशा पालकांनी काय करावे? एक पगार असणाऱ्या घरात किंवा एकच व्यक्ती कमावती असलेल्या घरात प्रापंचिक इतर व्यापांसोबत तडजोड करत नाकी नऊ येत असतानाच, जास्त फीसची (मोठी) शाळा असणं आणि त्यासोबत क्लासेसही... खरंच आवश्यक आहेत का? त्याला दुसरा पर्याय नाहीच का ?**

इंग्रजी माध्यमाच्या शाळांना विरोध करणे किंवा खासगी क्लासेसला विरोध करणे हा माझ्या लेखाचा भाग नाही. शिक्षणाचं व्यावसायिकीकरण हा सर्वांना माहिती असलेला भाग आहे. केवळ पैसा खर्च केला म्हणजेच चांगलं शिक्षण मिळू शकते अन्यथा नाही, अशी मानसिकता जर समाजाची तयार झाली तर गरीब, सामान्य, सर्वसामान्य, मध्यमवर्गीय लोकांत न्यूनगंडाची भावना सतत असेल. अशा कुटुंबांतील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास कमी असेल. परिस्थितीवर रडत बसण्यात किंवा कुणालाही दोष देण्यात (शाळा, शिक्षक किंवा शासन) अर्थ नाही. यात केवळ वेळ वाया जाणार. तोपर्यंत आपल्या पाल्यांचा शिक्षणाचा कालावधी निघून जाणार. म्हणून थोडा वेळ दिला, सातत्य ठेवलं, उपायात्मक विचार केला, थोडी शिस्त ठेवली व विश्वास बाळगला तर कठीण काहीच नाही. कारण कोणत्याही शाळा किंवा शिकवण्यामध्ये, केवळ विषयांची संकल्पना आपापल्या स्तरानुसार स्पष्ट करून मिळते, बुद्धिमत्ता वाढवून मिळत नाही.

आजकाल जवळपास सर्वच पालक शाळेच्या ॲडमिशन सोबत क्लासेसचेही ॲडमिशन करूनच घरी येतात आणि स्वतःला पालक म्हणून कर्तव्यातून मुक्त झाल्याची भावना बाळगतात. क्लासेस लावणं व कुणाकडे लावणं हा व्यक्तिगत विषय आहे. यात फक्त थोडा वेगळा विचार मी एवढाच करायला सांगेल की, शाळेत शिकवतच नाही असे होत नाही. पद्धत आणि दृष्टिकोन वेगळा असतो. यात विद्यार्थी हा शिक्षक आणि पालक दोघांमध्ये स्वतःला वाचवण्याच्या (अभ्यास किंवा शिक्षेच्या) दृष्टीने गैरसंवाद घडवून आणू शकतात (आणतातही). म्हणून शिक्षक आणि पालक यात सातत्याने संवाद राहिला पाहिजे. आपल्या पाल्याला नेमकी काय अडचण आहे हे समजून घेऊन केवळ त्यासाठीच आवश्यकता असेल तर शिक्षकांच्या सल्ल्याने क्लास लावला तर जास्त योग्य राहील. आहे त्या स्तरापर्यंत पोहोचण्यासाठी काय करणे आवश्यक आहे हे पालक आणि विद्यार्थी दोघांना कळेल. यामुळे पैसा, मेहनत आणि वेळ तिन्ही वाचतील.

आम्हाला मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नाही, त्यांच्या अभ्यासातलं आम्हाला काही कळत नाही, मुलं सांगितलेलं ऐकत नाही, आम्ही आमची कामे करावीत का यांच्याकडे लक्ष द्यावे, अशा सबबी किमान सुशिक्षित पालकांनी तरी सांगू नयेत. (लग्न करताना सुशिक्षितपणा पाहिला जातो, शिक्षण बघितलं जातं. भविष्यात या शिक्षणाचा उपयोग केवळ मुलांना शाळेत सोडण्यासाठी आणि क्लासेसहून घेऊन येण्यासाठी होतो का?) मुले घरी आल्यानंतर (विशेषतः अशिक्षित) पालकांनी केवळ दोन प्रश्न मुलांना विचारावेत, शाळेत जे समजलं ते समजावून सांग आणि नाही समजलं ते वहीवर लिही. उद्या सरांची सही आण. मुलांबाबत पालकांनी एकमत राहून लाड आणि शिस्त यात घालमेल करता कामा नये.

आपल्या पाल्याकडून आपण किती अपेक्षा ठेवाव्यात याचा विचार पालकांनी करायला हवा. केवळ स्पर्धा वाढली आहे म्हणून त्याला पळवण्यात अर्थ नाही. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात हे सर्वांना माहिती आहे ना, मग त्या पायांना त्याच्या बुद्धिमत्तेनुसार पळण्याची दिशा द्यायला हवी. नऊ बुद्धिमत्तांपैकी कुठली जास्त आहे याचा विचार आधीच झाला तरच उत्तम. नाहीतर आंब्याच्या झाडाला फणस येण्याची वाट बघण्यात अर्थ तो काय? अपेक्षाभंग तर होणारच ना! मुलांची जडणघडण होण्यात सामाजिक, भौतिक वातावरणासोबत अनुवंशिक गुणांचाही परिणाम असतो. आपल्यातले चांगले गुण आपल्या पाल्यांमध्ये आल्यानंतर पालकांना आनंद होतो ना! अवगुणही त्याच्यात येतीलच बरका!! **क्रमशः**



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संविधान वाचवण्यासाठी आणि बहुजनांसाठी मी लढेन

## खा. प्रतिभा धानोरकर : ओबीसी एससी एसटी व सामाजिक संघटनांतर्फे भव्य नागरी सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** 22 जून 2024 रोजी चंद्रपूरच्या नवनिर्वाचित खासदार प्रतिभा धानोरकर यांचे चंद्रपूर येथील प्रियदर्शनी सभागृहात राष्ट्रीय ओबीसी महासंघ, अनुसूचित जाती जमाती आणि सामाजिक संघटनांच्या वतीने भव्य नागरी स्वागत करण्यात आले.

यावेळी झालेल्या लोकसभा निवडणुकीत केवळ चंद्रपूरच नाही तर महाराष्ट्रात आणि देशात ओबीसी महासंघ आणि बहुजन एकता यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे देशात प्रचंड राजकीय बदल पाहायला मिळाले. त्याचप्रमाणे चंद्रपुरातही यावेळी ओबीसी आणि बहुजन संघटनांनी प्रतिभा बळुभाऊ धानोरकर यांच्या मागे सर्व ताकद लावली होती, त्याचा परिणाम म्हणजे भाजपचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्राचे मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विरोधात प्रतिभा धानोरकर 2,60,000 हून अधिक मतांनी विजयी झाल्या. या विजयानंतर प्रथमच राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे चंद्रपुरात त्यांच्या सत्कारासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमाचा मुख्य कार्यक्रम म्हणून प्रास्ताविक करताना राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सरचिटणीस सचिन राजूरकर म्हणाले की, आज ओबीसींनी संघटित होऊन आपली ताकद दाखवण्याची गरज आहे. वारंवार आश्वासन देऊनही शासनाने अद्याप आमच्या समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची व्यवस्था केलेली नाही, त्यामुळे ओबीसी मुलांना शिक्षण घेणे कठीण होत असल्याचेही ते म्हणाले. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, नवनिर्वाचित खासदाराने ओबीसी समाजासाठी काम करणे गरजेचे असून समाजाचा आवाज दिल्लीच्या संसदेपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे, तरच आम्ही ओबीसी समाजाचे काम करू. न्याय मिळवण्यास सक्षम व्हा.

यानंतर नवनिर्वाचित खासदार प्रतिभा बालुभाऊ धानोरकर यांचे राष्ट्रीय ओबीसी महासंघ व 40 हून अधिक संघटनांच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. या सत्काराने भारावून गेलेल्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी सत्काराला उत्तर देताना आपल्या भाषणात मी विकासाच्या मुद्द्यावर निवडून आलेले नाही, संविधान वाचवण्यासाठी ही लढाई लढल्याचे सांगितले. आज संपूर्ण देश हुकूमशाहीविरुद्ध लढत आहे. इतर समाज आरक्षणासाठी आपली लढाई लढत आहेत, त्यांना आरक्षण मिळाले पाहिजे पण ओबीसींना नाही, असे झाल्यास आम्ही रस्त्यावर उतरून आमच्या न्यायासाठी लढू. केंद्रात ओबीसींचे स्वतंत्र मंत्रालय आणि ओबीसी शिष्यवृत्तीसाठी आपण लढणार असल्याचे त्यांनी सांगितले. आपला विजय हा ओबीसी एससी एसटीचा विजय असून बहुजनच आपल्या विजयाचे खरे शिल्पकार असल्याचे त्यांनी सांगितले. मला 7 लाख मते मिळाली असली तरी मी चंद्रपूर लोकसभेच्या सर्व 18 लाख मतदारांची प्रतिनिधी असून सर्वांसाठी काम करणार असल्याचे त्या म्हणाल्या.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष बबनराव तायवडे, शिक्षक आमदार सुधाकर अडबाले,सरचिटणीस सचिन राजूरकर, बबनराव फंड, दिनेश चोखरे, प्रमोद बोरीकर, जयदीप रोडे यांच्यासह सत्कारमूर्ती प्रतिभा बाळुभाऊ धानोरकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन प्रदीप पावडे यांनी केले तर आभार प्रदर्शन सतीश भिवगडे, रितेश गंधारे, राजेश नायडू,पपू देशमुख, अशोक नागापुरे, आकाश साखरकर,देवराव दिवसे, अमित उमरे, राजू हिवंज ,राजूरकर, रतन शिलावार, रवी टोंगे, गणेश आवारी, नंदू लभाने प्रेमा जोगी, अजय बलकी यांनी केले. कृष्णा मसराम, मनीषा बोबडे, रजनी मोरे, पौर्णिमा मेहकुरे, आदींनी अथक परिश्रम घेतले.

# आ. सतीश चव्हाण यांच्याकडून पाडळी येथे भजनी मंडळास साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**खुलताबाद :** तालुक्यातील पाडळी येथे आ. सतीश चव्हाण याच्या संकल्पनेतुन पाडळी येथे टाळ विना पेटी पकवाज भजनी मडळा देण्यात आले उपस्थित भजनी मडळ महिला मडळ व गावकरी मंडळी भिमराव घुगरे बाबासाहेब गायके पवन गायके पुडलीक आहेवाड भाऊसाहेब आहेवाड रामदास आहेवाड ज्ञानेश्वर आहेवाड बडु पठान राहुल गायके योगेश गायके सुनिताताई आहेवाड भरत काळे सजय वहाटुळे सकाराम नलावडे सुगदेव गायकवाड सोमीनाथ गायकवाड पवन काळे कचरू दादा सजु बापु रामकुष्ण आहेवाड व गावकरी उपस्थित होते.



# शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात येथे योग दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे जय कालंका देवी शिक्षण प्रसारक संस्था संचलित कै. लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील कला वाणिज्य विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय व छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा यांच्या संयुक्त विद्यमाने योगा प्रशिक्षक भास्कर खमाट व विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळेस योगाभ्यासावर प्रा जीवन कोलते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले की अभ्यासाबरोबरच आपल्याला निरोगी व आनंदी जीवन जगण्यासाठी दररोज व्यायाम व योग का आवश्यक आहे 21 जून हा दिवसच योग दिवस का साजरा करतात याबद्दल विद्यार्थ्यांना सांगितले की ,प्राचीन योगविद्येचा समृद्ध वारसा भारताला मिळाला आहे. योगा हे जणू भारताला मिळालेले मोठे वरदान आहे, असे म्हटले तरी ते चुकीचे ठरणार नाही. भारताने जगाला योगाची ओळख करून दिली आणि जगभरात योगाचा प्रसार केला. योगाला आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष ओळख मिळाली आहे.जगभरातील लोकांना योगाचे महत्व पटवून देण्यासाठी आणि योगाप्रती लोकांना जागरूक करण्यासाठी दरवर्षी २१ जून हा दिवस जगभरात ‘आंतरराष्ट्रीय योग दिन’ म्हणून साजरा केला जातो. २०१४ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत योग दिनाचा प्रस्ताव मांडला.त्यानंतर, हा प्रस्ताव स्विकारण्यात आला आणि योग दिनासाठी २१ जून ही तारीख निवडण्यात आली, तेव्हापासून आजतागायत हा ‘आंतरराष्ट्रीय योग दिन’ मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.२१ जून रोजी हा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. तेव्हा दरवर्षी हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा होतो व योगाचे सर्व महत्व विद्यार्थ्यांना सांगितले त्यामध्ये आज प्रशिक्षक यांनी अनुलोम-विलोम,कपालभाती शीर्षासन व इतर सर्व योग आज घेण्यात आले शिक्षक व विद्यार्थी यांनी प्रशिक्षक यांचे टाळ्याच्या गजरात आभार मानले यावेळेस शाळेतील शिक्षक भास्कर ससाने संजय जोशी मुकुंदा व्यवहारे जयराम घोती भूषण देसले दीपक सपाटे बाबासाहेब कोलते बाळू खडके मयूर रावळकर रामचंद्र चिमणकर ज्येष्ठ पत्रकार तथा विभागीय संपादक गोकुळसिंग राजपूत, रहीम पठाण व गावातील पालक उपस्थित होते.अशी माहिती प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी बोलताना सांगितले आहे.



# अपुलिया शिखर परिषदेची फलश्रुती



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**जी-७ परिषदेनंतर प्रसारित करण्यात आलेल्या ६८ कलमी घोषणापत्रात युद्ध व तणाव कमी करण्यावर तसेच हवामान बदल, आणि समकालीन समस्यांना सामोरे जाण्यासाठी सहमती व सहकार्यावर आधारित भागीदारीवर भर देण्यात आला आहे. विकसनशील देशांचे सहाय्य घेतल्याशिवाय व त्यांना मदत केल्याशिवाय नवे जग सुरक्षित होऊ शकत नाही. हाच या शिखर परिषदेचा संदेश होय. ५०वी जी - ७ शिखर परिषद १३ ते १५ जून दरम्यान इटलीतील अपुलिया येथे फासानो शहरात पार पडली. बोर्गो एग्राझिया या परिसरात भव्य शामियान्यात या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.**

या परिषदेतील विचारमंथन हे जगातील ज्वलंत प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर दिशादर्शक ठरले आहे. तिसऱ्यांदा निवडून आलेले भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परिषदेत अत्यंत उपयुक्त, दिशादर्शक आणि जबाबदार पाऊल टाकले आहे. विशेषतः जगापुढचे प्रश्न, संवाद आणि मुत्सद्देगिरी (डायलॉग आणि डिप्लोमसी) या तंत्राने सोडविले जाऊ शकतात हे त्यांचे सैद्धांतिक सूत्र त्यांनी पुन्हा एकदा प्रभावीपणे नव्या जगापुढे मांडले आहे. या शिखर परिषदेमध्ये भारताचा हा ११वा सहभाग आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा ५वा सहभाग होता. परंतु या शिखर परिषदेत आऊटरिच सदस्य असूनही भारताने उत्तम कामगिरी करून आपला दबदबा कसा वाढविला हे समजून घेणे अगत्याचे आहे. रशियाने गोठविलेले ५० कोटी डॉलर्स युक्रेनला परत करावेत असा आग्रहही या परिषदेत पाश्चात्य राष्ट्रांनी धरला आहे. विशेषतः रशिया - युक्रेन युद्ध आणि हमास - इस्त्राईल युद्ध या पार्श्वभूमीवर त्यांची ही भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. जगातील वाढते ताणतणाव आणि अस्थिरता कशा पद्धतीने रोखता येईल का याबाबत या परिषदेतील बोलणी ही फलदायी ठरली आहे. भारताने विशेषतः चीनला प्रतिशह देऊन जी - ७ राष्ट्रांसह आर्थिक विकासाचा कॉरिडॉर तयार करून भूमी मार्गाने भारतापासून युरोपपर्यंत परस्परांना जोडण्याचा नवा आर्थिक विकासाचा मार्ग तयार करण्याचा संकल्प केला आहे. चीनने जगाला आर्थिक विळखा घालण्याचे तंत्र सुरू केल्यापासून त्याला विचारपूर्वक प्रत्युत्तर देण्यासाठी जे काही करता येईल ते भारताने अत्यंत काळजीपूर्वक आणि गांभीर्याने करण्यास सुरूवात केली आहे. हे चाबहार बंदराने स्पष्ट केले आणि आता जी-७ शिखर परिषदेच्या व्यासपीठाचा उपयोग करून प्रमुख युरोपातील देशांमध्ये भूमार्गाने एकमेकांना जोडण्याची कल्पना अत्यंत महत्त्वाची असून त्यामुळे चीनला चांगला प्रतिशह बसणार आहे. जी-७ राष्ट्रांची ही शिखर परिषद का, कशी व कुठल्या अर्थाने महत्त्वाची आहे याचा विचार प्रस्तुत लेखामध्ये केला आहे.

**बदलते जागतिक परिदृश्य :** या घोषणापत्रात असे म्हटले आहे की, आम्ही आमच्या काळातील महत्त्वाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी एकत्र आणि इतरांसोबत निष्ठेने काम करीत आहोत. हा विश्वास व्यक्त करून, युक्रेन व हमास प्रश्नावर बोलणी करून शांततेने तोडगा काढण्यावर भर देण्यात आला. आफ्रिकेत पायाभूत सुविधांचा विकास आणि विकसनशील देशांना शाश्वत विकासासाठी सहकार्य यावरही सदस्यांनी प्रकाश टाकला. त्यांच्या उद्दिष्ट आणि अभिसरणास अनुसरून यथायोग्य निर्णयाची परंपरा परिषदेने कायम राखली आहे. उपयुक्त शिखर परिषदेतील विचारमंथन भूराजनैतिकदृष्टीने सत्ता समतोलासाठी पूरक ठरले आहे. गेल्या काही दिवसात जगाचे राजकारण झपाट्याने बदलत आहे. खुद्द अमेरिकेतील अस्थिरता, रशियामधील बंडाळी आणि चीनमधील अंतर्गत कलह या कारणांमुळे महासत्ता म्हणवणाऱ्या देशांवरसुद्धा अस्थिरतेची छाया पसरली आहे. या परिषदेतील ६८ कलमांचे संयुक्त पत्रक अमेरिकेच्या व्हाईट हाऊसने प्रकाशित केले आहे. त्याच्या सारांश पत्रिकेत म्हटले आहे की, राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि जी - ७ नेते इटलीतील अपुलिया येथे शिखर परिषदेत एकजूटीने उभे राहिले. वर्तमान काळातील परिक्षांना सामोरे जाण्यासाठी धाडसी पावले या परिषदेने उचलली आहेत. युक्रेनच्या स्वातंत्र्याच्या लढ्याला पाठिंबा देणे आणि रशियाच्या युद्धाची किंमत वाढविणे अन्यायकारक आर्थिक व्यवहारांना मागे टाकणे, हवामान संकट आणि अन्न आणि आरोग्य सुरक्षितता



सर्वांच्या फायद्यासाठी गंभीर तंत्रज्ञानाचा योग्य वापर करणे आणि त्यांच्या भविष्यात गुंतवणूक करणाऱ्या विकसनशील देशांना समर्थन देण्यासाठी जगभरातील भागीदारांसोबत काम करणे यावर या परिषदेत श्रद्धाभाव प्रकट करण्यात आला. परिषदेतील संयुक्त घोषणा पत्रात युक्रेनच्या भविष्याचे समर्थन, आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षा व समृद्धीला हातभार यावर भर देण्यात आला. गाझामध्ये सर्वसमावेशक करारासाठी आवाहन करण्यात आले आहे. आर्थिक लवचिकता आणि आर्थिक सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्याचे ठरविण्यात आले आहे. गंभीर आणि संवेदनशील तंत्रज्ञानाचे संरक्षण करण्यावर भर दिला आहे. विकसनशील देशांना भविष्यात गुंतवणूक करण्यासाठी भागीदारीस प्रोत्साहन देण्याचे ठरले तसेच जागतिक कर्जाचे अडथळे दूर करणे या मुद्यांचाही त्यात समावेश आहे.

**लंगड्या बदकांची कहाणी :** इटली वगळता अन्य जी-७ सदस्य राष्ट्रांमधील निवडणुका व्हावयाच्या आहेत. तेथे कमालीची अस्थिरता आहे. महागाई बेकारी इत्यादी आर्थिक संकटेही भेडसावत आहेत. तेथील निवडणुकांचे पडघम वाजत आहेत. ४ जुलै रोजी इंग्लंडमध्ये ऋषी सुनक निवडणुकीला सामोरे जातील आणि नोव्हेंबर महिन्यात बायडेन यांना अमेरिकेच्या अध्यक्षीय पदाची निवडणूक लढवावी लागेल. हीच गोष्ट थोड्याफार फरकाने जपान, जर्मनी, फ्रान्स या देशांमध्ये आहे. तेव्हा जॉर्जिया मेलोनी यांनी निमंत्रित केलेली ही ७ राष्ट्रांची परिषद म्हणजे मेलोनी आणि लंगडी बदके असे त्याचे वर्णन केले जात आहे. ते अंशतः खरे आहे. कारण जी-७ राष्ट्रे पुढे येणाऱ्या निवडणुकीत काय होईल या चिंतेने ग्रासली आहेत. शिवाय युद्धाने जर्जर झालेल्या अर्थकारणात भरडली जात आहेत. त्यांना इंधन प्रश्न, दुबळी पुरवठा साखळी, आणि हवामान बदलासारख्या समस्यांनी ग्रासले आहे. या सर्व प्रश्नांवर सहकार्य व सहमतीने मात करण्याचा संकल्प या परिषदेच्या संयुक्त पत्रकात करण्यात आला आहे.

**स्थलांतरीतांचा प्रश्नः** युरोपिय संसदेच्या निवडणुकीतील मंथन आणि गेल्या ५-६ वर्षातील डोकेदुखी बनलेला स्थलांतरीतांचा प्रश्न जी-७ शिखर परिषदेपुढे एक महत्त्वाचा मुद्दा म्हणून पुढे आला. स्थलांतरीतांच्या पुनर्वसनासाठी एक कोश तयार करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. इंग्लंडचे जे धोरण होते त्याचाच काहीसा विस्तार स्थलांतर प्रश्नी या शिखर परिषदेने केला असल्याचा दिसतो. युरोपातील शांतता, सुव्यवस्था आणि सुशासन बिघडविणारा हा प्रश्न या जगातील श्रीमंत व समृद्ध राष्ट्रांपुढे एक आव्हान बनला आहे. ६८ कलमी संयुक्त घोषणापत्रासुद्धा स्थलांतर प्रश्नाचा ऊहापोह करण्यात आला आहे. स्थलांतराच्या प्रश्नावर एकमताने घेतलेला निर्णय हा सामुदायिक जाणिवांचा एक महत्त्वाचा भाग होय.

**युक्रेन प्रश्न हा केंद्रबिंदू :** जी-७ शिखर परिषदेचा केंद्रबिंदु युक्रेनमधील लांबत असलेला तणाव हाच होता. युद्धाभोवती युक्रेनच्या प्रश्नावर चतुराईने, मुत्सद्देपणाने निर्णय घ्यावा ही भारताची भूमिका आहे. त्यामुळे हा प्रश्न ताणतणावाने, युद्धाने सुटणार नाही. त्यासाठी चर्चा, विचारमंथन व सुसंवादाची गरज आहे, अशी भारताची भूमिका होती. आता स्वित्झर्लंडमध्ये युक्रेन प्रश्नावर बोलणी चालू आहेत. तेव्हा जी-७ परिषदेच्या निमित्ताने भारताने या प्रश्नावर विचारमंथन घडवून सुसंवादातून प्रश्न सोडविण्याकडे सर्व नेत्यांचा कल वळविला आहे. हे भारताचे राजनैतिक यश म्हणावे लागेल.

स्वित्झर्लंडमध्ये होणाऱ्या संभाव्य शिखर परिषदेमध्ये जगातील प्रमुख जी-७ देशांनी एकत्र येऊन युक्रेन - रशियातील संघर्ष थांबविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. भारताने या सकारात्मक पावलाचे स्वागत केले आहे आणि भारतसुद्धा याच मताचा आहे की, सर्वांनी सामोपचाराने, चतुराईने, मुत्सद्देगिरीने, सुसंवादाने हा प्रश्न सोडविला पाहिजे. कारण जीवित आणि वित्तहानी वाढणे हे जगाला तसेही परवडणारे नाही. पंतप्रधान मोदी यांनी युक्रेनचे अध्यक्ष ब्लादिमोर झेलेन्स्की यांची भेट घेतली व त्यांच्याशी चर्चा केली. युक्रेन प्रमाणेच इस्त्राईल- हमास युद्धबंदी करून पॅलेस्टाईनच्या पुनर्रचनेस प्राधान्य देण्यावर जी-७ परिषदेने भर दिला आहे.

**भारत-इटली सहकार्याचे नवे पर्वः** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जॉर्जिया मेलोनी या आपल्या इटलीच्या समपदस्थ नेत्यांशी अनेक प्रश्नांवर चर्चा केली. विशेषतः भारत-इटली दरम्यान आर्थिक, सांस्कृतिक, राजनैतिक सहकार्याच्यादृष्टीने चांगला आढावा घेण्यात आला. अलिकडे, पर्यटन, शिक्षण व संशोधन, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता अशा अनेक क्षेत्रात भारत आणि इटली परस्पर सहकार्याच्यादृष्टीने अधिक जवळ आले आहेत. तेव्हा उभय देशांमधील मैत्रीपूर्ण व सुसंवादी वातावरण हे मुक्त व्यापार तसेच आर्थिक आणि सांस्कृतिक सहकार्यासाठी महत्त्वाचे आहे. राजनैतिक पातळी प्रमाणेच लोकपातळीवरील संपर्कसुद्धा वर्धिष्णु आणि सतत विकसित होत जाणार आहेत. त्यामुळे पंतप्रधानांचा हा इटली दौरा खरोखरच बहुआयामीदृष्टीने फलदायी ठरला आहे असे म्हणावे लागेल. उपस्थित असलेल्या सर्व जी-७ नेत्यांशी सुसंवाद साधून अनेक प्रश्नांवर सहमती निर्माण करण्यात भारताला यश आले आहे.

**समारोपः** या सर्व चर्चेचे सार असे की, भारत जी - ७ राष्ट्राचा विशेष निमंत्रित (आऊटरिच ) सदस्य असला तरीदेखील भारताची वाढती शक्ती आणि सामर्थ्य यामुळे जी-७ परिषदेत भारताची भूमिका महत्त्वपूर्ण आणि प्रभावी ठरली आहे. तसेच या परिषदेने कृत्रिम बुद्धिमत्ता, ऊर्जा, आफ्रिकन सहभाग, प्रशांत व भूमध्य सागरातील सुरक्षा या सर्व विषयांवर कार्यकारी सत्रामध्ये पोषक चर्चा करण्यात आली. इतिहासातील निर्णायक क्षणी जागतिक आव्हानांना तोंड देण्याच्या त्यांच्या निर्धारावर जी - ७ राष्ट्रांनी भर दिला आहे. लाल समुद्रातील चीनच्या वर्चस्वाला औद्योगिक धोरणे आणि सुरक्षित वाटचालीवर भर देऊन नवा भूमार्ग तयार करण्याचा संकल्प करण्यात आला. विशेषतः जी-७ राष्ट्रे लंगड्या बदकांसारखी क्षीण झालेली असताना भारत मात्र एखाद्या स्वयंभू सिंहासारखा गर्जत आहे. भारताचे हे वाढते सामर्थ्य युरोप आणि अमेरिकेच्या डोळ्यात खुपत असले तरीदेखील भारताची वाढती शक्ती ही एक सर्वमान्य बाब ठरत आहे. कारण भूमध्य समुद्र व प्रशांत सागर तसेच हिंद सागर क्षेत्रात चीनला शह देण्यासाठी जी-७ राष्ट्रांना भारताचे सहाय्य घेणे अपरिहार्य ठरले आहे. लवकरच, भारत, जपान आणि जर्मनीला मागे टाकून जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होईल तेव्हा जी-७ सर्व राष्ट्र भारताला अधिक सन्मानाने वागवतील. कॅनडाचे जस्टिन ट्रूडो आणि जपानचे किशिदा यांच्या सोबतची चर्चा भारताला अधिक फलदायी ठरणार आहे.

# सामाजिक जाणीवा वाढवणाऱ्या कविता

आधुनिक केसरी

**अनिता मेस्त्री या महिला मंडळ बाल विकास केंद्र प्राथमिक शाळा, कुर्ला या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थी विकासासाठी त्या अंतःकरणपूर्वक त्या सतत प्रयत्नशील असतात. त्यासाठी विविध उपक्रम त्या मुलांसोबत, शिक्षकांसोबत राबवत असतात. विविध प्रकारचे लेखन यानिमित्ताने त्या करीत असतात. सर्वोत्कृष्ट शाळा म्हणून त्यांच्या शाळेचा अनेकदा सन्मान झालेला आहे. त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक, साहित्यिक व सांस्कृतिक कार्याबद्दल 'आदर्श मुख्याध्यापिका' म्हणून त्यांचा यथोचित गौरवही झालेला आहे. अशा उपक्रमशील, विद्यार्थीप्रिय, कर्तव्यदक्ष आणि साहित्याची जाण असलेल्या मुख्याध्यापिका अनिता मेस्त्री या संवेदनशील कवयित्रीसुद्धा आहेत.**



त्यांच्या कवितांनाही अनेक पारितोषिकं प्राप्त झालेली आहेत. सणासमारंभाच्या निमित्ताने त्यांनी लिहिलेल्या काही प्रासंगिक कविता माझ्या वाचनात आलेल्या आहेत . त्या कविता अतिशय तरल, वाचनीय आणि तितक्याच चिंतनशील असतात, याचा कैकदा प्रत्यय आलेला आहे. आता 'आनंदयात्री मी' हा नवीन कवितासंग्रह घेऊन त्या वाचकांच्या भेटीला येत आहेत. त्यांची ही काव्यमय शब्दभेट वाचकांना नक्कीच वाचनानंद देणारी, सकारात्मक विचारांकडे नेणारी आणि सामाजिक जाणीवा वाढवणारी आहे, हे निश्चित !

त्यांच्या कवितेत नेमके काय आहे? हे सांगण्यासाठी त्यांच्याच कवितांच्या ओळी मला महत्त्वाच्या वाटतात. 'माझी बोली... माझी कविता' या कवितेत त्या म्हणतात, बोलीत माझ्या गवसे, कथा अन् कविता सांगावया जनांसी, माझ्या मनातील व्यथा

आणखी एका ठिकाणी त्या म्हणतात,


***अंतिम कविता म्हणजे,***
***अखंड ऊर्जा स्त्रोत***
***सहज सुंदर जीवनाचा,***
***जणू परिपूर्ण मधुघट***

तर ***'माझी लेखणी'*** या कवितेतून या गोष्टींचा आपल्याला पुन्हा प्रत्यय येतो, सुखदुःख नैराश्य असो अघटीत लेखणीतून व्यस्त शब्दही अकल्पित

खरंतर, मनातील भावभावनांना अलवारपणे शब्दांतून व्यक्त करणारी त्यांची कविता वाचकांना नवनवीन विचारांचं अवकाश देणारी आहे, जगण्याचं भान जपणारी आहे.

'निसर्ग माझा सखा सोबती' या कवितेतून त्या पर्यावरण संतुलन जपण्याचा महत्त्वाचा संदेश देतात. त्या म्हणतात,

***निसर्ग आहे खरा मानवाचा श्वास***
***मानवाला मात्र प्रगतीची आस***
***स्वार्थीपणात होतोय निसर्गाचा***




***ऱ्हास***
***जागा हो मानवा हाच क्षण खास***

ज्यावेळी मानव खऱ्या अर्थाने जागा होईल साऱ्यांसाठीच खास होईल. केवढा हा व्यापक विचार.

'पळस' या कवितेतून त्यांचे शब्द पळसाचे मूर्तीमंत्र चित्रच आपल्यासमोर रेखाटतात.

***पानगळी नंतर होईल निष्पर्ण झाड***
***वाटे अस्तित्व त्याचे संपेल पार***
***नसता ध्यानीमनी पुन्हा उभार***
***नयनरम्य पळस रंगोत्सव छान***

दुःखानंतर येते सुख हीच जगण्याची रीत, हा जीवनाचा अर्थ नकळत या कवितेतून उलगडत जातो. 'माय माऊली' बद्दल व्यक्त होताना कवयित्री म्हणतात,

***धैर्याचा हुंकार, माझी माय माऊली***
***क्रांतीचा एल्गार, माझी माय माऊली.***

आईतला वेळप्रसंगी निर्माण होणारा करारीपणा सांगायला त्यांची कविता विसरत नाही.

'गुरुमहिमा' वर्णन करताना कवयित्री म्हणतात,

***गुरु म्हणजे ज्ञानाचा प्रकाश***
***संस्कारांचे तेजोमय आकाश***
***गुरु म्हणजे अथांग सागर***
***भवसागर तारणारा माझा आधार***

तर 'आली दिवाळी' या कवितेतल्या ओळीही मनात घर करून राहतात. ***सगळीकडे झगमगाटी वातावरण... तरीही कवयित्रीला प्रश्न पडतात,***

***पण सारीच घरे होतात का प्रकाशमान?***
***की अजूनही आहे दीना घरी अंधार?***
***कशी संपेल ही विषमता?***
***मिटतील कशा साऱ्या चिंता?***

एवढा मोठा हा सर्वांना व्यापून उरणारा समानतेचा, एकतेचा, बंधुतेचा विचार कवयित्री अगदी सहजतेने सांगून जातात.

एकूणच अनिता मेस्त्री यांच्या कविता संस्कार आणि संस्कृती, कुटुंब, पती-पत्नी, मैत्री यावर भाष्य करून सामाजिक भान जागवणाऱ्या आहेत. त्यांच्या अभिनव दिंडी, हेचि दान या चिंतनाची बैठक लाभलेल्या भक्तिपर कविता लक्षवेधक आहेत. प्रतीक्षा, वंदन सेवाव्रतींना, महामानव या देशभक्तीपर कविता आपल्याला नवा विचार देतात. थोडक्यात सांगायचे झाले तर, आनंद पेरत जाणारा, जीवन मूल्यांची कास कसोशीने जपणारा आणि सजगता, माणुसकी, संवेदनशीलता या यांसारख्या सद्गुणांचा परिपोष करणारा अनिता मेस्त्री यांचा 'आनंदयात्री मी' हा कवितासंग्रह सर्वांनी वाचावा, इतरांनाही वाचायला द्यावा असाच आहे. या सुंदर काव्यनिर्मितीसाठी अनिता मेस्त्री यांचे आपण मनापासून अभिनंदन करायला हवे.

**पुस्तकाचे नाव -**
**कवयित्री - अनिता मेस्त्री**
**प्रकाशन - उमंग प्रकाशन**
**पृष्ठे - ७६ , किंमत - २५०/- रुपये**

**एकनाथ आव्हाड**
**साहित्य अकादमी बालसाहित्य**
**पुरस्कारप्राप्त कवी, ९८२१७७७९६८**

# तुका म्हणे आतां बोलों अबोलणें । काया वाचा मनें उरलों नाहीं ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**मराठी भाषेला सापडलेले अनमोल रत्न म्हणजे तुकोबांची सानुभव अभंग गाथा! तुकाराम गाथा म्हणजे मराठी भाषेचा प्रथम वेद! वेद म्हणजे जाणणे. मराठी माणसाला जाण आणि भान देणारा अनमोल ग्रंथ म्हणजे तुकोबांची गाथा! तुकोबा एक संत, एक कवी, शेतकरी, वाणी, व्यापारी आदिकरून संसाराला विटलेला एक जर्जर सामान्य संसारिक माणूस! असे असल्यामुळेच तुकोबा तुमचे माझे हृदयस्थ जिवलग होतात. त्यांचं आणि आपलं जगणं सारखंच. फक्त फरक एवढाच की; ते जगतांना लवकर जागरू झाले आहेत आणि आपल्या डोळ्यांवरची झापडी अजून पूर्णपणे निघाली नाही. उणेपुरे अवघे ४२ वर्षे जगलेले तुकोबाराय किती जणांना जागवून गेले आणि आज किती जणांना जगवत आहेत(?) याचा विचार आपणही करू शकता.**

असे संघर्षशील जीवन व्यतीत केल्यामुळेच तुकोबाराय सामांन्यातून असामान्य मनुष्यत्व सिद्ध करून गेले. तुकोबांचे आचारन आणि त्या आधारे विचार करण्याची शैली जगावेगळी आणि अद्भुत असली पाहिजे. सामान्य माणूस आपले जीवन सरळ मार्गाने जगत असतांना वाटेत आलेल्या अडथळे, संकटांना घाबरून आपल्याच नशिबाला दोष देत राहतो. तुकोबा मात्र नशीब वगैरे काही न मानता सरळ एका अलौकिक शक्तीशी संवाद साधतात. त्यांचा संवाद म्हणजे देवाकडे भिक मागण्यासाठी नव्हता. देवाच्या दिव्यत्व उंचीबरोबर स्वतःला घेऊन जाऊन त्याच्याशी संवाद करण्याची क्षमता त्यांनी स्वतःमध्ये निर्माण केली होती यात तिळमात्र शंका नाही. त्यासाठी ते नेहमी पंढरपूरला गेले नाहीत, तर आपल्याच शेतातील श्री विठ्ठलाला ते रात्रंदिवस संवादी झाले. तुकोबा-विठ्ठल या दोघांचा अपरोक्ष संवाद रात्रंदिवस चालूच असायचा. देवाशी संवाद साधण्यासाठी माणसामध्ये तेवढ्या उंचीचे दिव्यत्व येणे क्रमप्राप्त आहे. याच अनुषंगाने तुकोबांची दृष्टी आणि वृत्ती दिव्य झाली असावी. सुदैवाने ती दृष्टी तुकोबांच्या अभंगाद्वारे आपल्यासमोर आज उपलब्ध असून तिचा सर्वांनी लाभ घेणे गरजेचे वाटते.

तुकोबांना मानवी जगण्याचे खरे ब्रह्मज्ञान कळले होते. तुकोबा केवळ भजनकरी, संत किंवा वारकरी नव्हते, ते होते एक कृतीशील, दृष्टा विचारवंत. त्यांच्या विचार आणि त्याला जोडलेल्या कीर्तन वाणीतून मानवाच्या अनंत पैलूचे दर्शन होते. त्यांनी आपल्या चिंतनीय अभंगातून मानवी जगण्याचे गूढ उकललेले गाथ्यात जागोजागी भेटत राहते. आज आपण सर्व सुखसोयी अनुभवत असल्यामुळेच आपल्याला तुकोबांच्या अभंगांची सहजासहजी अनुभूती होत नाही. ज्यांचे शरीर तंदुरुस्त आहे, सर्व व्यवहार स्वतः पाहत आहेत आणि त्यांच्याकडून समाज-कुटुंबाला हवे ते मिळते आहे त्यांचे वर्तमान आणि ज्यांचे शरीर गलितगात्र झाले आहे, स्वतःचे स्वतःला काम करता येत नाही, त्यांच्यावाचून कुणाचे काही अडत नाही; अशा वयस्कर, अनुभवी, चिंतनशील माणसांना एकदा भेटा! या दोन्ही माणसांत जमीन-अस्मानचे अंतर आढळून येईल. पहिला माणूस हवेत असेल तर दुसऱ्याची सगळी हवा गेलेली आहे. माझ्याशिवाय




पान हलत नाही-पहिला, मला पानाएवढीपण किंमत नाही-दुसरा! जीवन आनंदी असले तरी पावलोपावली अनंत खडतर आव्हाने उभी आहेत. अशा कठीण काळात माणसाला तुकोबांचे अभंग सुकाणू म्हणून काम करतात. त्यासाठी तुकाराम नीती या दृष्टीने विचार करतांना तुकोबांचे


**अवघ्या भूतांचें केलें संतर्पण । अवघीच दान दिली भूमि ॥१॥ अवघाचि काळ दिन रात्र शुद्धी । साधियेली विधि पर्वकाळ ॥ध्रु.॥ अवघींच तीर्थे व्रतें केले याग । अवघेंचि सांग जालें कर्म ॥२॥ अवघेचि फळ आलें आम्हां हातां । अवघेचि अनंता समर्पीलें ॥३॥ तुका म्हणे आतां बोलों अबोलणें । काया वाचा मनें उरलों नाहीं ॥४॥ (१२८९)**

असे एकेक अभंग विचार करायला आणि जीवन जगायला बळ देत असतात. हा अभंग मोठा मजेशीर आहे. संतर्पण करणे म्हणजे शांती करणे. भुते म्हणजे माणसाच्या मागे लागलेली विविध दुषणे आणि भूषणे. या सर्वांना तुकोबांनी तिलांजली दिली आहे. एवढेच काय आपली स्थायी मालमत्ता आहे ती सुद्धा दान म्हणजे सोडून दिली आहे. काळ जिंकला आहे. रात्रंदिवस, अंतर्बाह्य केवळ विशुद्ध विचार घेऊन तुकोबाराय जीवन जगतांना प्रत्येक कृती ही आपण ठरवलेल्या वेळात करणे म्हणजे त्यांच्यासाठी मोठा पर्वकाळ आहे. जेवढी काही सनातन कर्मे आहेत जसे की यज्ञ-याग, तीर्थ-वृत्त, कर्मकांड इत्यादी त्यांनी केली आहेत. तुकोबांना हे सगळे स्वतःतच सापडले आहे. आपल्या शेतातील श्री विठ्ठल-रुक्मिणी, आपली वारकरी परंपरा आणि भंडारा-भामनाथ माळ! इथे तुकोबांना वरील सर्वच बाबींचे पूर्णतः ज्ञान झाले आहे. आता त्यांना कोणतेही तीर्थ किंवा वृत्त करायची आवश्यकता नाही. याचा परिपाक म्हणजे जीवनात पाहिजे ती सर्वच फळे त्यांना प्राप्त आहेत. एवढे सर्वकाही मिळवूनही तुकोबा ज्याचे आहे त्यालाच समर्पित करतात. तुकोबांची ही नैराश्यातून झालेली विमनस्क अवस्था नसून त्यांना मानवी जीवनाबरोबरच सर्व बाबी मनोमन शून्य झाल्या आहेत. जगतांना आणि आव्हाने पेलतांना तुकोबांनी अंतर्मनाचा सखोल आवाज ऐकला आहे. इथे तुकोबांच्या गाथा चिंतनाने आपल्याला आत्मचिंतन करण्याची सुवर्ण संधी प्राप्त झाली आहे. तुकोबांचे शब्द म्हणजे उच्च आणि उत्तम प्रतीचे टॉनिक आहे. ज्यांनी ज्यांनी हे टॉनिक वेळीच आणि सर्वकाळ सोबत ठेवले त्यांना त्यांना जीवनातील छोटे मोठे रोग त्रासदायक होत नाहीत. अभंगात शेवटी तुकोबाराय स्वतःकडे काहीच ठेवत नाहीत. एवढेच काय? त्यांनी बोलणे सुद्धा थांबवले असून ते अबोलने हा त्यांचा धर्म झाला आहे. स्पीच इज सिल्व्हर, सायलेन्स इज गोल्डन! याची तुकोबांना जाण झाली आहे. त्यासाठी आता त्यांनी माणसांना बोलणे बंद केले असून, एकतर ते स्वतःला बोलतात अन्यथा श्री विठ्ठल! त्यासाठी "काया, वाचा, मन" या तिन्ही दृष्टीने ते शिल्लक राहिले नाहीत. इथे तुकोबा शून्य झाले आहेत.

प्रिय वाचक माय-बापहो, माणसाचे शेवटी काय होणार आहे? थकलेला माणूस जसा हतबल (हेल्पलेस) होतो, त्याच्या हातचे काही रहात नाही, तेंव्हा त्याला सत्कर्म वगैरे आठवते; परंतु तेंव्हा फार उशीर झालेला असतो. बाण निघून गेलेला असतो. हातात काहीच शिल्लक नसते, तेंव्हा आठवण होऊन काय उपयोग? यासाठी तुकोबाराय आपल्याला सोबती करून घ्यायचे आहेत. हळूहळू, छोटी छोटी सत्कर्म करत करत स्वतःला येथून वेगळे करायला प्रारंभ करावा लागेल. मान्य आहे की, सर्वांनाच सर्वसंग परित्याग करून किंवा संबोधि सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्यासारखे गृहत्याग करणे शक्य नाही आणि तो करूही नये. तो काळ आणि तत्कालीन बुद्धासमोरील आव्हाने काय( ?) याचे सखोल चिंतन करून जगले पाहिजे. त्यासाठी आपण व्यर्थ चिंता न करता योग्य चिंतन केले पाहिजे. संधी मिळेल तेंव्हा स्वतःसह आपला भोवताल सजग केला पाहिजे. माणसांशी संवाद वाढवतांना त्यांच्या सुख-दुःखात गेले पाहिजे. याचे कारण म्हणजे माणसाचे जीवन क्षणभंगुर आहे. आज कुणावर वेळ आहे तर उद्या आपल्यावर येणार नाही कशावरून? त्यासाठी जगद्गुरू तुकोबांच्या अभंगांची नीतीपूर्ण संगती आपला हात धरून पलीकडे नक्कीच घेऊन जाणार यात मला तिळमात्र शंका वाटत नाही.

तुकाराम नीती लिहितांना वाचकांचा उदंड प्रतिसाद आणि प्रकशित करणारे, सुप्रसिद्ध दै.आधुनिक केसरीचे संपादक, मित्रवर्य डॉ.प्रभुजी गोरे यांचे अनमोल सहकार्य तेवढेच महत्वपूर्ण आहे. एका लेखानंतर लोकांचे होणारे संपर्क आणि त्यातून मिळणारी प्रचंड उर्जा आणखी लिहायला बळ देवून जात आहे. माय-बाप वाचकांनी या तुकाराम नीतीला भरभरून प्रतिसाद दिला आहे. तुकाराम नीती आपली स्वतःची जीवन नीती करणे सर्वकाळ काळाची नितांत गरज वाटते. तुकाराम नीतीतून माहिती होणारे तुकोबांचे अनमोल शब्द आपल्याला जगण्यासाठी नित्य बळ देतात. सर्वकाळ तुकोबांची सांगत लाभल्यामुळे माणूस मनाने मजबूत-खंबीर होतो. तुकोबांचे जीवनाकडे पाहण्याचे, भक्ती, तीर्थ-वृत्त आदिकडे पाहण्याचे विचार आपल्याला पथदर्शी होतात. याचा मला भरपूर लाभ होत आहे. तसाच लाभ आपणासही व्हावा, आपल्या भोवतालच्या लोकांना व्हावा म्हणून आपणही या लेखनाला आपल्या लोकांपर्यंत पोहोचवाल ही माफक अपेक्षा! धन्यवाद! जय तुकोबाराय!

# सुनील उबाळे यांचं अस्वस्थ काव्य 'उलट्या कडीचं घर'



रविंद्र साळवे
संपर्क क्र. 9822262003

आधुनिक केसरी

**इथल्या व्यवस्थेचे पाय धरून मला लिहिताच आले नाही एखादी सुगंधी कविता ..मी इथल्या व्यवस्थेच्या तोंडावर थुंकून सांगून देईल माझ्या आतील घुसमट या ओळी आहेत कवी सुनील उबाळे यांच्या 'उलट्या कडीचं घर' या काव्यसंग्रहातल्या. मे 2024 मध्ये हा काव्यसंग्रह मराठी साहित्य विश्वात दाखल झाला आहे. त्यांच्या कवितेने श्रमिक, कष्टकऱ्यांच्या, दलितांच्या, व्यवस्थेने नाकारलेल्या उपेक्षित वर्गाच्या जगण्याला उजागर केले आहे. या संग्रहाच्या पानापानात सुनील यांनी अस्वस्थ शब्दाची पेरणी केली आहे. जगण्याचं भयान वास्तव शब्दात मांडलं आहे. अनुभवातून आलेली कलाकृती नेहमीच सरस असते. दुःखाची तीव्रता ज्यांच्या ज्यांच्या वाट्याला आली तिला सत्याचे प्रमाण असते. कवी सुनील उबाळे यांच्या कविते मध्ये याचीच अनुभूती येते.**

या कवितेत सुनील यांनी त्यांचं अस्सल जगणे मांडल्याने त्या वाचताना मनाला भावतात. 'भाकर' या रचनेत मी मोठा होत गेलो तिला पकडता पकडता तिला पकडता पकडता हसणे, रडणे राहून गेले तिला पकडता पकडता खेळणे, कुदणे राहून गेले. छत्रपती संभाजी नगर मध्ये गत अनेक वर्षापासून 'एक ओळ लिहिली ती राहिली पाहिजे माझ्या नंतर ही' हे ब्रीद घेऊन सुनील आणि त्यांच्या मित्रांनी अनेकांना लिहिता केलं. अनेकांच्या कवितांचा आस्वाद घेतला. कविता कशाला म्हणतात याची चर्चा केली. या काव्य साधनेतून सुनील यांना शब्द गवसले आणि कविता बहरत गेली. 'उलट्या कडीचं घर' मधून ती वाचकांच्या भेटीस आली. आयुष्य प्रवासात हाती पाटी आणि पेन्शील यायला हवी त्या वयात कष्ट आले. पोटा पाण्याचा संघर्ष आला. सोबतच अवतीभवतीच्या कष्टकरी लोकांच्या जगण्याने सुनील यांना शहाणं केलं. 'परिस्थिती माणसाला अकाली शहाणे करते' म्हणतात ते असंच. परिस्थिती पाठीवर रोज रट्टा मारत असते. धडे देत असते. पाठ्यपुस्तकातल्या कवी लेखकांच्या धड्याइतकेच ते सशक्त असतात तर कधी कधी त्याहून अधिक सरस असतात.

सुनीलच्या हाती रंगांचा ब्रश, रोलर, कलर, शिडी आणि दोरी आली. रोज नवे अनुभव आले. जगण्याच्या प्रश्नाचे उत्तर सोडवताना घुसमट आली. आणि त्यांनी शब्दाशी लळा लावला. स्वतःला लिहिता केलं. शब्द काळजातून कागदावर ओघळले त्याची कविता झाली ती अशी.. पण खरं सांगु यात कविताच नव्हती एकही ही सारी घुसमट होती ज्याला कविता म्हटलं कोणी तरी आणि मी कवी झालो (माणसं गेल्यावर जड होतात)

या काव्यसंग्रहातील मनोगत सुनील उबाळे यांनी जे लिहिले तेही विलक्षण आहे. ते लिहितात 'खरंतर आपण साधारण घराला रंग देणारी माणसं. त्यातही कष्टकऱ्यांच्या वस्तीतच आपला जन्म. पडत झडत झालेली सुरुवात, हाताला लागल ते काम करत करत वाढत गेलेलं वय, दिवसभर झालेले मान, अपमान खिशात सही सलामत सांभाळण्याचे हुन्नर.
कळत नव्हतं तोवर वेगवेगळ्या नात्यांच्या
गळाला लागून
झालेली फरफट,
रडून ऐकत आणि
हसून तमाशा करणारी
जमात कायमच
जत्रेसारखी भरलेली.
आपण विश्वासानं
कुणाला सांगावा
आणि भरुन जाव्यात
मनाच्या साऱ्या जखमा
अशी एकही व्यक्ती
वस्तीत दिसत नव्हती.
चोवीस तास नशेत आणि
कष्टात राबणारी माणसे
समाजाच्या परिघाबाहेर
उभी असतात कायमच.
त्यांना नसती किंमत आणि
त्यांना काढूनही टाकता येत
नाही कायमचं लोकांची
गू मुत काढणारी माणसं
कधीच चिटकू देत नाही
मी पणा अंगाला. खरंतर
येथूनच सुरवात होते माझ्या
कवितेची.'

पुढे कवितेच्या प्रत्येक पानातून तेच झिरपत राहते, वाचकांचे डोळे पाणावते. 'उलट्या कडीचं घर' मधल्या सर्वच रचना मुक्तछंदात आहेत. एकूण 83 कविता यात आहेत. कवी पी. विठ्ठल यांनी या काव्यसंग्रहावर समर्पक अभिप्राय नोंदविला आहे. ते लिहितात ' इतिहास भूगोलाची हजारो पाने वाचून जे कळले नसते ते या कवीने अनुभवातून आत्मसात केले आहे' सोबतच 'आपला सांस्कृतिक अवकाश सर्वार्थाने प्रदूषित होत असल्याच्या काळात इतक्या नितळपणे आत्मभान राखून विवेकाने समकाळाला प्रतिसाद देणे ही सोपी गोष्ट नाही'




आपण दान करतो आणि गाजवाजा करतो यावर सुनील यांनी 'माझं सारं अस्तित्व' या कवितेमध्ये

**आयुष्याची मूठ कधीच**
**उघडता कामा नये**
**आणि ही फकिरी लक्षात**
**येण्याआधी**
**नामशेष होऊन जावं**
**माझं सारं अस्तित्व**

असं भन्नाट लिहिले आहे. 'घर उपाशी झोपू नये म्हणून' होणारी रोजची धावपळ सुनील च्या कवितेत उतरली आहे ती अशी

**जगण्याचे कितीतरी**
**प्रश्न**
**काळजाच्या खिशात**
**खेळतात**
**दोन चार रुपयांच्या**
**चिल्लरीगत**
**(उन्हाच्या साऱ्या**
**कहाण्या)**

सुनीलच्या प्रत्येक रचनेत सुंदर आशय आहे. आता हेच बघाना..'वेदनेचे महाकाय जंगल' मध्ये ते लिहितात..

**माझ्या काळजातून**
**उडालेली**
**फुलपाखरे**
**काळाच्या**
**माथ्यावर भरतील**
**समानतेचा रंग**

तर दुसऱ्या एका 'आपल्या पोलादी हाताने' या कवितेत

**माझ्या अंगावर दगड भिरकावणारे**
**हातही मीच मजबूत केले होते**
**कधीकाळी याच पद्धतीने**
**मी माणसाची मने दुखवून**
**कधीच उधळले नाहीत**
**पाखरांसाठी दाणे**
**फुलपाखरांची घरटी तोडून**
**कधीच बांधली नाहीत**
**माणसांसाठी घरे**

अशा एकाहून एक सरस रचना या काव्यसंग्रहात आहेत.

**मी जाईल म्हणजे कायमचा जाणार नाही**
**तुमच्यातून माझ्या प्रत्येक कवितेतून**
**तुम्ही मला बोलू शकता**
**बघू शकता (आपणच शेवटचं पहात**
**असतो)**

अस्वस्थतेच्या कैक प्रहरी आत्महत्येचे विचार आले असतांना मग 'दिवसभर बैलासारखं राबल्यावर ही' या कवितेत सुनील इथल्या शोषकी व्यवस्थेचा भयान चेहरा उघडा करतात. वाचणाऱ्याला स्तब्ध करतात ते असं

**रात्रभर डोळ्याला डोळा लागत नाही**
**आत्महत्येची कितीतरी पत्रे**
**लिहिली आणि फाडून टाकली**
**बिनघोर झोपलेल्या मुलींना पाहून**

आयुष्य प्रवासात कवितेला सांगून झाल्यावर आपल्याला वेगळं काही सांगायचं नाही असा हा कवी म्हणतो. त्याची कविता त्याच्या जीवनाचा आरसा आहे. आरशाला बिलगून असलेला पारा आणि जीवनाला बिलगून असलेलं दुःख सारखेच असल्याचं सुनील उबाळे सांगतात. अतिशय सुंदर आशय असलेल्या या कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ सरदार जाधव यांनी काढले आहे तर कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबादच्या वतीने हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे. सुनील उबाळे यांच्या या दमदार काव्यकृतीचे मराठी साहित्य विश्व स्वागत करेल ही अपेक्षा आहे.

# ऐसियाचा पदर धरा | जेणे देव येईल घरा || ऐसिया पदराचे धनी | साधू संत ऋषिमुनी ||



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**अगदी लहानपणापासून आपल्याला कोणाचं तरी बोट धरून चालण्याची सवय झालेली असते. त्यामुळे आपण आधाराशिवाय ना जीवन जगू शकत, ना कोणता निर्णय घेऊ शकत, ना कुठलेही कार्य करू शकत. प्रत्येक मनुष्याला आधाराची गरज असते. परंतु आपल्याकडे विवेक नसेल, संयम नसेल तर आपला खरा आधार कोण आहे याची ओळख पटणार नाही व आपलं जीवन फसल्याशिवाय राहणार नाही. म्हणून आपण दैनंदिन जीवनामध्ये सुद्धा आधार घेत असताना, शरण जात असताना विवेक बुद्धी जागृत ठेवूनच आपण शरण जायला हवं. समोरील व्यक्तीला खरंच माझं हित व्हावं असं वाटतं का ?त्यांचा आधार घेतल्याने त्यांच्या मार्गदर्शनानुसार चालल्यामुळे माझ्या जीवनाची जीवन नौका खरंच पार होणार आहे का?**

हे पडताळून पाहिल्याशिवाय आपण शरण जाता कामा नये. त्यासाठी आपल्याला संतांची मदत लागते. तसं पाहिलं तर हे कलियुग सुरू आहे. प्रत्येकाला असं वाटतं या कलियुगाचे असंच होणार आहे. फसवा फसवी ही होणार आहे .हे असंच जग चालू राहणार आहे .परंतु हे असं जरी चालू असलं तर कलयुग म्हणजे कलेचे युग आहे. ज्याच्या अंगामध्ये कला आहेत तोच हा भवसागर तरुण जाणार आहे. मग माणसं ओळखलं ही सुद्धा एक कलाच आहे. ज्याला माणसं ओळखता आली, आपल्या अवतीभवती असणारी माणसं ज्याला समजली म्हणजे त्याची संगत चांगली असेल तर त्याचं जीवन सुखकारक व्हायला वेळ लागत नाही. म्हणून आपण संगत निवडताना आधार निवडताना एक पाऊल जरी मागेपुढे झाला तरी आपल्याला योग्य मार्ग सापडणार नाही. म्हणून आपण फार वाहवत न जाता थोडंसं संयमान, विवेकानं, विचारानं निर्णय घ्यायला हवा. या कलियुगामध्ये जीवन इतकं फास्ट होऊन गेलेलं आहे की व्यक्तीला स्वतःला द्यायला वेळ नाही, समोरच्याला द्यायला वेळ नाही, स्वतःला समजून घ्यायला वेळ नाही तर आपल्या सोबतच्या असणाऱ्या व्यक्तींना आपण कधी समजून घेणार आणि स्वतः प्रत्येक गोष्ट केल्यामुळे बौद्धिक ताण जास्त निर्माण झाल्यामुळे मनाची अवस्था बिघडलेली आहे. मनाला संयम माहित नाही , विवेक माहित नाही त्यामुळे मन कायम अस्वस्थ झालेला आहे. परंतु अंतर्मनातली जी सुखाची ओढ असते ती मात्र स्वस्थ बसू देत नाही .त्या ओढीसाठी माणूस धडपडत असतो, प्रयत्न करत असतो. मग एक क्षण असा येतो की माणूस विचार न करता अविचारीपणानेच कोणालाही शरण जातो. कोणी सांगेल ते कार्य करायला तयार होतो. त्यांच्या मागे धावत जातो. आणि अनेक वर्षे उलटून गेल्यावर मग समजतं अरे आपण फसलो गेलो .आपण चुकलं गेलो आपण या मार्गाने जायला नको होतं. आपल्याला सुख तर मिळालच नाही, आनंद तर मिळालाच नाही पण आपण हे सगळं करण्यामध्ये स्वतःच्या आयुष्याची मात्र फरफट करून घेतलेली आहे. हे जेव्हा लक्षात येतं तेव्हा वेळ निघून गेलेली असते. म्हणून संत सांगतात सावध होय बापा | काळ लागला से मापा मापा || पण सावध कुठे झालं पाहिजे? त्या क्षणी आपण सावध झालं पाहिजे आपण इतरांच्या बोलण्याने वाहत न जाता त्यांचं बोलणं त्यांचं सांगणं त्यांचं मार्गदर्शन माझ्या आयुष्यासाठी योग्य आहे की नाही याचा विचार झाला तरच आपल्याकडे विवेक निर्माण होईल आणि आपला आयुष्य अधिक सुंदर होण्यासाठी मदत होईल.

म्हणून आपण जसे म्हणतो विचार करून बोला, बोलून विचार करू नका. अगदी त्याच प्रमाणे संतांना शरण जाताना जो जीवा शिवाचं ऐक्य करून देईल व खऱ्या भगवंताची ओळख करून देईल, स्वतःची जीव दशा जाऊन स्व-स्वरूपाची ओळख करून देईल त्या संतांना आपण शरण गेलं पाहिजे.

आपल्या बुद्धी मध्ये निर्माण झालेला भ्रम काढून ब्रम्ह दाखवणारा संत महात्मा असतो. म्हणून माऊली म्हणतात, भ्रांतीपासून हिरतले गुरु वाक्य मन धुतले आत्मस्वरूपी घातले हरूनिया || म्हणून जो आपल्या भ्रांती कमी करतो आणि स्वस्वरूपाशी एकरूप करतो अशा संतांना आपण शरण जायला हवं कारण आपला खरा आनंद आपल्या स्वरूपामध्ये आहे परंतु आपण तो बाह्य गोष्टींमध्ये शोधतो आणि आपली फसगत होते. यालाच संत सांगतात त्या मार्गाप्रमाणे आपण चाललो तर आपल्याला दुःख होणार नाही. कारण ज्या ज्या गोष्टींना आपण महत्व दिलं ज्या ज्या गोष्टींचा विचार आपण केला ज्या बाह्य गोष्टींना आपण अधिक जपलं त्या आपल्याला त्रासदायक असतात. परंतु स्व स्वरूप असं आहे की ते आनंद स्वरूप आहे. आपण जर त्याच्या जवळ असेल तर आपण स्वर्ग सुखातच आहोत. आणि आपण स्वरूपापासून बाजूला गेलो बाह्य जगतामध्ये अडकलो तर आपण नरक यातना भोगत असतो. म्हणून आपल्याला संतांचा सहवास लाभला की संत आपण जे बहिर्मुख आहोत ते आपल्याला अंतर्मुख करण्याचा प्रयत्न करत असतात. कारण खरी भूक आपल्याला आतून लागलेली असते . तहान आतून लागलेली असते. आणि जेव्हा ती अन्न ते पाणी आत मध्ये जातं तेव्हाच हा जो शांत होत असतो खूप भूक लागली म्हणून कोणी अंगाला न चोळत नाही. खूप तहान लागली म्हणून कोणी अंगावरून पाणी ओतून घेत नाही. ते पाणी प्यावच लागतं. अन्न खावच लागतं . जेव्हा ते आत मध्ये जाईल तेव्हा जीव शांत होत असतो. म्हणून आपण जे आता बहिर्मुख आहोत ते आपण संतांच्या सहवासामुळे अंतर्मुख होतो. परंतु आपला जीव हा करंट आहे त्याला सद्विवेक नाही, विचार नाही, तुझा आहे तुझं पाशी परी तू जागा चुकलासी || हे जे संत सांगतात, ते काही चुकीचे नाही सुख आपल्याकडेच आहे. आनंद आपल्याकडेच आहे पण आपण सुख बाह्य गोष्टी शोधलं, आनंद बाह्य गोष्टी शोधला त्यामुळे हा जीव कधी सुखी होतच नाही. मनाची अस्वस्थता कधीच कमी होऊ शकत नाही. म्हणून मनाला शांत करायचं असेल, स्थिर करायचं असेल तर आपण अंतर्मुख व्हायला शिकलं पाहिजे. विचारांचा विचार आपण करायला शिकला पाहिजे. आपल्या विचारांमध्ये सूक्ष्मता निर्माण व्हायला पाहिजे जोपर्यंत विचारांमध्ये सूक्ष्मता निर्माण होत नाही तोपर्यंत आपल्याला ह्या रहाटगाड्यातून सुटण्याचा मार्ग सापडू शकत नाही. यालाच संत तुकाराम महाराज म्हणतात, व्हावे लहाना होणे लहान तुका म्हणे बर्वे जाण म्हणून खऱ्या स्वरूपाला जाणून घ्यायचं असेल खऱ्या आनंदाची प्राप्ती करून घ्यायचं असेल तर आपल्याला विचाराने सूक्ष्म व्हायला हवं. जर खऱ्या संतांची संगत आपल्याला लाभली तर आपल्या जीवनाची फरफट होणार नाही.



संत साहित्यातील तत्वज्ञान भाग -१२

त्यामुळे कबीर महाराज पण सांगतात, ऐसियाचा पदर धरा जेणे देव येईल घरा | ऐसी या पदराचे धनी साधू संत ऋषिमुनी || व्यवहारिक दृष्ट्या सुद्धा जगत असताना आपण जर दहा श्रीमंत माणसांच्या बरोबर उठभस करत असेल तर काही वर्षांनी अकरावा श्रीमंत आपण असतो. आणि जर आपण वाईट संगत असणाऱ्या माणसांची संगत करत असेल तर विचाराने आणि आचाराने वाईट असणारा पुढचा मनुष्य आपण बनत असतो. म्हणून आपली संगत कोणाची आहे ते फार महत्त्वाचा आहे. त्यालाच संत सांगतात, संगत करे साधू की तो हो जाये तो दो बात |संगत करे गधे की तो मिल जाये दो दो लात || त्यामुळे आयुष्य जगताना संगत फार महत्त्वाची असते. जर आपल्याला शेणातल्या किड्याची संगत असेल तर शेण खावं लागतं . जर आपल्याला मधमाशीची संगत असेल तर आपल्याला फुलांतील मकरंद खायला मिळतो व आपल्याला भगवंताच्या चरणाजवळ जाऊन मोक्षप्राप्ती मिळते. म्हणजे आपलं जीवन सार्थकी लागतं. म्हणून आपण विचाराने प्रत्येक गोष्टीला सामोरे गेलं तर जीवनात आनंद आहेच आहे. याला संत सांगतात, की विचारापुढे कोणतीही वस्तू टिकत नाही आणि विचार हे भगवंता पुढे टिकत नाहीत. कारण शब्द हा आकाशाचा गुण आहे. या शब्दांनाही सोडून शब्दातीत जो आहे तो आपल्याला जाणून घ्यायचा आहे. मग जो गुणातीत आहे, भावातीत आहे, वर्णनातीत आहे त्याला समजून घ्यायचा आहे. जाणून घ्यायचा आहे. मुळात परमार्थ हा काही प्राप्त करायचा विषय नाही. तर प्राप्तीची प्राप्ती करून देणारा असा हा परमार्थ आहे. आणि तो संतांना शरण गेल्याशिवाय आपल्याला कळत नाही. खरा परमार्थ म्हणजेच आपले आचार विचार उच्चार आणि दृष्टी यामध्ये बदल करणे होय. पण आपल्याला असं वाटतं पूजा पाठ करणे यज्ञ हवन करणे या गोष्टी करणे म्हणजे आपण परमार्थ करतो. त्याला संत सांगतात पोथी पढ पढ जगमोहा पंडित बना न कोय | ढाई अक्षर प्रेम के पढे तो पंडित होय || मग म्हणून आपण संतांना शरण गेलं पाहिजे. कारण भगवंताने सर्व चाव्या संता हाती दिलेल्या आहेत. आपल्याला संतांना तर आपल्या मनामध्ये निर्मळ भाव असला पाहिजे अंतकरणांमध्ये प्रेम असलं पाहिजे. तरच संतांचा म्हणणं आपल्याला कळेल. आपला संतांवर विश्वास नसेल भाव नसेल श्रद्धा नसेल तर आपलं जीवन दुःख मय झाल्याशिवाय राहणार नाही. कारण कर्णाचा सारथ्य करणारा हा शैल्य होता व अर्जुनाचा सारथ्य करणारा स्वतः भगवंत होता .त्यामुळे अर्जुनाच जीवन सार्थकी लागलं म्हणून आपण आपलं सारथ्य कोण करत आहे. आपण जर मनाच्या मार्गाने जात असेल तर आपल्या मनामध्ये शंका आल्याशिवाय राहणार नाही. आणि आपलं सारथ्य जर स्वतः भगवंत संत करत असतील तर आपण हा भवसागर तरुण गेल्याशिवाय राहणार नाही. म्हणून आपल्या जीवाची सोडवणूक करून देणारा आणि आपल्याला स्व स्वरूपाशी एकरूप करून देणाऱ्या अशा संतांना आपण शरण जायला पाहिजे. ज्याला स्व स्वरूप कळालं त्याला अख्ख ब्रह्मांड कळालं. कारण संत सांगतात "पिंडी ते ब्रह्मांडी" ज्याला स्वरूप कळालं नाही मी कोण कळालं नाही त्यांनी घेतलेल्या सगळ्या उपाध्या ह्या दुःख देणाऱ्याच आहेत. कारण त्यामुळे फक्त अहंकार वाढतो म्हणून आपण उपाधीच्या मागे न लागता आपल्या स्वस्वरूपाची ओळख करून घ्यायची म्हणजेच आपलं जीवन आनंदी होईल. त्यासाठी आपण सत्तांना शरण गेलं पाहिजे आपल्या मनामध्ये भक्ती भाव तयार झाला पाहिजे. जोपर्यंत मनात भक्ती भाव तयार होत नाही तोपर्यंत आपल्या अंतकरणांमध्ये प्रेम निर्माण होऊ शकत नाही आणि एकदा का आपल्या अंतकरणांमध्ये प्रेम निर्माण झालं की आपल्याला संपूर्ण चराचरसृष्टीमध्ये प्रत्येक गोष्टीमध्ये भगवंत दिसल्याशिवाय राहणार नाही. कारण सुईच्या टोकापासून ते संपूर्ण ब्रह्मांडापर्यंत भगवंत नाही अशी कोणतीच जागा नाही संपूर्ण आकाशाला सुद्धा व्यापून टाकणारा असा तो भगवंत एवढा विशाल आहे त्या भगवंताला जाणून घ्यायचा असेल तर आपला नम्र व्हावं लागेल म्हणून माऊली म्हणतात नम्र झाले होता त्याने कोंडीले अनंता.

# परीक्षा घेता की पाहता ?



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

आधुनिक केसरी

**गेल्या आठवड्यामध्ये झालेल्या दोन महत्त्वपूर्ण घटना यामुळे संपूर्ण देशच हादरला आहे. यातील पहिली घटना म्हणजे मेडिकल ला जाण्यासाठी आतुर असलेल्या मुलांनी दिलेली नीट ( NEET ) परीक्षा . यामध्ये प्रचंड घोटाळा झालेला असून भ्रष्टाचाराचा कळस म्हणून यातील काही विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण देत आम्हाला कोणालाच घाबरण्याची गरज नाही , आणि आमचं कोणीच काही वाकड करू शकत नाही हे भ्रष्टाचार्यांनी दाखवून दिले आहे . तर दुसरीकडे सीनियर लेक्चरर पदासाठी आवश्यक असलेली युजीसी द्वारे घेण्यात येणारी नेट ( NET ) परीक्षा सुद्धा दुसऱ्याच दिवशी पेपर फुटल्याच्या संशयावरून रद्द करण्यात आली.**

यामुळे प्राध्यापक पदासाठी आतुर असलेल्या हजारो विद्यार्थ्यांचे स्वप्नच धुळीला मिळाले . तर दुसऱ्या बाजूला नीट परीक्षेत झालेल्या घोटाळ्यामुळे ही परीक्षाच रद्द होते की काय असे संकट डोक्यावर असलेले हजारो विद्यार्थी आज टांगती तलवार डोक्यावर घेऊन न्यायालयाच्या निकालाची वाट पाहत बसलेले आहेत. मेडिकल ला जाणारे विद्यार्थी असो की प्राध्यापक व्हायसाठी स्वप्न पाहणारी तरुणाई असो हे सगळे विद्यार्थी अतिशय मन लावून प्रचंड मेहनतीने परिश्रम घेत असतात. आपलं स्वप्न पूर्ण व्हावं यासाठी ते सातत्याने झटत असतात . परंतु गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये सरकारी नोकरीसाठी घेण्यात येणाऱ्या विविध पदांच्या जेवढ्या परीक्षा झाल्या त्या प्रत्येकच परीक्षेमध्ये परीक्षा झाल्यानंतर पेपर फुटले या बातम्या समोर यायला लागल्या आणि एकूणच शासनाद्वारे , शासकीय पदभरती द्वारे घेण्यात येणाऱ्या परीक्षांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले . यात सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न असा उभा होतो की शासनाची एवढी मोठी यंत्रणा असून शासन स्वतःच्या यंत्रणेचा पूर्ण वापर करण्यापेक्षा शासन या परीक्षा घेण्यासाठी खाजगी यंत्रणांचा , खाजगी संस्थांचा , खाजगी कंपन्यांचा आधार का घेते आहे ? शासनाला स्वतःच्या यंत्रणेवर विश्वास नाही का ? एव्हढे मोठे प्रचंड सरकार आहे आणि साधी एक परीक्षा घेण्याची यंत्रणा आपण निर्माण करू शकत नाही की ज्यावर संपूर्ण समाजाचा विश्वास असेल ? आणि जर समजा तुम्हाला खाजगी संस्थांकडून किंवा कंपन्यांकडून मदत द्यायची असेल तर देशभरामध्ये एकही अशी कंपनी किंवा संस्था नाही का की जी विद्यार्थ्यांच्या स्वप्नांशी खेळणं थांबवेल ? या वारंवार होणाऱ्या प्रकारामुळे दुसरा महत्त्वाचा प्रश्न आता डोळ्यासमोर असा येतो आहे , एक संशय मनामध्ये येतोय की सरकारला बदनाम करायचं आहे याची एक मोहीमच मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय पातळीपासून तर देश पातळीतील गल्ली बोळा पर्यंत चाललेली आहे . याच प्रयत्नातला एक भाग म्हणून विरोधी पक्ष नेमक्या या सगळ्या परीक्षांना टार्गेट तर करत नाही आहे ना ? की जेणेकरून युवकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होईल आणि सरकार उलथून टाकण्यामध्ये त्यांचा हातभार आपल्याला लागेल . हे तर स्वप्न नसावं ना विरोधी पक्षाचं ? ही पण एक शंका आता अनेकांच्या मनामध्ये घर करायला लागलेली आहे . एका विशिष्ट दिशेला जाण्यासाठी म्हणून स्वतःच्या मेहनतीने कष्टाने परिश्रम करणारे तरुण जेव्हा त्यांच्या परीक्षेचे पेपर फुटले म्हणून परीक्षा रद्द केली हे त्यांना कळतं तेव्हा त्यांच्या मनावर काय परिणाम होत असेल याचा विचार कोणीतरी करत आहे का ? एमपीएससीची परीक्षा होते परंतु त्याचे निकाल तीन-चार वर्ष लागत नाहीत . निकाल लागले तर पोस्टिंग दोन दोन वर्षे मिळत नाही . हे सगळे नेमकं काय चाललंय ? याचा कोणीतरी गांभीर्याने विचार करणार आहे का? नुकतेच बारावीची परीक्षा देऊन ज्यांनी मेडिकलला जायचं स्वप्न बघितलं आणि त्यासाठी आवश्यक असलेली नीट ची परीक्षा दिली त्या विद्यार्थ्यांच्या मनावर या सगळ्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणामुळे नेमका काय परिणाम झाला असेल ? आणि ही कोवळ्या मनाची तरुण मुलं आता इथून पुढे या व्यवस्थेवर विश्वास ठेवेल का ? या संपूर्ण प्रकरणांमध्ये मुलांच्याच मानेसिकतेचा किंवा त्यांच्यावर होणाऱ्या आघाताचा परिणामांचा विचार न करता या मुलांच्या पाठीशी तितक्याच खंबीरपणे उभे असलेले त्यांचे आई-वडील , पालक जे पैशाने आणि कष्टाने सुद्धा प्रचंड मेहनत घेत असतात , पाण्यासारखा पैसा ओतला जातो त्या आई-वडिलांच्या स्वप्नांच काय ? याला जबाबदार कोण ? आपलं सरकार वाचावं किंवा निर्माण व्हावं म्हणून रातोरात दिल्ली, गुवाहाटी , मुंबई , दिल्ली असा प्रवास करणारे अत्यंत कार्यतत्पर असे हे सर्व पक्षांचे सर्व नेते मंडळी यांना या विद्यार्थ्यांच्या या सर्व परीक्षा ज्या सातत्याने गेल्या तीन-चार वर्षांमध्ये रद्द केल्या जात आहे , सातत्याने ज्यांचे पेपर फुटल्या जात आहे . इतक्याच कार्यतत्परतेनी या प्रकरणांमध्ये लक्ष का देत नाहीत ? प्रशासनाची यंत्रणा , शासनाची यंत्रणा कुठे कमी पडते आहे ? एवढ्या मोठ्या यंत्रणेला पेपर लीक कुठे होतो ? आणि कसा होतो ? हे लक्षात का येऊ नये ? आणि लक्षात आल असेल तर ज्यांनी हा पेपर लिक केला आहे , ज्याने हजारो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांशी खेळ केला त्याला भर चौकामध्ये फाशी का दिला जात नाही ? का दिली जाऊ नये ? हजारो लाखो विद्यार्थ्यांचे स्वप्न धुळीला मिळतात , यातले अनेक तरुण आत्महत्या करतात , याला जबाबदार हे पेपर लिक करणारे भ्रष्टाचारी लोक आहेत . या लोकांना कुठलीही तमा न बाळगता कायद्याच्या सगळ्या कसोट्या थोडा क्षणासाठी बाजूला ठेवून भर चौकात चार लोकांना फाशी द्या . त्याच्यानंतर पुन्हा कोणीही असे पेपर लीक करण्याची हिंमत करणार नाही . आणि पूर्ण परीक्षा सगळ्या सुरळीत व्हायला लागतील. लोकांनी हुकूमशाही म्हटले तरी चालेल. पण, तरुणांच्या स्वप्नांशी खेळणाऱ्या या अशा नीच प्रवृत्तीच्या लोकांना एकदा धडा शिकवायला हवा अशी आता सर्व पालकांचीच मागणी व्हायला लागलेली आहे. विद्यार्थी कंटाळलेत आता या सर्व परीक्षांना आणि वारंवार होणाऱ्या या पेपर फुटी ला सुद्धा. ज्या तत्परतेने सरकार बनावे म्हणून पहाटेचा शपथविधी सोहळा आटोपला जातो त्याच तत्परतेने जर या विद्यार्थ्यांच्या स्वप्नांनाशी खेळणाऱ्या , वारंवार पेपर फोडणार्यांना रातोरात अटक करून त्यांच्यावर कडक कारवाई होत नाही तोपर्यंत हे असंच सुरू राहणार . सगळ्याच परीक्षांचे पेपर लिक कसे होतात ? ते लिक झाले हे लगेच कस कळत ? लगेच कोर्टात याचिका दाखल कशी होते ? वकिलांचे पैसे कोण देतात ? कोर्टाची फी कोण भरते ? लगोलग प्रत्येक जिल्ह्यात हजारो विद्यार्थ्यांचे मोर्चे कसे काय निघतात ? हे सगळं ठरवून तर होत नाहीय ना ? याचा सुद्धा सरकारनी एकदा काय तो छडा लावायला हवा . या घटना साध्या नाहीत . यापाठीमागे नेम कोण आहे ? त्यांचा उद्देश काय ? हे तपासायला हवं . संशयाचे हे दाट होत चाललेले धुके आतातरी वेळ आहे तोवर दूर व्हायला हवेत . अन्यथा या तरुणाईच्या सळसळत्या उत्साहाचा कोणी गैरवापर करायला सुरुवात केली तर याचे परिणाम संपूर्ण देशाला भोगावे लागतील. एकीकडे आतंकवाद आणि नक्षलवाद संपविण्यासाठी देश पातळीवरून मोठ्या प्रमाणात चांगले प्रयत्न सुरू असतांना दुसऱ्या बाजूला या तरुणाईच्या स्वप्नांची होत चाललेली राख रांगोळी ही बारुद होऊ नये म्हणून हा लेखन प्रपंच.



# होय, संविधान बदलले जात आहे !



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**आज देशांमध्ये राजकारणाचे चित्र बदलले आहे. देशात भाजपला म्हणावे तेवढे यश मिळाले नाही. त्यांच्या लोकसभेच्या जागा खूप कमी आल्या.आम्ही चारशे पार करणार आहोत असे नारे बेंबीच्या देठापासून दिले जात होते. परंतु ते चारशे पार होऊ शकले तर नाहीतच नाही पण स्वबळावर सत्ताही निर्माण करू शकले नाहीत.नंतर ते म्हणतात की विरोधकांनी संविधान बदलणार आहेत असा अपप्रचार व नकारात्मक सूर मतदारांमध्ये पेरला. त्यांनी खोटा प्रचार केला. त्यामुळे मतदाराच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला म्हणून आम्हाला कमी जागा मिळाल्या.मविआ ला चांगल्या जागा मिळाल्या.**

खरेतर महागाई, बेरोजगारी, जातीय धर्मीय अन्याय अत्याचार, जुनी पेन्शन योजना, कॉन्ट्रॅक्ट पद्धत, अग्निवीर योजना अशा अनेक गोष्टींमुळे जनता एनडीए सरकारला कंटाळलेली होती. असे अनेक मुद्दे त्यांच्या पराभवासाठी कारणीभूत आहेत. महाराष्ट्रात मविआला खूप मोठ्या प्रमाणावर यश मिळाले असले तरी महाराष्ट्रात त्यांनीही आंबेडकरी चळवळीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. विशेषतः आंबेडकरी अनुयायांना लोकसभेच्या तिकिटापासून प्रचंड दूर ठेवले. त्यांचे मतदान मात्र त्यांना चालते. पण सत्तेत मात्र ते नको आहेत अशीच भूमिका त्यांचीही दिसते. आंबेडकरी नेत्यांनाही राजकारणात यश येताना दिसत नाही याचे त्यांनीही आत्मपरीक्षण करणे काळाची गरज आहे. समाजाला काही ना काहीतरी मिळवून देण्यासाठी सत्ता हस्तगत करणे किंवा सत्तेत आपण असणे हे गरजेचे असते किंवा आपण कुठल्या ना कुठल्या पदावर असावे लागते. वेळ काळाबरोबर आंबेडकरी विचार पुढे घेऊन जात राजकारण करायला हवे. आंबेडकरी राजकारण संपते की काय? ही भीती सर्वसामान्य राजकीय कार्यकर्त्यात, मतदारांमध्ये दिसत आहे. यावेळी तील आंबेडकरी चळवळीतील सामान्य कार्यकर्त्याने आंबेडकरी चळवळीतील मुख्य नेत्यांनाही बाजूला सारून मविला मतदान केल्याचे दिसते. कारण देशातली परिस्थिती भाजप सरकारने भयभीत केली होती. संविधान बदलणार याची भीतीही त्यांना होती. हे आंबेडकरी चळवळीतील नेत्यांनी वेळीच ओळखून सावरून योग्य दिशेने पावले टाकणे गरजेचे हवे होते.मविआनेही निवडणुकीतील यशाने जास्त हुरळून न जाता जमिनीवरच पाय ठेवायला हवेत. ज्यांनी मतदान केले त्यांच्या विश्वासालाही जगायला हवे.


राजकारणातील जातीवाद संपून आंबेडकरी अनुयायांनाही त्यामध्ये सामावून घ्यायला हवे. नुसते फुले शाहू आंबेडकरांचे नाव घेऊन भागणार नाही. मविआ एकीकडे संविधान बदलणार आहेत तो मुद्दा उपस्थित करते व आम्ही किती चांगले आहोत हे दाखवते आणि दुसरीकडे संविधान प्रेमी जे आहेत त्यांना डावलण्याचा प्रयत्नही करताना दिसते. खरे तर संविधान हे सर्वधर्मसमभाव निर्माण करणारे आहे. समता निर्माण करणारे आहे.हे मविआने लक्षात घ्यायला हवे. खरे तर आज महाराष्ट्रामध्ये राजकीय व इतर क्षेत्रांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर जातीयवाद पावलोपावली दिसून येतो. तो जातीयवाद विविध क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक जणांना गिळंकृत करतो आहे. जातीयतेच्या जोरावर अनेक जण खालच्या जातीतल्या लोकांना दाबून टाकताना दिसत आहेत. त्यांना त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यापासून दूर ठेवतानाही दिसत आहेत. आज सर्वच क्षेत्रात जातीयतेने घट्ट पाय रोवले आहेत. एनडीए सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सत्तेचा उपयोग केलेला दिसत नाही तर धर्मवादद व जातीवाद पेरण्यासाठीच केल्याचा दिसतो . याच जातीयतेमुळे ज्या जातीची लोकसंख्या कमी आहे त्यांना प्रचंड छळ सहन करावा लागतो आहे. खरे तर आपल्या देशात संविधान आहे. त्या संविधानाप्रमाणे अधिकाऱ्याने कर्मचाऱ्याने वागून सर्वांना, सर्वसामान्य जनतेला न्याय द्यायला हवा परंतु अधिकारीही जातीयवादी बनले असल्याने संविधानाची सतत मोडतोड करून त्यांच्याच उच्च जातीतील लोकांना न्याय देताना दिसत आहेत. त्यांनी अन्याय केला तरी त्यांनाच न्याय मिळताना दिसतो आहे. अशाप्रकारे संविधानाची सतत मोडतोड करताना हे दिसत आहे. म्हणूनच या आताच्या निवडणुकीत अनेक लोकांना पराभव पत्करावा लागला. हे राज्यकर्त्यांनी, लोकप्रतिनिधी सतत लक्षात ठेवायला हवे. खरे तर एनडीए सरकारने संविधानाची खूप मोठ्या प्रमाणावर मोडतोड करून जे संविधान मानवी कल्याण साधणारे आहे त्याच्या विरोधात काम केले आहे. जुनी पेन्शन योजना नाकारून सर्वसामान्य माणसांचे जीवन हिरावून घेतले आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवून शिक्षणाची वाट लावल्याचे दिसत आहेत. अशा काही मुद्द्याविषयी थोडक्यात चर्चा करणार आहे.

**१) जुनी पेन्शन योजना नाकारणे**

नोकरीत जे २००५ नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्या एनडीए म्हणजे भाजप सरकारने जुनी पेन्शन योजना नाकारून त्यांचे जीवन उद्ध्वस्त आणि मातीमोल करण्याचा घाट रचला आहे. भारतीय संविधानात पेन्शन दिली पाहिजे असे असतानाही हे सरकार बहुजनांचे उध्वस्तीकरण करणे चालूच आहे. कायद्याचा धाक दाखवून कायद्याची पायमल्ली करणेही जोरात सुरू आहे. ज्यांनी आयुष्यात नोकरीत आपले तीस तीस पस्तीस पस्तीस वर्ष घालवले आहेत. ईमाने इतबारे सेवा बजावली आहे त्यांचे आयुष्य नोकरी नंतर मातीमोल केले आहे. त्यांनी केलेल्या आंदोलनालाही सरकारने गुंडाळून ठेवले.

**२)भ्रष्टाचाराची कीड**

देशाला फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराची कीड लागली आहे. या भ्रष्टाचारात लोकप्रतिनिधी, अधिकारी व त्यांना पाठीशी घालणारे शासनही जबाबदार आहे. स्वार्थासाठी सत्तेचा दुरुपयोग करून गरिबांचे, सामान्य जनतेचे, कामगारांचे, नोकरदारांचे प्रचंड मोठ्या प्रमाणावर शोषण केले जाते. सर्व क्षेत्रात भ्रष्टाचारामुळे त्यांना कुठेही न्याय मिळताना दिसत नाही. सरकारचा वचकही या अधिकाऱ्यावर नाही. तक्रारीच्या चौकश्या केल्या जात नाहीत. भ्रष्टाचाराचे आरोप असणारांनाच क्लीन चिट देऊन आपल्या सत्ताधारी पक्षात घेतले जाते म्हणजे उलट त्यांनाच पाठीशी घातले जाते. त्यामुळे जनता वैतागली आहे. भारतीय संविधानात अशांना कायदेशीर कारवाई करून वचक बसवता येतो परंतु अधिकारीच एकमेकांना अभय देतात म्हणजेच गुन्हेगारांना साथ देताना दिसतात.




३)जातीयवादी हिंदुत्व

हिंदुत्वाच्या नावाखाली, राम मंदिराच्या नावाखाली देशात स्वतः सरकारच जातीयता, धर्मांधता, अंधश्रद्धा खूप मोठ्या प्रमाणावर पेरताना दिसत आहे. संसदेच्या उद्घाटन प्रसंगी, मंत्रालयात सरकार स्थापन करता वेळी व विविध सरकारी कार्यालयातही पूजाअर्चा, साधू संत यांचे प्राबल्य मुद्दामून वाढवले जात आहे. अशा अनेक घटनांच्या माध्यमातून सरकारने संविधानविरोधी कृत्य केली आहेत व सतत करताना दिसत आहे. त्यामुळे इतर धर्मातील सामान्य माणसांचे जीवन भयभीत झाले आहे. तळागाळातही तोच संदेश त्यांनी पोहोचविला असल्यामुळे जीवघेणा संघर्ष सामान्य जनतेला करावा लागतो आहे. आपला जीव मुठीत घेऊन मुश्किल केलेले जगणे कसेतरी सर्वसामान्य जगत आहे. त्यालाही जनता कंटाळली आहे. सर्वधर्मसमभाव ही भारतीय संविधानातील मूल्य, समतेचे तत्व गुंडाळून ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.

**४) बेरोजगारी**

देशाचा आधारस्तंभ असलेला तरुण याच्या हाताला कुठलेही काम नाही. नोकरभरती केली जात नाही. शासन जागा भरण्यास परवानगी देत नाही. त्यामुळे अनेकांचे जीवन उद्ध्वस्त झाले आहे. अनेकांचे वयही संपून गेले आहे. परीक्षा लांबणीवर टाकणे, पेपर फुटी प्रकरण घडणे, फीस जास्त घेणे, उद्योग धंदे दुसऱ्या राज्यात लावणे अशा अनेक गोष्टी या सरकारच्या काळात घडल्या गेल्या. त्यामुळे बेकायदेशीर कामे करणाऱ्या कुणावरही कारवाई होताना दिसत नाही.

**५) नवीन शैक्षणिक धोरण**

नवीन शैक्षणिक धोरणातील कौशल्यावर आधारित शिक्षणाच्या नावाखाली सर्वसामान्यांचे ज्ञानाचे शिक्षण काढून घेतले. भारतीय संविधानाने दिलेला अधिकार नाकारला. विद्यार्थ्यांच्या इच्छा,अपेक्षा,आकांक्षा व गुणवत्तेवर पाणी फिरवले. शाळा, कॉलेज बंद पडण्याची वेळ आणली गेली.नोकरभरती केली नसल्यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून दुरावला गेला. पालक, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची ओढ राहिलेली दिसत नाही. शिक्षणातून अंधश्रद्धा व जातीयता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे वगैरे अशा अनेक गोष्टींना हरताळ फासला. शिष्यवृत्ती, सवलती बंद केल्या. आणि कायदेशीर बाबींना हरताळ फासला.

**६) कॉन्ट्रॅक्ट /अग्नीवीर योजना**

देशाचे हिताचे रक्षण करणाऱ्या जवानांना केवळ पाच वर्षाची नोकरी दिली जाणार अशा प्रकारची अग्नीवीर योजना आणून त्यांच्या जीवनाची राख रांगोळी केली. बहुजनांना नोकरीत येऊच द्यायचे नाही व त्यांच्या जीवनाचे सोनेच करू द्यायचे नाही म्हणून कॉन्ट्रॅक्ट पद्धती व अशा योजना सरकारने जाणून-बुजून आखल्या. त्यांचा उदरनिर्वाह भागू नाही. त्यांनी गुलामगिरीतच जीवन जगावे हे षडयंत्र रचले.

**७) शिक्षणात मनुस्मृती आणणे**

शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृती, श्लोक लावून विषमता निर्माण करणे, जातीयता, धर्मांधता वाढविणे हे काम सरकार जोरदारपणे करताना दिसत आहे. शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृती, श्लोक आणून विद्यार्थ्यांची मने विषारी जातीयवादी बनविण्याचा सरकारचा डाव हा भारतीय संविधानातील समतेच्या तत्वाला तिलांजली देणारा आहे. भारताचा उत्कृष्ट नागरिक बनविणे ऐवजी त्यांच्यावर अशा प्रकारच्या माध्यमातून को संस्कार करून त्यांचे जीवन मातीमोल करण्याचा प्रयत्न हे सरकार करत आहे.

**८) उद्योगधंदे बाहेर राज्यात लावणे**

आपण टी. व्ही. चॅनल व विविध वृत्तपत्रातून उद्योगधंदे महाराष्ट्रातून बाहेरच्या राज्यात गेल्याच्या बातम्या ऐकल्या. काही महत्त्वाची कार्यालयेही बाहेरच्या राज्यात गेली. म्हणजे महाराष्ट्रातल्या माणसाचे जगणे हरामीचे करणे नव्हे काय? मानवाचे कल्याण साधने, त्यांना सोयी सुविधा पुरविणे हे सरकारचे काम असते. भारतीय संविधानानुसार ही जबाबदारी सरकारची आहे तरीही उलट जनतेचा रोजगार हिरावून घेणे हे संविधान विरोधी कृती सरकार करताना दिसते.

**९) शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करणे**

शेतकऱ्यामुळेच सगळ्यांचे जीवन सुखी होण्यास मदत होते. अशा शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नाकडे, त्यांच्या शेतीमालाला भाव न देणे, विम्याचे पैसे न देणे, नुकसान भरपाई न देणे अशा अनेक गोष्टी सरकार करत आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्याही केलेल्या आहेत. जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे.

**१०) अन्याय अत्याचारावर नियंत्रण नाही**

देशात खूप मोठ्या प्रमाणावर अन्याय, अत्याचार, बलात्कार,खून, मारामाऱ्या, जाळून टाकणे, जातीय दंगली घडणे हे प्रमाण वाढले आहे. विविध शासकीय कार्यालयात हे अन्याय वाढले आहेत. शासनाचे मात्र कुठल्याही प्रकारचे यावर ईवीयंत्र दिसत नाही. कायद्याचा बडगा त्यांच्यावर उभारला जात नाही. शासनाचा वचक राहिलेला दिसत नाही. गरिबांची संरक्षण कायद्याने केले जात नाही म्हणजेच संविधानाची मोडतोड इथेही केलेली दिसून येते.**११) युपीएससी च्या जागा मागच्या दाराने**

सर्वांच्च पद मिळविण्यासाठी विविध जाती धर्मातील विद्यार्थी अभ्यास, मेहनत करून प्रयत्न करत असतात. त्यासाठी अनेक विद्यार्थी हाडाचं कार्य करतात परंतु सरकारने काही मोजक्याच उच्चवर्णीयांची वर्णी परीक्षा न घेता उच्च पदावर लावली आहे. हे बेकायदेशीरच नव्हे काय?

**१२) संविधानाची पायमल्ली**

देशात पावलोपावली संविधानाची पायमल्ली सरकारकडून होताना दिसते. जंतर-मंतरवर संविधान जाळले जाते. सरकार काही शासन करताना दिसत नाही. रोज अधिकारी, लोकप्रतिनिधी संविधानाच्या विरोधी कार्यकर्त्यांना वागताना बोलताना दिसतात तरीही त्यांच्यावर कायदेशीर कारवाई कधीच होताना दिसत नाही. अनेक नोकरदाराच्या पदोन्नती रोखल्या जातात, विनाकारण नोकरीतून निलंबित केले जाते, शासनाच्या दारात सत्यनारायण केले जातात, शासकीय कार्यालयात पूजाअर्चा केली जाते तरीही शासन मात्र अशांवर कुठल्याही प्रकारची कारवाई करत नाही.

**१३) महागाई**

मानवी जीवन जगणे सरकारने मुश्किल करून टाकले आहे. डिझेल, पेट्रोल, जीवनावश्यक वस्तू, जीएसटी ह्या गोष्टी जीवन जगताना जीव घेण्या ठरत आहेत.या महागाईला हिंदूनाही सामोरे जावे लागते आहे. जीवनावश्यक वस्तूवर, हॉटेलमधील जेवणावरही सरकारने जीएसटी लावून सर्वसामान्य माणसांचे जनतेचे कंबरडे मोडले आहे.

**१४) वंचितांना संधी नाही**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती, मागासवर्गीय यांना कुठल्याच क्षेत्रात संधी दिली जात नाही. सरकारी पदावरील पदोन्नत्याही दिल्या जात नाहीत. कुलगुरू, प्राचार्य, कलेक्टर आशा मोठ्या पदावर यांना घेतले जात नाही. त्यांच्या विचारधारे वाल्यांनाच प्राधान्य देऊन इतरावर अन्याय केला जातो. इतरांचे शोषण केले जाते. त्यांचे शोषण केले जाते.

**१५) सांस्कृतिक दहशतवाद**

एनडीए सरकारच्या काळात सांस्कृतिक दहशतवाद सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक व इतरही सर्व क्षेत्रात जाणून-बजून पेरला. शाळेत कोणती प्रार्थना म्हणायची, प्रधानमंत्री चे कार्यक्रम दाखवणे, मेरा देश मेरी माती च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेटेज धरणे, शाळेत कोणती प्रार्थना म्हणायची हे ठरवणे, शासकीय कागदपत्रावरील राष्ट्रीय चिन्ह हटविणे, वाघनख्याचे राजकारण करणे अशा कितीतरी गोष्टी सर्वसामान्यांच्या माथी फोडल्या जायच्या. सत्तेचा उपयोग त्यांच्या कल्याणासाठी अजिबात केलेला दिसत नाही.

**१६) सोयीसुविधा पासून वंचित ठेवणे**

खेड्यापासून ते देशातील विविध शहरात एनडीए सरकारने नागरिकांना अनेक सोयीसुविधा पासून वंचित ठेवले आहे. त्यामध्येही त्यांनी जातीभेद धर्मभेद केला आहे. त्यांच्या त्यांच्याच उच्चवर्णीयांना सुविधा दिल्या आहेत. रस्ते, वीज, गटारी, पाणी अशा मूलभूत सुविधाही त्यांनी मागासवर्गीयांच्या वस्तीत आणल्या नाहीत. स्कॉलरशिप बंद करणे , वेगवेगळे जीआर काढून मागासवर्गीयांचे खच्चीकरण करणे हे चालूच आहे.

वरील सर्व या बाबी संविधान विरोधी आहेत. संविधानाची मोडतोड करून त्या गोष्टी नष्ट करणे चालू आहे म्हणजेच संविधान बदलत आहेत.वरील सर्व गोष्टींची संविधानात नोंद आहे. त्या सर्व गोष्टींची अंमलबजावणी संविधानाप्रमाणे केली तर सामान्यांचे जीवनाचे सोने होण्यास वेळ लागत नाही. परंतु या सरकारने संविधानाची पायमल्ली,मोडतोड करून सामान्याचे जीवन मातीमोल केले आहे. हे सामान्याच्या लक्षात येऊ दिले जात नाही. पद्धतशीरपणे फार मोठ्या बोलक्या कौशल्याने सर्वसामान्यांची दिशाभूल केली जाते. उपरोक्त गोष्टी खोटया आहेत का? अशा अनेक क्षेत्रांमध्ये सर्वसामान्यांच्या जीवनाची गळचेपी केली जाते. संविधानाच्या विरोधी अनेक गोष्टी घडवून आणल्या आहेत मग हे संविधान बदलणे नव्हे तर काय आहे. हेही जनतेने लक्षात ठेवायला हव्या. सर्व जाती धर्मातील लोकांना सांगणे आहे की,संविधान आहे तर सर्वांचे मानवी जीवन सुंदर आहे हे प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवे.

# संस्कार केंद्रस्थानी ठेवा : बाह्य शक्ती निष्प्रभ ठरतील



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपले संस्कार हे केंद्रस्थानी असतील तर जगातील कोणत्याही प्रकारची शक्ती आपलं फार काही उल्लेखनीय बिघडवू शकत नाही.सध्या पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रचंड मोठा प्रभाव आपल्यावर पडतोय हे वास्तव नाकारता येणार नाही.पण यातील काही बाबींचा स्वीकार करताना आपले संस्कार मात्र केंद्रस्थानी ठेवता आले पाहिजे.जग नक्कीच बदलतंय त्या मुळे कहि बदल स्वीकारणं हे आपल्यासाठी अपरिहार्य आहे.मात्र अपरिहार्य बदल स्वीकारताना आपले संस्कार हे केंद्रस्थानी ठेवता आले तर पाश्चिमात्य करण आपल्याला फार काही प्रभावित करू शकत नाही. आधुनिकता स्वीकारताना आपले संस्कार पायदळी तुडवले जाणार नाहीत याची काळजी दक्षता घेणं आवश्यक आहे.**

आधुनिकतेच्या नावाखाली सध्या ची तरूण पिढी खुप झपाट्याने बदलत आहे हे सत्य नाकारता येणार नाही.याला सोशल नेटवर्कच ब-यापैकी जबाबदार आहे. पण याचा पहिला आघात हा समाज व्यवस्थेचा पाया आधारस्तंभ असणार्या धर्म संस्कार वर होत आहे . आणि या सगळ्या घडामोडी मध्ये फल निष्पत्ती काय तर सरतेशेवटी येणारे परिणाम हे संबंधीतांना व शेवटी समाजाला आत्मचिंतन करायला लावणारे असतात. आधुनिकता नक्कीच स्वीकारा या मध्ये काळानुरूप स्वीकार करणं तसं आवश्यक असतं.परंतु कुठपर्यंत स्वीकारा कारायचा याला निश्चित एका अशी मर्यादा आहे.आणि ती मर्यादा म्हणजे जिथं पर्यंत आपल्या धर्म संस्काराचा उलंखघन होणार नाही. पायमल्ली होणार नाही. किंवा धर्म संस्कार पायदळी तुडवले जाणार नाहीत.तिथपर्यंत आधुनिकतेच्या दिशेने पुढे जाण्यासाठी कुटुंब अथवा समाज यापैकी कोणालाही अडचण नाही अथवा हरकत नसते.परंतु सध्याच्या परिस्थितीत आधुनिकतेच्या नावाखाली धर्म संस्कार पायदळी तुडवून उलंखघन करून झालेले प्रकार आपण सामाजिक वातावरणात पाहतोय.आणि त्याची फलनिष्पत्ती पण आपण उघड्या डोळ्यांनी पाहतोय.हे पाहिल्यावर मग मात्र प्रश्न पडतो कि आपण कुठे चाललो आहेत. यावर मंथन चिंतन करण्याची वेळ हि नक्कीच आली आहे.आपल्या आजूबाजूला अनेक अप्रिय घटना घडामोडी घडत आहेत.ह्या घटना घडामोडी सर्वसाधारण नाहीत.ज्या घटना मधुन व्यक्तिगत नुकसान तर होतंच पण कुटुबांच आणि समाजाचा देखिल खुप मोठ नुकसान होत.या घटनांना आपण सध्या जरी अपवाद असलो तरी भविष्यात याच लोन आपल्या दारापर्यंत येणार नाही याची शाश्वती खात्री कोणीही अधिकृतपणे देऊ शकत नाही.कारण आज जो सुपात आहे तो उद्या जात्यात असतो. म्हणून इतरांकडे पाहताना आपल्या वर अशी परिस्थिती ओढावु शकते याची जाणीव ठेवून प्रत्येकाने सजग आणि सावध होण्याची आवश्यकता आहे.आपण नेमकं कुठं कमी पडलो आहोत याची कारणमीमांसा झाली पाहिजे. आजकाल आधुनिकतेच्या गोंडस नावाखाली मुलं मुली रातोरात नवीन विश्व निर्माण करत आहेत.आणि निर्माण झालेलं हे विश्व अल्पावधीतच नाहिस पण होत . आणि मग उरतो तो पश्चात्ताप पण या सगळ्या मध्ये महत्वाची बाब हि आहे कि धर्म संस्कार आणि जीवनमूल्ये यांची जपणूक एवढी पोकळ झाली आहे का कि त्याच एवढ्या सहज उल्लंघन व्हावं.आपल्या आजुबाजूला किंवा आपल्या ओळखीच्या कोणी चुकीचे आचरण केले तर आपण पुर्व लक्षी प्रभावाने त्याच अनुकरण करतो. संस्कार हिन कार्याचे जणुकाही आपल्यला वंशपरंपरागत अधिकार प्राप्त आहेत. असंच काहीसं आपल्यला वाटत असतं आणि त्याने केले मी पण केले पाहिजे.हा न्युनगंड तिथपर्यंत कधी आपल्याला घेऊन जातो हे कळत पण नाही.मग मी कुठे कमी आहे या पोकळ भावनेतून आपण सुद्धा तसंच कार्य करतो.परंतु जेव्हा विषय संस्कार व आचरणाचा असतो तेव्हा मात्र आपण दुरवरूनच फाटा मारतो. म्हणजे चांगली गोष्ट चांगली सवय सहजासहजी आपण स्वीकारत नाही.आणि वाईट किती लवकर झटपट स्वीकारतो.एकंदरीत काय तर कुठल्याही नाते संबंधाला नैतिकतेचा आधार आणि धर्म संस्काराचा पाया असला पाहिजे.

# अजरामर लोकगायक प्रल्हाद शिंदे

आधुनिक केसरी

२३ जून, आपल्या मधुर आवाजाने रसिकांच्या ह्दयात स्थान मिळवणारे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांचा स्मृतिदिन. प्रल्हाद शिंदे यांना भक्ती गीतांचा बादशहा म्हंटले जाते कारण त्यांनी गायलेली सर्व भक्तिगीते लोकप्रिय झाली. केवळ भक्तिगीते नाही तर भावगीते, कव्वाली आणि कोळी गीतांवर देखील ठसा उलटवला. सर्व प्रकारची लोक गीते गाण्याचा आणि ती लोकगीते लोकप्रिय करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. महाराष्ट्रात कोणताही सण उत्सव असो त्यांनी गायलेली गाणी वाजवल्या शिवाय तो सण उत्सव पूर्ण होतच नाही. मग तो गणपती उत्सव असो की नवरात्र उत्सव, आषाढी एकादशी असो की सत्यनारायणाची महापूजा, आंबेडकर जयंती असो की बुद्ध पौर्णिमा इतकेच काही गावातील संदल उरूस देखील त्यांच्या कव्वाली शिवाय पूर्ण होत नाही कारण त्यांनी गायलेली ऐका सत्य नारायणाची कथा, चल ग सखे पंढरीला, बाप्पा मोरया रे, उड जायेगा एक दीन पंछी रहेगा पिंजरा खाली.... अशी गायलेली शेकडो गाणी आजही लोकप्रिय आहे. ही गाणी अजरामर आहेत. ही गाणी ऐकली नाहीत असा एकही माणूस महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वानाच ही गाणी तोंडपाठ आहेत. केवळ हीच नाही तर यासारखी शेकडो लोकप्रिय गाणी गाऊन त्यांनी रसिकांच्या ह्रुदयात स्थान मिळवले आहे. १९३३ साली अतिशय गरीब कुटुंबात अहमदनगर जिल्ह्यातील पिंपळगाव येथे त्यांचा झाला. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने प्रल्हाद शिंदे यांचा परिवार ते लहान असतानाच मुंबईत आले. गोड गळ्याची दैवी देणगी लाभलेल्या प्रल्हाद शिंदे यांनी लहान वयातच मुंबईच्या रस्त्यांवर रेल्वे स्टेशनवर गाणी गायला सुरुवात केली. त्यांची आई भाऊ व बहिणीही गाणी गाऊन त्यांना साथ देऊ लागली. त्यातून त्यांचा उदरनिर्वाह होऊ लागला. अतिशय गरीब घराण्यात जन्म घेतलेला, बहुजन समाजात जनमलेला, गायनाचे किंवा संगीताचे कोणतेही शिक्षण न घेतलेल्या प्रल्हाद शिंदे यांचा आवाज मुंबईत लोकप्रिय होऊ लागला. त्यांची गाणी जशी लोकप्रिय होऊ लागली तशी त्यांच्या आवाजाची जादू महाराष्ट्रभर पसरू लागली. गावागावातून त्यांना गाणी गाण्यासाठी बोलावणे येऊ लागले. नवरात्र उत्सव, आंबेडकर जयंती, गावातील यात्रा, जत्रा, बुद्ध पौर्णिमा, संदल - उरूस अशा कार्यक्रमात त्यांना बोलावणे येऊ लागले. त्यांची गाणी ऐकण्यासाठी लोक लांबून लांबून येऊ लागली. पाहता पाहता त्यांचा आवाज महाराष्ट्रभर पसरला. महाराष्ट्रातील ते सर्वाधिक मागणी असलेले गायक बनले. उभ्या महाराष्ट्रात पायाला भिंगरी लावल्यासारखे ते गाण्यासाठी भटकले. त्यामुळे त्यांनी माणसे जोडली आणि ते जाती धर्माच्या पलीकडे जाऊन पोहचले. प्रल्हाद शिंदे आपल्या गाण्याच्या कार्यक्रमाचा शेवट नेहमी एका आगळ्या वेगळ्या गीताने करीत. त्यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. भजन, कीर्तन, लोकगीते, बुद्ध धर्माची गाणी, डॉ बाबासाहेबांची गाणी त्यांनी घराघरात पोहचवली. त्यांची गाणी इतकी लोकप्रिय झाली की लोकांनी त्यांना डोक्यावर घेतले. प्रल्हाद शिंदे यांनी गायनाचा धंदा केला नाही म्हणून त्यांना कधीही आर्थिक स्थैर्य मिळाले नाही पण त्यांच्या गाण्यांमुळे कॅसेट कंपन्या मात्र गब्बर झाल्या. २३ जून २००३ रोजी निधन झाले.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# भावना...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग 54

भावना कोणाला असतात.? भावना सगळ्यांनाच असतात. काहींच्या बोथट होतात.त्या का बोथट होतात..? कुठेतरी भावना दुखावल्या जातात .मनाला वेदना होतात. किंवा भावना कोणी समजूनच घेत नाही. अशावेळी भावना बोथट होतात. माणूस निष्ठुर होतो. पाषाण ह्रदयी होतो .पण तो खरंच तसा नसतो. परिस्थिती त्याला तसं बनवते .काही लोक असतीलही भावनाशून्य. हा दोष त्यांचा नसावा कदाचित. तो आपलाही दोष असू शकतो. कर्तव्य करत असताना भावनात्मक होता येत नाही. कर्तव्य कधीकधी कठोर होऊनच पार पाडावे लागते. तिथे भावनात्मक झालं तर कर्तव्य नीट पार पाडता येणार नाही. शिक्षक, डॉक्टर, पोलीस यांना भावनात्मक होऊन चालणार नाही. त्यांच्यासाठी प्रत्येक क्षण महत्वाचा असतो.
आणि तो क्षण समाजाचा असतो. या तीन लोकांचं कामच एवढं श्रेष्ठ आहे की त्यांना पुण्य कमावण्यासाठी वेगळं काही करण्याची गरज नाही. पण त्यात ते प्रामाणिक पाहिजे. कुठलेही निर्णय घेताना भावनेच्या भरात घेतले तर परिणाम वाईटच होतात. त्यासाठी कानावर विश्वास ठेवू नये. डोळ्यावर ठेवावा. कानावर तेव्हाच विश्वास ठेवावा जेव्हा साक्षीला डोळे असतील. नसता कधीकधी सभ्य, सज्जन लोकांविषयी आपला गैरसमज होतो. भावना त्यालाच कळतात ज्याच्याकडे ह्रदय आहे. मन आहे. भावना या वाहत्या पाण्यासारख्या असाव्यात. स्वच्छ, निर्मळ, आरसपाणी... साचलेले डबके म्हणजे पाणी नव्हे. तसंच गुंता वाढवणाऱ्या भावना नसाव्यात. किंवा चुकीला खतपाणी घालणाऱ्या भावना नकोत. तिथं घात होतो. कधी कधी भावनेपाई एखाद्या सज्जन व्यक्तीचा निष्कारण बळी जातो. शेवटी काय ..."बळी तो कान पिळी". भावना सुगंधीत असल्या पाहिजे मोगऱ्याच्या फुलासारख्या. दुसऱ्यांना सुगंधीत करणाऱ्या. आपल्या भावना इतरांना समजाव्या असं आपल्याला वाटतं ,तसंच इतरांच्याही भावना आपल्याला समजाव्यात. समजून घेतल्याच पाहिजे. माणुसकीच्या नात्याने. अगदी प्राणी पक्षांच्या सुद्धा. मात्र कोणाच्या ताटाखालचं मांजर होण्या इतपत आपल्या भावना वहावत जाऊ देऊ नये. कुठेतरी स्वाभिमान जागा असावा. नम्र व्हावे पण लाचार होऊ नये. आपणच भावनात्मक असावं असं नाही. आपल्यासाठी सुद्धा कुणीतरी भावनात्मक असलं पाहिजे. त्यागी लोकांना पण भावना असतात. समाजाप्रती काहीतरी चांगल्या करण्याच्या. शून्यात नजर लावून बसणं म्हणजे भावनाशून्य नव्हे.तर भावनांचा कल्लोळ होणं.....

# कष्ट, सेवा यातच खरा आनंद

आधुनिक केसरी

**समर्थ रामदास स्वामी म्हणतात. "कष्टविना फळ नाही, कष्टविना राज्य नाही" प्रत्येक माणसांनी कष्ट करावे आणि आपले जीवनचरित्रार्थ चालवावे. अनेक जणांना कष्ट करण्याची सवय राहिली नाही. त्यामुळे त्यांच्या मनाला आनंद वाटत नाही. गोरगरिबांच्या छाताडावर पाय ठेवून त्यांच्याकडून काम करून घेणे आणि मलिदा खाणे हे अनेक जणांना आवडते. आपण ज्या देशांमध्ये राहतो त्या देशाच्या लोकांना त्रास देऊन आपल्या नावावर गडगंज संपत्ती तयार करून अनेक जण कष्ट न करता इतरांना लुबाडून मोठे होत आहेत. देश सोडून पळून जात आहेत.**

हे वास्तविक कटू सत्य आहे, दुसऱ्याचं ताट रिकामं असेल तर त्या ताटात अन्न टाकावे,ही आपली भारतीय संस्कृती आहे. परंतु दुसऱ्याच्या ताटातलं अन्न काढून घेणे ही विकृती आहे. हे अनेक जणांना कळत नाही. आज अनेक तरुण बेरोजगार म्हणून हिंडत फिरत आहेत. त्यांना कष्ट करावे वाटत नाही. छोटे छोटे काम करण्यास ते लाजतात त्यांच्या मनामध्ये न्यूनगंडवृत्ती, तयार होते.आणि इतरांनी कष्टाने कमावलेल्या गोष्टीकडे पाहून ते मनोमन जळतात. आणि इतरांना त्रास देतात. त्यामुळे त्यांना आनंद मिळत नाही. सद्‌गुरु वामनराव पै म्हणतात" तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार आहेस" कारण तुम्ही कष्ट करा .तुम्ही स्वतः श्रम करा. त्यामुळे तुम्ही पुढे जाऊ शकता, जर तुम्ही कष्टच केले नाहीत, तर आळशी बनाल. दे रे हरी पलंगावरी,असे म्हणून जमणार नाही,समाजाच्या प्रवाहात राहणार नाही,कधीही कोणीही एकमेकाला भेटले की विचारतात. 'तुमची'मुलं काय करीत आहेत' ?मुलं जर असे वाईट वागायला लागले, कष्ट न करायला लागले, तर त्या कुटुंबाची वाताहत होते, त्यामुळे खरा आनंद कोणालाही मिळत नाही. त्यामुळे इतरांची सेवा करा. राष्ट्रपिता महात्मा गांधींजीनी आयुष्यभर या समाजासाठी शेतकऱ्यांसाठी, कष्टकऱ्यांसाठी, कामगारांसाठी, अस्पृश्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी उपोषण केले आणि इंग्रजांना चले जाव म्हणून पाठवून दिले. त्यांचे हे कष्ट भारतीय कधीही विसरणार नाहीत. डॉ बाबासाहेब आंबेडकर अहोरात्र अभ्यास करून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार झाले. म्हणून मित्रांनो कष्टाबरोबर सेवा करा.यात भरपूर आनंद आहे. जर तुम्ही सेवेला कमी पडलात तर तुम्ही मागे रहाल. रामायणामध्ये श्री हनुमान यांनी श्रीरामाची अहोरात्र सेवा केली. आयुष्यभर ते त्यांच्यासोबत राहिले. आज त्यांच्या सेवेचे चीज झाले. गावोगावी हनुमानाचे मंदिर तुम्हाला दिसतात. सेवा हा एक धर्म आहे. म्हणून सेवेकरी व्हा. सेवा करण्याची संधी द्या. असे बरेच जण म्हणतात. दुसऱ्यांनी जेवण केलेल्या पत्रावळी काढणे ही सुद्धा एक प्रकारची सेवा आहे. समाजामध्ये सर्वांबरोबर चांगलं राहणे ही सुद्धा सेवा आहे.चांगले पुस्तके वाचन करावे. चांगले दृश्य पहावे. चांगल्याच पद्धतीने वागावे. कष्ट करून दोन घास खाल्ले की गाढ झोप लागते. चोऱ्या करणे, वाईट प्रवृत्तीने वागणे, व्यसन करणे,दरोडे घालणे,हे समाजाला मान्य नाही, यात कसला आला आनंद, ज्यावेळेस वाल्याकोळी दरोडे टाकून इतरांना त्रास देत असे, त्याच्या हातून कोणतीही सेवा घडली नाही, परंतु नारदमुनी त्यांना भेटल्यानंतर जीवनाचा अर्थ सांगितला, "अरे तुझे कोणीच नाही ? तू कोणासाठी दरोडा घालतोस? तु घरी जाऊन तुझ्या आई वडिलांना विचारून ये? त्यावेळेस तुला कळेल, तेव्हापासून त्यांनी मनातून समाजाला दिलेला त्रास काढून टाकला आणि वाल्याचे वाल्मिक ऋषी झाले. आणि त्यांनी रामायणासारखा महाकाव्य ग्रंथ लिहिला. आज तो ग्रंथ जगातील लोकांना उपदेश करतो. त्यानुसार नीती, धर्म,आचार विचार ,सदाचार यानुसार माणसे वागतात, म्हणून सज्जनहो, कष्ट करा. इतरांची सेवा करा. समाजसेवक बाबा आमटे यांनी आयुष्यभर कुष्ठरोग्यांची सेवा केली. आज त्यांची जगात कीर्ती पसरत आहे. त्यांनी केलेली सेवा कधीच वाया जाणार नाही. समाजसेविका मदर तेरेसा यांनी दीन,दुबळे, पीडित, अनाथ, गरीब, रोगी यांची सेवा केल्याने आज देवाच्या देव्हाऱ्यात त्यांना बसवलं जाते. माणूस कर्माने मोठा होतो. जन्माने नाही असे अनेक विचारवंतांनी सांगितले आहेत. कारण क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजासाठी अहोरात्र कष्ट केले. समाजाची सेवा केली आणि त्यांच्या सेवेचा फळ म्हणून आज अनेक शासकीय कार्यालयात त्यांचे फोटो अभिमानाने झळकत आहेत.याच पती-पत्नीवर अनेक धर्ममार्तंडानी, समाजकंटकांनी शेण, चिखल फेकले होते. तर आज सुगंधाच्या अगरबत्ती लावून वाकून मुजरा करत आहेत.याचे दुसरे नाव कष्ट आणि सेवा यातच खरा आनंद आहे. येशू ख्रिस्ताने समाजा साठी अविरतपणे कार्य केले. काही लोकांनी त्यांना त्रास दिला तरी ते म्हणाले" प्रभू यांना क्षमा करा" त्यामुळे आज ते महान झाले. समाजाची सेवा त्यांनी केली म्हणून समाजामध्ये मोठे होण्यासाठी तुम्ही नम्रपणाने वागा. दुसऱ्यासाठी झटणाऱ्यांना खरा आनंद अनुभवता येतो. गाईला चारा टाका, पीडित लोकांना घरकुल मंजूर करून द्या. गरीब विद्यार्थ्यांची परीक्षा फी भरा. शेतकऱ्यांना बी बियाणे द्या. अनाथमुला -मुलींच्या विवाहाला मदत करा. रक्तदान, अन्नदान समय दान अशा कितीतरी पध्दतीने सेवा आपल्याला करता येतात, म्हणून सेवा करा. त्याचे निश्चितच फळ तुम्हाला मिळेल. संत गाडगे महाराजांनी आयुष्यभर खराटा हातात घेऊन गावातील घाण दूर केली. लोकांना कीर्तनातून उपदेश केला त्यामुळे आज प्रत्येक माणसाच्या मनात गाडगे महाराजाविषयी आपुलकी आणि प्रेम आहे. म्हणून तुम्हीही कष्ट करा .कष्टा बरोबर सेवा करा, याचाच तुम्हाला खरा आनंद मिळेल.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता लिहून लोकांना उपदेश केला, त्यांची या झोपडीत माझ्या म्हणून लोकांच्या मनावर ते आजही अधिराज्य गाजवून आनंद देतात. आनंद मिळण्यासाठी बरेच लोक प्राणीमात्रावर दया करतात. त्यामुळे त्यातून त्यांना खरा आनंद मिळतो. आपली विचारधारा चांगली असावी. दुसऱ्याचे उणे -दुणे करून आपण मोठे होत नाही. स्वतः मोठे होण्यासाठी सर्वांना समतेचे तत्व सांगावे. भेदाभेद करू नये. आपले विचार खूप वरच्या दर्जाचे असावेत. जनसेवा हीच ईश्वर सेवा आहे असे म्हणतात म्हणून तुम्ही दीन, दुबळे पीडित,अनाथ ,रोगी यांची सेवा करा. त्यामुळे तुम्ही सुद्धा उच्च पदाला पोहोचाल. तुम्हाला सुद्धा आपण समाजाची सेवा केली म्हणून खरा आनंद लुटता येईल. क्रांतीकारक भगतसिंग ,राजगुरू,सुखदेव, उमाजी नाईक, मंगल पांडे, कल्पना दत्त ,अनंत कान्हेरे,शिरीष कुमार मेहता यांनी देशासाठी आपले प्राण बलिदान केले. त्यात त्यांना आनंद मिळाला. याचं कारण असं की आपला देश आपला समाज पारतंत्र्यात आहे. आपल्या रयतेला त्रास दिला जातो म्हणून लोकांचं भलं व्हावे. आपले हक्क आपल्याला मिळावेत.यासाठी त्यांनी हसत हसत फासावर गेले. जे देशासाठी लढले। ते अमर हुतात्मे झाले म्हणून या जगात चांगले होण्यासाठी चांगले कार्य करण्यासाठी जिद्द लागते. आपले संस्कार चांगले लागतात. गरीब घरचा व्यक्ती मनानं निर्मळ राहून सुद्धा सेवा करू शकतो. परंतु धनधाडगे व्यक्ती कधीच कोणाला फुटकी कवडी सुद्धा देऊ शकत नाहीत .त्याचे कर्माचे फळ त्याला नंतर मिळतात. म्हणून कष्ट करा. त्यातच सेवेतून तुम्हाला खरा आनंद मिळतो. म्हणून सेवेकरी व्हा, मुलांनी आई-वडिलांची सेवा करावी. सुनेनी घरातील सर्वांना समजून घेऊन आपले कार्य करावे.वृध्दांचा उपहास करू नये. सेवा करावी,शिक्षकानी आपल्या विद्यार्थ्यांना निष्ठेने शिकवावे. लोकप्रतिनिधींनी आपल्या मतदारसंघातील गावांचा विकास करावा. संपादकांनी सत्य ते बाहेर आणून छापावे. कोणावर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी. छोट्यांनी मोठ्यांची सेवा व आदर करावा. त्यामुळे त्यांची कीर्ती आपोआप वाऱ्यासंगे जाते. म्हणून चंदनासारखे झिजावे आणि समाजाशी एकरूप व्हावे, जसे दुधात साखर एकरूप होते,नेहमी समाजाला घेऊन चालताना आपल्या घरात एकमत, शेतात खत,गावात पत,आणि पत्नीच्या नाकात नथ असावी, तरच लोक आपले म्हणणे ऐकून घेतात,असे पूर्वज म्हणतात. म्हणून सेवाभावी पद्धतीने तुम्ही वागल्यास तुम्ही लोकांच्या गळ्यातील कंठमणी होणार. यात तीळ मात्र शंका नाही. त्यामुळे आज देश चांगल्या वागलेल्या लोकांमुळे मोठा होत आहे. भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी आयुष्यभर देश सेवा केली. ज्येष्ठ समाज सुधारक अण्णा हजारे आयुष्यभर अविवाहित राहून देश सेवा करत आहेत,त्यांनी समाजाला माहितीचा अधिकार दिला. अनेक साहित्यिकांनी समाज प्रबोधन पर लेख, साहित्य लिहून समाजाची सेवा केली. ज्याप्रमाणे सोन्याची चाचणी कापणे, घासणे, गरम करून शेवटी ठोकणे तसेच व्यक्तीची चाचणी त्यांनी केलेली त्यागवृत्ती, नम्रता, सद्‌गुण, आणि कर्तृत्वाने पूर्ण होते. त्यालाच पुरुषार्थ म्हणतात. अशा प्रकारे तुम्ही कष्ट करा व त्यातून तुम्हाला परमोच्च आनंद मिळेल. म्हणून नशीब वादी होण्यापेक्षा प्रयत्नवादी बना.



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड



# लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी

नाव ऐकूनच सुटले ना तोंडाला पाणी ? आणि डोळ्यांसमोर पुण्याच्या चितळे यांची खमंग, खुसखुशीत, चटपटीत बाकरवडी आली ना? आता आपणसुद्धा अगदी तश्शीच घरी बनवू शकतो आणि ताज्या ताज्या बाकरवडीचा मनसोक्त आस्वाद घेऊ शकतो .तशी थोडीशी किचकट वाटते रेसिपी ..पण एकदा का बनली की पाहता पाहता फडशा पडतो ते पाहिले की पुन्हा करण्याचा उत्साह वाढतो . त्यामुळे निवांत वेळ असेल तेंव्हा बनवायची आणि मग ही भरपूर दिवस टिकत असल्यामुळे निवांतपणे मनसोक्त खायची. कारण विकत आणली की खूप महाग असल्यामुळे पुरवून डब्यात पाहत खाव्या लागतात .पण घरी स्वतःच केल्यामुळे मनसोक्त ताव मारू शकतो . चला मग लगेंच बनवायला सुरुवात करू. **साहित्य :** पारीसाठी पाव किलो मैदा , 4 चमचे बेसन ,2 चमचे तांदुळाचे पीठ , चवीनुसार साधारण 1 चमचा मिठ , 1 चमचा ओवा , पाव वाटी तेलाचे कडकडीत मोहन.
**सारणासाठी :** १ जिरे धने, 1 चमचा जिरे, 1 चमचा बडीशेप, 1 चमचा खसखस, 2 चमचे पांढरे तीळ, 1 वाटी खोबऱ्याचा किस, 7..8 शक्यतो असतील तर वाळवलेल्या हिरव्या मिरच्या. .नसतील तर एकदम बारीक तुकडे, 1 चमचा गरम मसाला, 1 चमचा लालतिखट, 1 चमचा साखर, अर्धा चमचा हिंग पावडर, 1 वाटी फक्त कोथिंबीरीची पाने, 1 वाटी बारीक शेव , चिंचगुळाची चटणी, तळण्यासाठी तेल. **कृती :** प्रथम आपण सारण करून घेऊ . त्यासाठी गॅसवर कढई ठेवून त्यात सर्वांत आधी धने ,जिरे , बडीशेप , खमंग भाजून घेऊ . मग खोबरे , तीळ छान तांबूस रंगावर भाजून घेऊ . कोथिंबीरीच्या काड्या व्यवस्थित भाजल्या जात नाहीत आणि त्यामुळे बाकरवडी नरम पडू शकते . म्हणून जर ओव्हन असेल तर 1 मिनिट कोथिंबीर ठेवून थंड झाली की मस्त कुरकुरीत होते .आणि नसेल तर पाने मंद आचेवर व्यवस्थित कोरडी होऊन कुरकुरीत होईपर्यंत भाजून घेऊ .हे सर्व एकत्र बाजूला ठेवून आपण पारी साठी तयारी करू .
पारी बनवण्यासाठी एका मोठ्या बाऊलमध्ये मैदा ,बेसन ,तांदुळाचे पीठ घालून त्यात ओवा हातांनी चोळून घालून घेऊ म्हणजे ओव्याचा स्वाद छान येईल . मग चवीसाठी मिठ घालून गॅसवर छोट्या कढल्यात तेल चांगले कडकडीत गरम करून पिठांत घालु व हातानी चोळून छान मिक्स करून घेऊ . मग् लागेल तसे पाणी घालून थोडासा घट्टसरच गोळा मळून 15 मिनिटे व्यवस्थित झाकून ठेवू .
आता सारण थंड झाले असेल . त्यात वाळलेल्या मिरच्यांचे तुकडे , पाव वाटी शेव घालून मिक्सर मधून किंचित जाडसर ..रवाळ फिरवून घेऊ .मग बाकी राहिलेली शेव सुद्धा हातानी व्यवस्थित चुरून बारीक करून त्या सारणात घालू . शेवटी त्यात गरम मसाला, लाल तिखट, मिठ घालून सारण एकदम तयार करून ठेवू. आता पिठाचे भरपूर मळून चार भाग करून घेऊ. मग प्रत्येक पारी पोळपाटावर कोरड्या मैद्यात घोळवून पातळसर पोळ्या लाटून घेऊ . मग त्या पोळीला चिंचगुळाची थोडी चटणी पसरून लावून घेऊ . आता त्यावर सारण पसरून घेऊन त्यावर प्लास्टिक पसरून लाटण्याने अलगद दाब देऊ म्हणजे सारण घट्ट चिकटून बसेल पण शेव थोडीशी कडक असते त्यामुळे पारीही फुटणार नाही. आता त्याचा घट्ट रोल बनवून घेऊ . आणि एकांच दिशेने रोल फिरवत घट्ट बनवूया . रोल मोठ्ठा होईल .म्हणून त्याचे मध्यभागी कट करून दोन भाग बनवून घेऊन ते छान घट्ट गुंडाळून घेऊ .म्हणजे सारण बाहेर येणार नाही
मग त्याचे छोटे छोटे तुकडे बनवून कच्ची बाकरवडी बनवून ठेऊ. शेवटी सर्व बनवून झाल्या की गॅसवर कढई ठेवून तेल घालून ते व्यवस्थित गरम करून घेऊ . आणि मंद ते मध्यम आचेवर तांबूस रंगावार खुसखुशीत होईपर्यंत तळून घेऊ . मग झाऱ्याने सर्व तेल निथळून चाळणीत काढून थंड झाल्या की घट्ट झाकणाच्या डब्यात भरस्वादिष्ट आपली बाकरवडी आता खाण्यासाठी एकदम तयार आहे. **वैशिष्टयः** ही अशी बाकरवडी अतिशय खमंग ,स्वादिष्ट , खुसखुशीत , चटपटीत होते .टिकतेही भरपूर दिवस . मधल्यावेळी ,सुट्ट्यात ,कधीही ,कुठेही पटकन खाता येते . ट्रीपला जाताना ,कोणाकडे खाऊ म्हणून नेण्यासाठी छान पर्याय आहे . सर्वांनाचं आवडणारी ,लाडकी अशी बाकरवडी स्वतः उत्तम बनवल्याचा आनंद तर मिळतोच शिवाय मनसोक्त खाताही येते.




# मराठीतील महत्त्वपूर्ण राजकीय कादंबरी : चिंबोरेयुद्ध

आधुनिक केसरी

**चिंबोरे म्हणजे खेकडे त्यांच्या जीवनातील सद्य:स्थितीतील कलह- संघर्ष त्यांचे सामाजिक -सांस्कृतिक व्यापार राजकारणातील गट- तट आणि अस्तित्वाची लढाई याचे दर्शन चिंबोरी दर्शन "चिंबोरेयुद्ध" या कादंबरीत घडते.एक प्रकारे आपल्या सभोवताली जे घडते तेच प्रतिकात्मक किंवा रूपकात्मक पद्धतीने चिंबोऱ्यांच्या जीवनात घडते.आजच्या गतिमान जीवनात नव्या तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, युट्युब, यासारखी माध्यमे आपला आपला संवाद इतरापर्यंत पोहोचविण्यात अग्रेसर बनली आहेत. आपली छायाचित्रे, क्लिप्स, ही संवाद साधने बनली आहेत. मात्र त्यातून इतरांची फसवणूक आर्थिक, चुकीच्या गोष्टींचा प्रसार यासारखे घातक परिणाम दृष्टीस येतात.**

डिजिटल युगातील विकृतीही अजून मधून समोर येतात.या कादंबरीतील कँली आणि कँलीसिटी याच गोष्टीची साक्ष देते. एकूणच आपल्या सभोवताली ज्या काही घडामोडी घडत आहेत त्याची अवस्था चिंबोऱ्याच्या रूपात लेखकाने मांडले आहे. किंबहुना खेकडे हेच आपल्या विविध स्वरूपातील रूपकाच्या रूपात आपल्याला संदेश सांगण्याचा प्रयत्न करतात. युती आघाडीचे राजकारण नवीन नाही. यातून एकमेकांच्या साथीने सत्तेत येणे.आपला पक्ष वाढवणे. प्रसंगी दुसऱ्या मित्र पक्षाला दगा देऊन संपवले हे आपण पाहत आहोत.त्या संदर्भात या कादंबरीत जो उल्लेख येतो तो लक्षणीय आहे.सध्याच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, घडामोडीचे काल्पनिक चित्र वेगळ्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न या कादंबरीतून लेखकाने केला आहे. "चिंबोरेयुद्ध" या नावात खेकड्यांनी एकमेकांचे पाय ओढण्याचे जे वैशिष्ट्य आहे हे या कादंबरीत अधोरेखित झाले आहे. या अर्थाने खऱ्या अर्थाने ही कादंबरी नाही.की याला फारसे सलग कथानकही नाही. पण आजकाल प्रत्येकाच्या मनात धोकावणारे असंख्य प्रश्न आणि त्या प्रश्नांचा गुणकार यातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.सामान्य लोकांचे प्रश्न यातून पुढे येतात. जातीय, धार्मिकतेढ श्रेष्ठ- कनिष्ठ असे वाद, कनिष्ठ जातीला तुच्छ लेखनाची प्रवृत्ती आणि समाजाची ढोंगी प्रवृत्ती लेखकांनी मांडली आहे. स्वाभाविकच सध्याच्या जीवनाचे वास्तव चित्र यातून साकारले आहे.सध्याचा जमाना ऑनलाईन आणि डिजिटल चा आहे. स्वाभाविकच त्याची प्रतिबिंब या पुस्तकात पडले आहे. ऑनलाइन सेल डिस्काउंट च्या फसव्या जाहिराती त्यातून




सर्वसामान्यांना आकृष्ट करण्याचा प्रयत्न याची चित्र कादंबरीत पडले आहे.यातील एक मोर्चा ज्या घोषणा देतो त्या लक्षवेधी आहेत. ***सगळे कसं जोमात आहे कोमात आहे असे कसे देव आहे मंदिरा बाहेर यायचे बाहेर जोमात आणि जोमात कशासाठी कशासाठी सत्तेच्या खुर्चीसाठी***" चिंबोरे युद्धातील 19 व्या प्रकरणात कवच्या कंकाळ यांनी पक्षाची भूमिका मूळ धार्मिक भूमिकेपेक्षा दूर गेली असं कारण देऊ पक्षातील 55 आमदारांपैकी 40 आमदारांसोबत बंड केले. चिंबोरी विकास आघाडी सरकार कोसळले. कवच्याने खलणचिंबोरा यांना सर्वांना सोबत घेऊन चिलापी पक्षाची युती केली आणि चिंबोरवाडी युतीचे सरकार स्थापन केले व नवे मुख्यमंत्री म्हणून कवच्याने शपद घेतली. या प्रकरणात मूळ शिवसेनेतून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गट हा भाजपसोबत सरकार स्थापन केल्याचा संदर्भ स्पष्टपणे जाणवतो. सगळे संदर्भ महाराष्ट्रातील दोन अडीच वर्षांपूर्वीच्या सत्तांतराची आठवण करून देतात. त्याच प्रकरणात शिवसेनेतील फुटीच्या संदर्भात जी न्यायालयीन लढाई सुरू झाली त्याचाही प्रत्यय येतो याच प्रकरणात मध्यंतरी झालेल्या मराठा आरक्षणाच्या घटनांचा ही संदर्भ येतो. पाटील हे पात्र केलेल्या आंदोलनासाठी लेखकांनी प्रतिकात्मकरीत्या मांडले आहे. 50 खोक्यांची गाजलेली चर्चा याचाही संदर्भ या कादंबरीत येतो. एकूणच महाराष्ट्रातील सत्ता नाट्याची चित्र चिंबोरवाडीतील प्रतीकात्मकरित्या या लेखकांनी मांडले आहेत.खलणवीस, आबा, बाबा, राष्ट्रीय काका, आंग्रेस ,हे शब्द वापरून महाराष्ट्रातील राजकारण यात उलगडून दाखवले आहे. शिवसैनिक झालेल्या फुटीच्या बाबत सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीचे संदर्भही चिंबोरा वीस मध्ये येतात हे प्रकरण मोठ्या घटनापीठाकडे वर्ग करण्याचा अधिकार सरन्यायाधीश चिंबोरे डी वाय चंद्रचूर देतात. विधानसभा अध्यक्षांचे अधिकार कायम ठेवत विधिमंडळाच्या अधिकारात हस्तक्षेप करता येणार नाही हा त्या न्यायालयाने दिलेला निकाल याचा उल्लेख यात येतो. त्याचप्रमाणे राष्ट्रवादीच्या फुटीचे प्रकरण देखील प्रतिकात्मक रूपाने भाष्य केले आहे. यात चिंबोरीमँन म्हणतो ,"राजकारण म्हणजे राजकारण घडत राहा घडवत रहा. कारण नाही नुसता कारण हा त्याला तो त्याला सारखा गंडवत असतो. नाही तरी राजकारणात कोण कोणाचा असतो." यापेक्षा राजकारणावर कोणते मार्मिक भाष्य असू शकेल ."चिंबोरेयुद्ध" ही एक अभिनव प्रकारची किंवा जिला अ कादंबरी म्हणता येईल. ज्यात साहित्याचे सारे सिद्धांत वाद बाजूला सारून लेखन केले आहे अशी ही कादंबरी आहे. या कादंबरीचे लेखक बाळासाहेब लबडे यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांची 16 पुस्तके प्रकाशित झाली आहेत. पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.त्यात काव्य प्रतिभा पुरस्कार, नाशिकचा कुसुमाग्रज राज्यस्तरीय पुरस्कार आदींचा समावेश आहे .चित्रपटासाठी त्यांनी गाणीही लिहिली आहेत .चिंबोरेयुद्धमध्ये आबा बाबा, कवच्याकंकाळ ,चिलापी, हातोडा चिंबोरा,ही सगळी पात्रे आजच्या राजकारणातील समकालीन पात्र आहेत.यात आजच्या राजकीय नाट्याचे प्रतिबिंब उमटले आहे.ते प्रभावी, लालीत्यपूर्ण, चिकित्सक, अन्वयार्थपणे, आले आहे. त्यामुळे ही कादंबरी मराठीतील महत्त्वपूर्ण राजकीय कादंबरी आहे.

**रामदास नेहुलकर**
**सहसंपादक दै.केसरी**

# बाबा भांड यांचे खडकपालवी: युवा मनांचा सुज्ञ प्रेमाविष्कार



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**सह्याद्रीला महत्ता आणि काठीण्य कोण सांगणार? आज तो काळाच्या माथ्यावर पाय रोवून धीरोदात्तपणे उभा असून पथदर्शी होत आहे. धरणीच्या पोटातील प्रचंड तप्त लाव्ह्यातून उभा राहिलेला सह्याद्री अचल, सुंदर दिसत असला तरी त्यामागे त्याच्या विविधांगाने, अंतरंगाने जळण्याची अनुभूती दडलेली आहे! एवढे लिहिण्याचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील जेष्ठ साहित्यिक, कादंबरीकार, कथाकार, चित्रपट पटकथा लेखक, चरित्रकार, संपादक, अनुवादक आणि छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) येथील नामांकित साकेत प्रकाशनचे सर्वेसर्वा आदरणीय गुरुवर्य श्री बाबा भांड म्हणजे लेखन क्षेत्रातील सह्याद्रीच! स्वातंत्र्योत्तर काळात खडतर परिस्थितीतून स्वतःला घडवत अनेक सृजानांनी मराठवाड्याचा आवाज वाङ्मय क्षेत्रात बुलंद केला आहे.**


त्याच संघर्षशील महानुभावांच्या मांदियाळीतील ठळकपणे झळकणारे एक नाव म्हणजे बाबा भांड!

मित्रवर्य, सिद्धहस्त लेखक मिलिंद काटेंनी सृजन सोबतीव्हॉट्सॲपग्रुपवर बाबा भांड सरांच्या 'खडकपालवी'वर लिहिलेलं वाचलं, पुस्तक वाचण्याची उत्कंठा निर्माण झाली. लगेच पुस्तक मागवलं आणि एका बैठकीत पुस्तकाने मला वाचून घेतले. एका लेखकाचे एक पुस्तक वाचले की; साधारणतः लेखक अंतर्बाह्य गवसतो. खडकपालवी म्हणजे एखादं लेकरू लहानपणी हरवावं आणि म्हातारपणी माय-बापाला अचानक सापडावं; तसं १९७३ साली जन्मलेलं हे पुस्तक तब्बल ४९ वर्षांनी कोरोनाच्या कुलुपबंद (लॉक डाऊन) काळात लेखकाला सापडलं.

खडकपालवी लिहितांना भांड सर उकलत गेलेत. १९७२ चा भीषण दुष्काळ. वडील नाहीत. आई-भाऊ दुष्काळी कामावर. असे असतांना बाबा स्काउटमध्ये डॉ.राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रपती पदक पटकावतात. त्यातून त्यांना जगातील दहा देश पहायची आणि जगभर मित्र जोडायची संधी प्राप्त होते. इथेच त्यांच्यात सृजन-लेखक रूजला. जग पाहिले, जीवन कळले. माणूस स्वतःला कळल्याशिवाय पुढे जातच नाही, परिणामी सर्वप्रथम जगप्रवासावर 'लागेबांधे' पुस्तक लिहिले. ते डॉ.भालचंद्र नेमाडें सरांना आवडले, पण छापणार कोण? "जेंव्हा तुला पुढे शक्य होईल तेंव्हा तूच प्रकाशन संस्था सुरु करून छाप." नेमाडे गुरुजींचा हा शब्दाशीर्वाद, खऱ्या अर्थाने साकेत प्रकाशनाचे बीज! गरीबीचे चटके सोसत बाबा शिकले. वर्तमानपत्रात बाबा लिहित असल्यामुळे साहित्य क्षेत्रास माहिती झाले. ओढाताणीत बी.ए. झाले. एम.ए.करणे शक्यच नव्हते, तेंव्हा काहीतरी नौकरी करणे भाग होते. लेंभे सरांच्या एका पत्रावर औरंगाबाद-चौराहाच्या मराठा हायस्कूलमध्ये बाबा शिक्षक म्हणून रुजू झाले. इथेच रुजली ही खडकपालवी!

प्रेम कधीच गरिबी, श्रीमंती, परिस्थिती, तहान, भूक वगैरे अवस्था पहात नाही. प्रेमच ते, होतं म्हणजे होतं बस्स! त्यामुळेच चंद्र, कवी आणि प्रेमी हे अर्धवेडे! सेवानिवृत्त मुख्य ऑडीटर श्री गंगाधरराव मोरे यांची आशा मोरे गणित-विज्ञानाच्या शिक्षिका म्हणून मराठा हायस्कूलमध्येच कार्यरत होत्या. तिथेच बाबा भांडही रुजू होतात आणि सुरु होते या दोघांची प्रेम कहाणी, खडकपालवी! बाबांना शिकण्याची प्रचंड उर्मी! नौकरी करत मराठवाडा विद्यापीठात रात्र पाळीचे एम.ए. इंग्रजी वर्ग जॉईन केले. गरीब घराचा विद्यार्थी, मर्यादेत राहणारा एक प्रामाणिक शिक्षक! बाबांना स्टाफमध्ये कधी गप्पा जमल्या नाहीत, सतत वाचन-लेखन. मितभाषीपणामुळे स्टाफमधील सर्व त्यांना शिष्ट समजायचे. त्या दरम्यान स्टाफमधील वरखेडे सरांनी आशा मोरेंना, "मुलगा खेडेगावातला. जेमतेम परीस्थितीतला असला तरी होतकरू अन् सज्जन आहे. लाखात एखादा असा असतो. तुझ्या लग्नासाठी दादांना भेटून बोलू का?" असे विचारले तेंव्हा मॅम एकदमच गोंधळल्या. तो विषय मोरे मॅमचे वडील मोरे साहेबांपाशी काढला तेंव्हा, "आपली मुलगी खेड्यात कशी जमवून घेईल?" असे बोलून तो विषय थांबला. इथे, वरखेडे सर स्वतः यात पडले की बाबा हालचाली करत होते?-प्रश्न.

आता स्टाफमध्ये हा विषय खऱ्या अर्थाने सुरु झाला. दोन तरुण मने! चुंबकाच्या विरोधी टोकांमध्ये आकर्षण असतेच! संथ, शांत डोहात पावसाच्या एका थेंबाने अनंत तरंग निर्माण झाले. आकाशात इंद्रधनू फुलून आला. रंगात रंग मिसळले. कृष्ण सख्याच्या सुमधुर वेणूने राधा भावविभोर झाली! ती प्रेमवेडी झाली, तो तर अगोदरचाच! दोन्हीकडे आग! काळजाची धडधड वाढली! प्रचंड चलबिचल, उलघाल! त्यावेळी बाबा-आशा हे दोन सहकारी अचानक समोरासमोर आल्यावर काय होत असेल? धडधड वाढत असेल की नाही? मनःपटलावर काय सुरु असेल? याचा खडकपालवी वाचतांना अनेकवेळा प्रत्यय येतो. घरचा गरीब परंतु दिसायला बरा, उंच, सडसडीत, शांत, निर्व्यसनी, अभ्यासू, हुशार, लेखक, कथाकार आणि विशेष म्हणजे आपल्या सोबतच नौकरीत; असा मुलगा कुण्या मुलीला आवडणार नाही? एखाद्या चित्रपटाप्रमाणे आशा-बाबा यांचे प्रेम खडकपालवीत रुजते. बाबा तासावर गेले की; आशा हळूच बाबांच्या टेबलवरील पुस्तक पहायच्या. त्यातच त्यांचा संवाद झाला. नजरानजर आणि पुन्हा धडधड! पुस्तक देवाणघेवाण सुरु झाली. एकेदिवशी बाबांनी दिलेल्या पुस्तकातून एक पाकीट खाली पडले आणि आशा मॅमच्या काळजात धस्सकण झालं! इकडे आग धुमसत असतांना तिकडे जोरात पेटली होती, हे




पाकीट म्हणजे पहिली प्रेमज्वाला! पहिले प्रेमपत्र! खडकपालवी वाचतांना प्रत्येकाला आपल्या कॉलेज जीवनातील अनेक सुंदर प्रेमांकुर आठवतील! खडकपालवी म्हणजे समजदार, शिक्षक प्रियकर-प्रेयशी यांनी सोबत आयुष्य जगण्यासाठी केलेल्या प्रेमपत्रांचा उत्तम संवाद! आजच्या तरुणांनी हे पुस्तक आवर्जून वाचायला हवे. दोघेही तरूण, सोबत नौकरी करतात, परंतु कुठेही मर्यादांचे उल्लंघन नाही. प्रियकर-प्रेयशीचा उच्छृंखलपणा, लाळघोटेपणा, मागे लागणे किंवा चोरून चित्रपट पाहणे किंवा हाहाहीही नाही. जुलै १९७३ ते ऑगस्ट १९७३ काळात बाबा-आशा या दोन प्रेमिकांमध्ये झालेला सुंदर, सोज्वळ, सरळ पत्रसंवाद म्हणजे खडकपालवी! सर्वच पत्रात बाबांना आशेची आशा लागलेली, तर आशेला बाबांनी केंव्हाच जिंकून घेतलेले! दोघांची पत्रे मोठी लोभस आणि वाचनीय आहेत. ही पत्रे वाचकाच्या हृदयातील प्रेमकप्पा हळूच खोलतात! या पत्रांत रुसवे-फुगवे आहेत. पुढे काय? हे माहिती नसतांना दोघांनी एकमेकांचे कौटुंबिक ऋणानुबंध जपलेत. आशा मॅमना भाऊ नाही हे कळल्यानंतर, "बंधुप्रेमाची जाणवणारी पोकळी सतत टोचत राहणार. त्याला आपण सारे मातीचे माणसे काय करणार? नशिबाचे फेरे समजावेत." "मी जेंव्हा जेंव्हा आपला विचार करू लागतो, तेंव्हा आपली एक एक व्यथा, अन् दुःख माझ्याभोवती पिंगा घालू लागतात आणि हे वर्तुळ वाढत जातं"-बाबा. असे दोघांचेही कुटुंबवत्सल, संस्कारीत, मर्यादित संवाद पुस्तकात तुम्हाला जागोजागी मिळतील. एवढे असतांना आशा मॅमना एक स्थळ आले आहे. त्या स्थळाचा होकार-नकार कळल्याशिवाय बाबांचे स्थळ पुढे जाणार नव्हते.

खडकपालवी शीर्षक मोठे बोलके आहे. बाबा गरीब, प्रेयशी एका अधिकाऱ्याची शिक्षिका मुलगी. खडकावर पालवी रुजणार का? टिकणार का? अशा अनेक प्रश्नातून हे शीर्षक जन्मले आहे. मित्रहो, खडकपालवी म्हणजे दोन युवा शिक्षक मनांचा सुज्ञ प्रेमाविष्कार! प्रेमात एकमेकांची मने समजून घेतांना किती कष्ट पडतात? ते इथे कळते. वाचतांना पुस्तक अचानक संपते आणि भावूक मनाला अनंत प्रश्न पडतात. त्यांच्या प्रेमाचा गुलाब फुलाला की वाळला? वगैरे वगैरे. तेंव्हा, खडकपालवीतील सुरेख पत्रे आपणही वाचा आणि सुंदर, प्रेमळ जीवनाचा आनंदास्वाद घ्या!

# संविधानाच्या उद्देशिकेने रामदास कांबळे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** कुठल्याही प्रकारची जात-पात धर्म मनामध्ये न बाळगता सदैव कोणत्याही वंचित घटकावर अन्याय अत्याचार असो किंवा त्यांची कोणतीही अडचण असो, शक्य तेवढी मदत व सहकार्य करण्यासाठी रामदास कांबळे नेहमीच धावून जात असतात. खंडाळा तालुक्यातील चळवळीत त्यांचा सक्रियपणे सहभाग पाहायला मिळत असतो.

आंबेडकरी चळवळीचा खमक्या आणि लढवय्या नेता म्हणून रामदास कांबळे यांच्या कडे पाहिले जात असते.रामदास कांबळे हे सामाजिक बांधिलकी जपणारे व वळवळीपेक्षा चळवळीला महत्व देणारे नेतृत्व आहे.असे प्रतिपादन फुले शाहू आंबेडकर विचारांचे प्रचारक,संविधान अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र खुंटे यांनी केले.शिरवळ ता.खंडाळा येथे रामदास कांबळे यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिल्यानंतर राजेंद्र खुंटे यांनी रामदास कांबळे यांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले.यावेळी रामदास कांबळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. जगातील आदर्शवादी समजल्या गेलेल्या भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची प्रत व पुस्तक भेट देऊन त्यांचा यथोचित असा सन्मान करण्यात आला.यावेळी राजेंद्र खुंटे यांच्या समवेत सुशिल गायकवाड उपस्थित होते.संविधान हे खूप महत्वाचे असून संविधानाचे संरक्षण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.संविधान लोकांपर्यंत घेऊन जाणे ही आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.संविधान उद्देशिका देत सन्मान करणे हा अत्यंत महत्वाचा उपक्रम असून यातून खऱ्या अर्थाने संविधानाचा प्रचार आणि प्रसार होत आहे.असे रामदास कांबळे यांनी म्हटले.

रामदास कांबळे हे गेली अनेक वर्षांपासून जनतेच्या हिताची कामे करत आलेले आहेत.पक्ष कोणताही असो ते ज्या पक्षातून कार्यरत असतात तिथे मात्र ते सामाजिक बांधिलकी जपत समाज सेवेचे कार्य करत असतात.सध्या रामदास कांबळे हे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षात असून ते पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक म्हणून कार्यरत आहेत.

याच पक्षाच्या माध्यमातून त्यांनी चांगलाच कार्याचा झंझावात निर्माण केलेला आहे.येणाऱ्या काळात समाजहितासोबतच संविधान प्रचाराचे कार्य सुद्धा अधिक जोमाने करत राहणार असल्याचा विश्वास रामदास कांबळे यांनी व्यक्त केलेला आहे.चळवळीतील कार्यकर्ते,जनता यांना सोबत घेऊन समाजहिताची कामे पक्षस्तरावर तसेच शासन आणि प्रशासन स्तरावर पाठपुराव्याने करत राहणार आहे.असे सुद्धा रामदास कांबळे यांनी सांगितले.



## राजूर येथे जी.ई.एस.एज्युकेशनल ग्रुपतर्फे जागतिक योग दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथे 21 जून रोजी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने जी.ई.एस.एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने शाळेच्या प्रांगणामध्ये योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी योग शिक्षिका मापारी मॅडम, शिक्षक मापारी सर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना योगाची विविध प्रात्यक्षिके करून दाखवली व निरोगी आरोग्यासाठी आपल्या जीवनात योगा आणि प्राणायाम किती महत्वाचा आहे. या विषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी योगा शिक्षकांनी विद्यार्थी आणि शिक्षकांकडून विविध प्रात्यक्षिके करून घेतली.दरवर्षी प्रमाणेच याहीवर्षी जी.ई.एस.ग्रुपच्या वतीने मोठ्या उत्साहात जागतिक योगा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी शाळेचे संस्थापकअध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे, प्राचार्या श्रीमती आशाताई पुंगळे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## आनंदवनातील कार्यकर्त्यांचा सन्मान हा माझाच सन्मानः डॉ. विकास आमटे

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** महामानव बाबा आमटे स्थापित आनंदवनाची निर्मिती ही असंख्य कार्यकर्त्यांच्या श्रम आणि कौशल्याचा परिपाक आहे. आनंदवनातील अशक्यप्राय कामे करताना मी कार्यकर्त्यांच्या विचार आणि कार्याशी एकरूप झालो. त्यामुळेच मी कार्यकर्त्यांपासून स्वतःला वेगळे समजले नाही; म्हणूनच कार्यकर्त्यांना मिळणारा सन्मान हा माझाच सन्मान आहे, असे प्रतिपादन आनंदवन महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे यांनी केले. श्रीरामपूर येथील संस्थापक सचिव सुखदेवराव सुकळे संचलित विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठांच्या वतीने आनंदवन येथे पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. विकास आमटे व डॉ. सौ. भारती आमटे या होत्या तर अध्यक्ष म्हणून सुखदेव सुकळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सुधाकर कडू यांनी केले. यावेळी श्रद्धेय बाबा आमटे व साधनाताई आमटे यांच्या विनम्र स्मृतीस अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठांच्यावतीने आनंदवनाच्या निर्मितीच्या प्रतिकूल परिस्थितीत ज्यांनी आपले मोलाचे अमूल्य योगदान दिले, असे सतरंजी विभागाचे निर्मितीकार, पर्यावरण स्नेही, विश्वस्त सुधाकर कडू गुरुजी यांना स्व. रावसाहेब शिंदे स्मृती राज्यस्तरीय शिक्षण साहित्य पुरस्कार तसेच आनंदवनात आपल्या श्रम आणि कौशल्यातून परिश्रमाने जलसंपन्नता प्राप्त करून दिली, असे यंत्रवीर अशोक बोलगुंडेवार यांना स्व. रावसाहेब शिंदे स्मृती राज्यस्तरीय सामाजिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. विकास आमटे यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, आनंदवनाची निर्मिती ही कार्यकर्त्यांची श्रम आणि कृतार्थ जीवनाची साफल्यता आहे. कार्यकर्त्यांच्या ऐतिहासिक कार्याची दखल घेतल्यामुळे विश्वलक्ष्मी प्रतिष्ठनला त्यांनी धन्यवाद दिले. सुधाकर कडू यांनी आपल्या सत्काराला उत्तर देताना सांगितले की, आनंदवन हे एकलव्याचे विद्यापीठ असून डॉ. विकास आमटे हे या विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. डॉ. विकास आमटे हे अनुभवांची कार्यशाळा असून त्या अनुभवांचा मी साक्षीदार आहे. बोलगुंडेवार यांनी पाणी प्रश्नावर काम करताना आपले अमूल्य अनुभव व्यक्त केले. डॉ. विकास आमटे यांनी प्रेरणा दिल्याने आनंदवनात जलसंधारणाचे खूप मोठे कार्य झाले आहे. त्याचा मी साक्षीदार आहे. अध्यक्षीय भाषणातून सुखदेव सुकळे यांनी श्रीरामपूर व आनंदवनाचे ऋणानुबंधाचे नाते कायम राहणार असून आनंदवनातील श्रमवीरांना पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करू शकलो, याबद्दल धन्यतेची भावना व्यक्त केली. याप्रसंगी आनंदवनाचे वैद्यकीय अधिकारी विश्वस्त डॉ. विजय पोळ, ज्येष्ठ कार्यकर्ते पत्रलेखक माधव कवीश्वर, जेष्ठ साहित्यिक ना.गो. थुटे, दिनेश पारख, डॉ. यशवंत घुमे, स्वरानंदवनचे समन्वयक सदाशिव ताजने यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.प्रवीण मुधोळकर यांनी केले तर शेवटी राजेश ताजने यांनी आभार मानले.



## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कन्नड तालुका अध्यक्षपदी अनिल शेळके यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा अध्यक्ष वैभव



मिटकरी यांनी प्रसिद्धी प्रत्रकाद्वारे कार्यकारणी जाहीर केली असुन कार्यकारणी खालील प्रमाणे. जिल्हा चिटणीस - विकास बागुल तालुका अध्यक्ष - अनिल शेळके, तालुका संघटक - शंकर मतसागर, शहर संघटक - संदीप सेठी तालुका उपाध्यक्ष - अशोक जाधव (औराळा सर्कल), शहर उपाध्यक्ष - अक्षय जाधव सर्कल अध्यक्ष - शरद मोरे, सर्कल अध्यक्ष - कृष्णा जाधव, जिल्हा उपाध्यक्ष शेतकरी संघटना - संतोष खेळवणे, या प्रमाणे पदाधीकार्यांची निवड महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष सन्मानीय राज ठाकरे यांच्या आदेशाने तसेच मनसे नेते बाळा नांदगावकर, दिलीप धोतरे सरचिटणीस संतोष नागोरजे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कन्नड विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कन्नड तालुक्यातील पक्ष संघटन अधिक बळकट करण्याकरिता, वरील पदाधिकारी यांची निवड करण्यात अली. निवड झाल्याबदल जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब थेटे, जिल्हा सचिव गौतम शिरसाठ ,शहर अध्यक्ष शशांक महादाणे, तालुका सचिव गोपालसिंग राजपूत, तालुका उपाध्यक्ष अशोक पवार, तालुका उपाध्यक्ष राहुल निकम,तालुका उपाध्यक्ष सांडू सुरे, तालुका उपाध्यक्ष संतोष सोनवणे, शहर सचिव शैलेश राऊत, शहर उपाध्यक्ष अमर राठोड, शहर उपाध्यक्ष रॉकी बन, मनसे शेतकरी सेने अध्यक्ष संदीप देवरे, सचिव योगेश पवार, ॲड. ज्ञानेश्वर चव्हाण, अजय राठोड, भरत भाऊ जाधव आदींनी अभिनंदन केले.

## आंतरराष्ट्रीय योगादिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** केंद्रीय प्राथमिक शाळा माळेगाव येथे ग्रामपंचायत व जि.प.शाळेच्या वतीने येथे आज दि.(२१) जुन रोजी आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामविकास अधिकारी संभाजी धुळगंडे, मुख्याध्यापक जी. एन. धुळगंडे यांनी प्रथम प्राणायाम भस्त्रिका,कपाल भाती, अनूलोमविलोम, कर्ण भेदी प्राणायाम, मंडूकासन, वज्रासन, सिंहासन,ताडासन इत्यादी विविध प्रकारचे कवायतीचे प्रकार करून दाखवले व विद्यार्थ्यांकडून करून घेतले. सदरील योग दिनास भरपूर विद्यार्थी, शाळेचा स्टाप उपस्थित होता. सर्वांनी अगदी मन लावून योगासनाचे प्रकार केले. योगसंगीतावर सुद्धा कवायत करण्यात आली. कु.संस्कृती घोरपडे,कु. प्रतिभा राठोड या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रामविकास अधिकारी संभाजीराव धुळगंडे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना बिस्किट पुडे व नाष्टा दिला. गोपाला गोपाला या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. तर शेवटी कु.पायल जोंधळे या विद्यार्थीनीने आभार मानले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाघमारे सर, सोनकांबळे सर, मेकाले सर, सौ. लहुबंदे मैडम,सौ. कल्याणी मैडम, सौ. दिक्कतवार मैडम,सौ.कोकणारे मैडम व ग्रामपंचायत लिपिक खंडू साखरे यांनी सहकार्य केले.

## चंद्रपुरात पावसाअभावी पेरण्या खोळंबल्या

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जून महिन्याचे बावीस दिवस लोटले. या बावीस दिवसांत केवळ ३८.५ मि.मी. पाऊस जिल्ह्यात झाला. त्याचा थेट परिणाम पेरणीवर झालेला दिसून येत आहे. अनेक भागातील पेरण्या खोळंबल्या आहेत. जिल्ह्यात खरीप हंगामाचे क्षेत्र ४ लाख ५८ हजार ७२९ हेक्टर इतके आहे. त्यापैकी केवळ १४ हजार ४५९ हेक्टर क्षेत्रावर म्हणजे २.७२ टक्के पेरण्या झाल्या आहेत. चांगला पाऊस पडेल या आशेवर जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांनी पेरणी केली. प्रारंभी काही भागात हजेरी लावणाऱ्या पावसाने उसंत घेतली. त्याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला. जमिनीत पेरलेले बियाणे करपले आणि बळीराजावर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. या जिल्ह्याचे खरीप हंगामाचे सरासरी क्षेत्र ४ लाख ५८ हजार ७२९ हेक्टर इतके आहे. चंद्रपूर जिल्ह्यात प्रामुख्याने धानाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाते. त्यापाठोपाठ कापूस, सोयाबीन आणि तुरीचा समावेश आहे. कापसाचे क्षेत्र एक लाख ९० हजार हेक्टर, धान एक लाख ८५ हजार, सोयाबीन ७० हजार आणि तुरीचे पीक ३४ हजार हेक्टर क्षेत्रावर घेतले जाते. सिंचनाची सुविधा असलेले शेतकरी पावसाळ्याआधीच पेरणीची कामे करतात, तर सिंचन सुविधा नसलेले शेतकरी पावसावर अवलंबून असतात.नेहमीप्रमाणे यंदाही हवामान खात्याने जून महिन्यापासूनच चांगला पाऊस पडेल, असा अंदाज वर्तविला होता. पुन्हा पाऊस पडेल या आशेवर अनेक शेतकऱ्यांनी कापूस, सोयाबीन आणि धानाची लागवड केली.

# रेल्वेचं स्वप्नं दाखवणाऱ्या नेत्यांनो गावात बस तरी आणा

## भूमिपूजन डॉ.पद्मसिंह पाटील : उद्घाटन माजी खासदार रवि गायकवाड, समस्या खा. ओमराजेंच्या जनता दरबारात, तरीही वाशी तालुक्याचे बसस्टॅन्ड चिखलातच..!

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** ग्रामीण भागात किंवा शहरी भागात त्या जिल्ह्याची तालुक्याची तसेच तेथील शहराची, गावाची ओळख ही तेथील विकासावर पर्यटन स्थळावर एखाद्या देवी देवतांचे मंदिर, एखादा प्रसिद्ध दर्गा पीर, त्या गावात भरणारी यात्रा तिथे असणारे निसर्ग सौंदर्य यावर अवलंबून असते. पण महाराष्ट्रातील धाराशिव जिल्ह्याची ओळख ही विकासापासून वंचित जिल्हा म्हणून आजपर्यंत केले जात आहे. या जिल्ह्याचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे या जिल्ह्याला वाशी व लोहारा अशा दोन तालुके आहेत. जिथे विकास हा शब्द जर ऐकला तरी सर्वसामान्यांचे भुवया उंचावतात. त्यातली त्यात वाशी तालुका हा खरच तालुका म्हणावं की, एखाद्या सुधारित खेड अशीच या तालुक्या बाबत जनसामान्यांची भावना झालेली आहे.

या वाशी तालुक्याला स्थानिक नेत्यांचं,गाव पुढाऱ्यांचं असं कुठलंच एकही विकास काम किंवा योजना नाही. ज्यामुळे या तालुक्याला तेथील वैशिष्ट्यामुळे ओळखले जावे.

या वाशी (सुधारित खेड्यात) गावात पूर्वी दिवाळीच्या पाडव्याला भली मोठी यात्रा असायची या दिवशी इथे खूप मोठ्या कुस्ती स्पर्धा व्हायच्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येथे मल्ल कुस्ती खेळण्यासाठी दाखल व्हायचे पण येथील स्थानिक नेत्यांच्या उदासीनतेमुळे त्या कुस्ती स्पर्धेला उतरती कळा लागलेली आहे.

या वाशी सारख्या सुधारित खेड्यात तालुका होण्याअगोदर जनावरांचा खरेदी विक्रीचा खूप मोठा बाजार भरायचा त्यावर व्यापारी,हॉटेल,टपरी चालक,दावे दोरखंड विकणारे,जनावरांचा कडबा यामधून गावात चांगलीच आर्थिक उलाढाल व्हायची पण गाव खेड्यातील पुढाऱ्यांच्या सुधारित खेड्याच्या भविष्याचं नियोजन नसल्याने येथील जनावरांच्या बाजारालाही कायमची दातखीळ बसली गेली आहे. आता विषय शेतकऱ्यांच्या शेतमालासाठी असलेली बाजारपेठ ती म्हणजे वाशी येथील बाजार समिती तिचं बांधकाम फक्त गुत्तेदारी पुरतच झालं





त्यानंतर व्यापारासाठी सुविधा देणे व्यापाऱ्यांना रस्ते, वीज, पाणी, शौचालय याचा कायम अभाव आहे. यामुळेच या गाव पुढार्‌यांच्या खाऊगिरीमुळे त्याचा फटका व्यापारी तसेच शेतकऱ्यांना चांगला बसला त्यामुळे अगदी हाकेच्या अंतरावर असलेली कळंब येथील बाजारपेठेला स्थानिक नेत्यांच्या नाकर्तेपणामुळे आपोआप बळ मिळत गेले आहे. तालुक्याच्या विकासाचा महत्वाचा भाग म्हणजे तेथील दळणवळण सर्वसामान्यांचा दळणवळणाचा प्रमुख स्रोत म्हणजे एसटी बस या एसटी बसची चाके लोकप्रतिनिधी व गाव पुढाऱ्यांकडून जाणीवपूर्वक केला जाणारा कानाडोळा यामुळे चिखलात फसलेली आहेत. ज्या तालुक्याच्या गावाच्या बस स्थानकाचे भूमिपूजन हे महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री, माजी खासदार, माजी ऊर्जामंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांच्या हस्ते झाले. या बस स्थानकाच्या इमारतीचे पूजन माजी खासदार रवी गायकवाड व परिवहन महामंडळाचे माजी मंत्री दिवाकर रावते यांच्या हस्ते झाले. आज एवढे वर्ष उलटूनही ह्या बसस्थानकाला जाणाऱ्या रस्त्यापेक्षा शेतातील शेत रस्ता बरा आहे. ही तालुक्याचा विकास केला म्हणणाऱ्या नेत्यांसाठी खूपच लाजिरवाणी गोष्ट आहे. वाशी येथे पहिला जनता दरबार घेणारे लोकप्रतिनिधी ओम राजे निंबाळकर व पालकमंत्री सावंत साहेब यांच्या समोर बस स्थानकाचे व त्याला जोडणाऱ्या प्रमुख रस्त्याचे आजारपण याबाबत सांगितले गेले होते. मात्र एका फोनवर काम करणारे खासदार व विकासाची गंगा वाहून आणणारे जिल्ह्याचे पालकमंत्री यांनाही या उपेक्षित बस स्थानक व बस स्थानक रस्त्याचा विसर पडला आहे. असंच येथील जनतेमधून बोललं जात आहे.

इकडे गुत्तेदारीसाठी मुंबईपर्यंत चकरा मारणारे गाव चालवणाऱ्या कारभारी मंडळींना या बस स्थानक व त्याला जोडणारा रस्ता याबाबत गांभीर्य वाटत नाही. एकत्रित येऊन सत्ता स्थापन नगरसेवक नगरसेवक वाशी नगरपंचायत अंतर्गत रस्ते कामे, वॉल कंपाऊंड ची कामे,नाल्यांची कामे यासारखी इतर कामे करण्यासाठी व इतर कामे मिळवण्यासाठी एकमेकांच्या अंगावर गंभीर होऊन धावून येत आहेत. अनेक नगरसेवक आपापल्या सोयीनुसार खासदार आमदार फंडातून अशा विविध फंडातून निधी आणून गुत्तेदारी करण्यात मग्न आहेत.

पाणीटंचाई काळात आपापल्या प्रभागात एखादं दुसरं टँकर पाणी वाटून सोशल मीडियावर गावात पाणी वाटलं म्हणून स्वतःच्या हाताने स्वतःच्या पाठीवर थाप मारणारे नगरसेवक बस स्टॅन्ड ला जाणाऱ्या रस्त्याच्या खड्ड्यात एखादी मुरमाची खेप टाकू शकतं नाही का? असा सवाल वाशी तालुक्यातील प्रवाशांमधून वारंवार केला जात आहे. या तालुक्यातून गेलेला राष्ट्रीय महामार्ग यावरून धावणाऱ्या एसटी बसेस ह्या या चिखलात फसलेल्या बसस्थानकामुळे महामार्गावरील एकही एसटी बस स्थानकाकडे फिरकत नाही. आम्ही तालुक्याचे नेतृत्व पाहतो म्हणणाऱ्या या नावापुरत्या नेत्यांसाठी ही अतिशय खेदजनक बाब आहे. तालुक्याचे गाव असून येथे एसटी बस न येणे, खुंटलेली बाजारपेठ, नेत्यांच्याच गुत्तेदारीने व अधिकाऱ्यांच्या टक्केवारीने कायम विखुरलेले रस्ते या अश्या अनेक कारणाने नविन वाशी तालुका निर्मिती करताना त्यात समाविष्ट केलेली गावे आज घडीला बोटावर मोजणे इतकी शिल्लक राहिले आहेत. काही गावे वाशीच्या हाकेच्या अंतरावर आहेत. मात्र इथल्या सुविधांच्या तीन तेरा पाहून त्यांनी आपल्या जुन्या तालुक्यांमध्येच त्यांच्या गावाला समाविष्ट करून घेतल आहे.



# आदर्श उच्च मा. विद्यालय व ग्रामगीता महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योगा दिन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पिंपळगाव वळण येथील आदर्श प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच ग्रामगीता महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योगा साजरा करण्यात आला. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांचे सहप्रतिनिधींनी या प्रस्तावाला पाठींबा दिला होता. सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, चीन, फ्रान्स, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहभागी झाले होते. याआनुषागाने पिंपळगाव वळण येथील आदर्श प्राथमिक माध्यमिक,व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच ग्रामगीता माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे अध्यक्ष व शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष श्री काशिनाथ जाधव, संस्थेच्या संचालिका लताबाई जाधव,शाळेचे संचालक गोकुळ निळ,संस्थेचे सचिव व कृषी उत्पन्न बाजार समिती फुलंब्री संचालक श्री योगेश जाधव, मुख्याध्यापिका अश्विनी जाधव तसेच शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी या योगा दिना निमित्त योगा करण्यात आला आहे.

# जिल्हाधिकारी साहेब ईकडे पण लक्ष असू द्या; 847 वर्षांपासून पंढरीला जाते या गावातील पायीदिंडी

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** पंढरीच्या वारीची चाहुल लागताच वारकरी,शेतकरी,भाविक निर्जला एकादशी पासुनच आवरायला सुरवात करतो,शेतीच्या कामाचा वेग वाढतो अण जसा पाई वारीत जाण्याचा दिवस येतो त्या आधी पिशवी,टोपी,पांढराशुभ्र पेहराव, पावसाने भिजु नये म्हणून घोगंता घेत दिंडीत सामिल होतो. मानाच्या दिंड्यात लाखो वारकरी असतात त्यांना शासन,प्रशासनाच्या वतीने रस्त्यालगत सर्व सुविधा उपलब्ध होतात. परंतु ज्या घराण्यात पाई वारीची परंपरा गेल्या आठ शतकापुर्विपासुन आज ही अखंड सुरूच आहे त्या माऊलींच्या जन्मगावच्या दिंडीत शासन किती सुविधा देतं हे पाहण गरजेचे असुन दर वर्षी संभाजीनगरचे जिल्हाधिकारी वारीचा आढावा पैठण मधे घेतात अण संत ज्ञानेश्वर महाराज जन्मभूमी असलेल्या आपेगाव हुन निघणाऱ्या दिंडी सोहळ्या कडे दुर्लक्ष होताना दिसतंय. आपेगाव ते पंढरपूर कडे जाणारा मार्ग आजही खडतर आहे,गेल्या



कित्येक वर्षांपासून गोदावरी नदीतील पालखी पुल कोसळला असल्याने नव्याने या पुलाची बांधकाम चालु आहे परंतु अद्यापही हा पुल तयार झाला नसुन आपेगाव हुन 10 कि.मी.चा फेरा पार करून जाव लागते.

हे सार असुनही माउलींच्या पाई पालखी सोबत काय सुविधा दिल्या जातात याचाही एकदा आढाव घ्या जिल्हाधिकारी साहेब. तुम्ही काल सांगितल्या प्रमाण वारकर्यांची सेवा हिच ईश्वर सेवा समजून काम कारा,परंतु आपेगावातुनही वारकरीच पंढरीला पाई जातात ते ही 847 वर्षांपासून मग तहसीलदार,उपविभागीय अधिकारी,तथा जिल्हाधिकारी यांनी आजतागायत दखल का घेतली नसल्याचा आरोप वारकरी करतात.

# संत रुपलाल महाराज स्मारकासाठी बारी महासंघाचा लढा सुरूच राहील : इंजि.रमेशचंद्र घोलप

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** दि.२१ अंजनगाव (सुर्जी) येथील संत शिरोमणी रूपलाल महाराज हे तमाम बारी समाजाचे आराध्य दैवत आहे. अंजनगाव सुर्जी येथे त्यांचे १५ एकर जागेमध्ये त्यांचे भव्य स्मारक व्हावे यासाठी सर्व पक्ष बाजूला सारून समाज बांधव लढा देत आहेत. गेल्या वर्षी शेगाव येथे झालेल्या अधिवेशनात एक लाख पर्यंत समाज समाज बांधवांच्या उपस्थितीत ठराव मंजूर झाले. आतापर्यंत विविध लोकप्रतिनिधी पर्यंत समाज बांधवांनी पाठपुरावा केला. आतापर्यंत रुपलाल महाराज यांचे स्मारकाचे कामाचा श्री गणेशा व्हायला हवा होता परंतु ते अद्याप मंजूर होऊ शकले नाही आणि इतर ठरावांची सुद्धा पूर्तता झाली नाही. बारी समाज बांधवांचे हित लक्षात घेता आणि संत रुपलाल महाराज यांच्या प्रति असलेली श्रद्धा लक्षात घेता बारी समाज बांधवांनी सर्व पक्ष भेद विसरून आपल्या मागण्यांसाठी हा लढा मागण्या मान्य होईपर्यंत अविरत



सुरूच ठेवावा असे आवाहन राष्ट्रीय बारी समाज महासंघाचे संस्थापक अध्यक्ष इंजिनियर रमेशचंद्र घोलप यांनी केले. संत शिरोमणी श्री रूपलाल महाराज यांचे भव्य राष्ट्रीय स्मारक व्हावे तसेच बारी समाजाला आर्थिक विकास महामंडळ , पान पिंपरी, पान मळे यांना औषधी पिकाचादर्जा,पिक विमा मिळावा या व अशा मागण्या घेऊन मागील वर्षी १ आक्टोंबर ला अखिल भारतीय बारी विकास महासंघ तर्फे शेगाव येथे महाअधिवेशन भरविण्यात आले होते त्या पार्श्वभूमीवर दिनांक १५ जून ला शेगाव येथे महाराष्ट्र स्तरावरील पदाधिकारी व समाज बांधव एकत्र येऊन वरील विषयास अनुसरून सखोल चर्चा करण्यात आली व ठरविण्यात आले की बारी समाजाच्या मागण्या विषयी शासनाला १८जून २०२४ ला ला निवेदन देणे व २०जून ला एकदिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन करणे त्यानुसार दिनांक १८ जून रोजी दुपारी १ वाजता जळगाव जामोद येथे संजय ढगे व समाज बांधव यांचे माध्यमातून उपविभागीय अधिकारी जळगाव जामोद यांना २० जूनला १ दिवस लाक्षणिक धरणे आंदोलन अशा आशयाचे निवेदन सादर केले होते. यावेळेस सर्व समाजातील खालील गणमान्य व्यक्ती उपस्थित होत्या अखिल भारतीय बारी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री रमेशचंद्र घोलप तसेच अखिल भारतीय बारी महासंघ विश्वस्त, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते गुणवंतराव कपले, पांडुरंग हागे, अशोक काळपांडे, सुभाष हागे,महादेवराव धूर्डे, रामभाऊ राऊत, शिवसेनेचे तुकाराम भाऊ काळपांडे, रमेश ताडे,समाधान पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संजय ढगे, काँग्रेस चे श्यामभाऊ डाबरे, किसना दामधर, वसंत धूर्डे, समाधान नानकदे, समाधान दामधर, महेंद्र बोडखे, श्रीकृष्ण केदार, गोपाल कोथळकर, प्रल्हाद राऊत, संजय लक्ष्मण ढगे, संजय पवार, बळीराम धुळे, प्रल्हाद दातार, शंकर म्हस्के, उमेश हिस्सल, गोपाल फुसे, समाधान पाटील, सत्यविजय सातव, गणेश धर्मे, पुंडलिक पाटील, विजय वंडाळे, रामेश्वर कतोरे, लक्ष्मण नानकदे, प्रतीक कळस्कर, राजू मिसाळ, पांडुरंग ढगे, गणेश म्हस्के, भास्कर वंडाळे, गजानन गणपत दातीर,गौरव डोबे, विकास धुळे, तसेच यावेळी काँग्रेस चे डॉ सौ. स्वातीताई वाकेकर, अविनाश उमरकर, आसिफ इकबाल,राजेश्वर देशमुख आंदोलनाला यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शिवला. असे पत्रक अखिल भारतीय बारी समाज महासंघ संस्थांचे संस्थापक विश्वस्त श्री अर्जुन भाऊ घोलप यांनी प्रसिद्धीस दिले.

# वाकद ग्राम पंचायतला सरपंचासह सदस्यांनी लावले कुलूप

## मासिक सभा, ग्रामसभांना हरताळ : ग्रामविकास अधिकारीच नसल्याने कामे खोळंबली

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**
**रिसोड :** तालुक्यातील बोटावर मोजण्या इतक्या मोठ्या असलेल्या ग्राम पंचायती पैकी एक मोठी ग्राम पंचायत म्हणून ओळख असलेल्या ग्राम वाकद येथे मागील तीन महिन्यांपासून ग्रामविकास अधिकारी नसल्याने मासिक सभा, ग्राम सभा देखील घेण्यात आल्या नसल्याने विविध ग्राम विकासाची कामे जसे प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याची समस्या, पावसाळ्यापूर्वी गावातील नाल्या साफ करने, घरकुल लाभार्थ्यांची कामे,जन्म मृत्यू नोंदी दाखले तसेच विविध कामांसाठी लागणारी कागदपत्रे, शैक्षणिक दाखले गावात ग्राम विकास अधिकारी नसल्याने खोळंबली आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला सरपंच, सदस्य कसे तोंड देणार त्याला कंटाळून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनाक 18 जून रोजी निवेदन देण्यात आले होते. तसेच निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री, ग्राम विकास मंत्री मंत्रालय मुंबई यांना देखील पाठविण्यात आल्या आहेत. निवेदन दिल्यानंतर प्रशासन प्रश्न मार्गी लावेल या आशेने तीन दिवस वाट पाहिली मात्र काहीच हालचाल होत नसल्याने वाकद येथील सरपंच्यासह सदस्य देखील आक्रमक झाले असून ग्राम पंचायत कार्यालयाला कुलूप लावण्याचा निर्णय घेतला आहे. प्रशासन वारंवार याकडे दुर्लक्ष करीत आहे. जोपर्यंत गावातील प्रत्येक प्रश्न सुटत नाही व ग्राम विकास अधिकारी गावामध्ये हजर राहत नाही तोपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयाला सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी दिनांक 22 जून 2024 रोजी सकाळी 11 वाजता कुलूप लावले आहे. आमच्या मागणीची दखल न घेतल्यास उपोषणाचा इशारा देखील देण्यात आला आहे.

वाकद ग्राम पंचायत ही मोठी ग्राम पंचायत असून आमच्या ग्राम पंचायत ला कायम स्वरुपी ग्राम विकास अधिकारी नसल्याने मासिक सभा, ग्राम सभा देखील होत नाहीत . प्रभारी ग्राम विकास अधिकारी गावात येत नसल्याने अनेक विकास कामे तसेच शैक्षणिक दाखले इत्यादी नागरिकांची कामे खोळंबली आहेत .त्यातच पिण्याच्या पाण्याची समस्या आ वासून उभी आहे . मागील तीन महिन्यापासून ग्राम विकास अधिकारी गावात येत नसल्याने जिल्हा प्रशासनाला निवेदन देऊन आज दिनाक 22 जून पासून वाकद ग्राम पंचायतला कुलूप लावण्यात आले आहे . प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असून, तात्काळ प्रश्न मार्गी लावावा अन्यथा उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल .

**अमोल देशमुख सरपंच वाकद**

ग्राम पंचायत वाकद सरपंच आणि सदस्यांचे ग्राम पंचायत लास कुलूप लावण्या बाबतचे निवेदन प्राप्त झाले असून निवेदनात ग्रामविकास अधिकारी हे गावात येत नसल्याचे नमूद करण्यात आले आहे . परंतु वाकद ग्राम पंचायतला रवींद्र खिराडे हे प्रभारी ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत आहेत .सरपंच यांच्या निवेदना प्रमाणे ते गावामधे येतात किंवा नाही या बाबत पूर्ण माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल . **प्रमोद बदरखे गट विकास अधिकारी प .स .रिसोड**







# फुलंब्री येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील शांतिनिकेतन विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरीभाऊ बागडे नाना यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचबरोबर नागरिक, महिला युवक व शालेय विद्यार्थी यांनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनात विविध योगासनांची उत्तम प्रात्यक्षिके सादर केली. शरीर, मन व आत्मा यांचे संतुलन म्हणजेच योगदर्शन हे मानवाला परमशक्तीशी संलग्न करण्याचे शास्त्र आहे. या प्राचीन शास्त्राचा जगाला लाभ व्हावा म्हणून भारताचे यशस्वी पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या पुढाकाराने 21 जून 2014 पासून संपूर्ण जगात योगदिन साजरा केला जातो. 'महिला सक्षमीकरणासाठी योग' ही या वर्षीची थीम असून जागतिक आरोग्य व शांततेला प्रोत्साहन देऊन योगाभ्यासाला एक व्यापक चळवळ म्हणून चालना देणे हा योग महोत्सव 2024 चा उद्देश आहे. पुरातन काळापासून ऋषी-मुनींनी जोपासलेले हे शास्त्र आजच्या धकाधकीच्या व तणावपूर्ण जीवनात मानसिक शांती व निरोगी आयुष्यासाठी मोठे वरदान असून प्रत्येकाने आपल्या व्यग्र दिनचर्येतून किमान अर्धा तास वेळ काढून योगाची 9 आसने नियमितपणे करावी, असे



मार्गदर्शन या वेळी केले. यावेळी जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती अनुराधाताई चव्हाण, भाजपा जिल्हा सरचिटणीस ऐश्वर्याताई गाडेकर, माजी पंचायत समिती सभापती सविताताई फुके, तालुकाध्यक्ष सांडू अण्णा जाधव, भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ, भाजपा योग दिन तालुका संयोजक अभिषेक गाडेकर, तालुका सहसंयोजक योग दिन जनार्दन सिसोदे, अजय शेरकर, इलियास शहा, योग प्रशिक्षक कल्याणकर सर, डॉ. अक्षय गाडेकर यांच्यासह मोठ्या संख्येने शिक्षक, विद्यार्थी व पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# धर्माबाद बालविकास प्रकल्प कार्यालय चालते रामभरोसे

## तब्बल दहा वर्षांपासून बालविकास प्रकल्प अधिकाऱ्याचा प्रभारी चार्ज

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**
**धर्माबाद :** तालुक्यातील अंगणवाडी तील चिमुकल्या बालकांचा कारभार पाहणाऱ्या येथील एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयात तब्बल दहा वर्षांपासून बालविकास प्रकल्प अधिका-याचा प्रभारी चार्ज असल्याने तालुक्यातील अंगणवाडीसह कार्यालय रामभरोसे चालत आहे. प्रभारी चार्ज घेतलेले प्रकल्प अधिकारी सहा सहा महिने येत नसल्याने अंगणवाडीवर वचक नसल्याने खाऊ मेनु प्रमाणे मिळत नाही व कुपोषित बालकांची संख्या वाढत आहे.एवढेच नसुन लक्ष कोणीच देत नसल्याने चिमुकलेची शाळा बंद असते की चालू हे सुध्दा कळत नाही.यामुळे चिमुकले मुले वा-यावर पडत आहे. धर्माबाद तालुक्यात एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय सन २०१० मध्ये कार्यन्वीत झाले. धर्माबाद एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय अंतर्गत करखेली, मंगळनाळी, आणि जारिकोट तीन सर्कल असुन या तीन सर्कल मध्ये ८५ अंगणवाडी आहेत.या ८५ अंगणवाडीचा कारभार पाहणाऱ्या सन २०१३ पासुन म्हणजेच तब्बल दहा वर्षांपासून बालविकास प्रकल्प अधिकारी हे पद प्रभारी म्हणून आहे.आताही शिवगंगा पवार यांना धर्माबादचा बालविकास प्रकल्प अधिकारी म्हणून अतिरिक्त चार्ज गेल्या वर्षी देण्यात आला.शिवगंगा पवार यांना नांदेड, लोहा व धर्माबाद असे तीन ठिकाणचा चार्ज असल्यामुळे सहा सहा महिने धर्माबाद ला येत नाहीत अशी तक्रार होत आहे. त्यामुळे कार्यालयसह अंगणवाडी रामभरोसे चालत आहे. अधिकारीच जाग्यावर नसल्याने अंगणवाडीवर वचक ही राहत नाही, चिमुकल्या ला आणलेला खाऊ मेनू प्रमाणे ही मिळत नाही,आणत असलेला खाऊ ही पोष्टीक नसल्याने कूपोषीतची संख्या वाढत आहे.काही अंगणवाडी बंद ही अवस्थेत दिसुन येतात. मदतनीस,सेविका काही अंगणवाडीत दांडी मारतात.यावर कोणाचाही वचक नसल्याने धर्माबाद येथील कार्यालयसह अंगणवाडी रामभरोसे चालत आहे.सन २०१० पासुन म्हणजेच चौदा वर्षात केवळ एकच एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी धर्माबादला मिळाला तेही ए.आर.लामतुरे या अधिकारीच्या स्वरुपात. बाकी दहा वर्षांत दहा अधिकारी प्रभारी म्हणुन मिळाले. प्रभारी अधिकारी च्या हातात कारभार असल्यामुळे तालुक्यातील अंगणवाडी रामभरोसे चालत तर आहेच पण यात चिमुकले मुले वा-यावर पडत आहे.

# मनोज पवार यांच्यातर्फे गुणवंतांचा सन्मान सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे फेब्रुवारी व मार्च 2024 या परीक्षेत इयत्ता दहावी आणि बारावीला गुणानुक्रमे प्रथम आलेल्या पहिल्या शंभर विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित केला आहे. विद्यार्थी हा आपल्या देशाचा आधार आहे. या विद्यार्थ्याला प्रेरणा देण्यासाठी त्याचा सन्मान होणे गरजेचे आहे, ही बाब हेरून उद्योजक तथा समाजसेवक मनोज केशवराव पवार यांच्या वतीने ह्या सन्मान सोहळ्याचे आयोजन केले आहे. सोमवार दिनांक 1 जुलै सकाळी 11:00 वा. कन्नड येथील राजुरेश्वर मंगल कार्यालयात हा समारंभ होईल. त्यासाठी कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातील विद्यार्थ्यांनी आपले गुणपत्रक, पासपोर्ट फोटो आणि गावाचे



नाव दि. 24 जून पर्यंत 8421073727 या क्रमांकावर व्हाट्सअप करावे. प्राप्त गुणपत्रकांतून गुनानुक्रमे इयत्ता दहावीतील आणि इयत्ता बारावीतील प्रत्येकी पहिल्या शंभर विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह आणि प्रत्येकी पहिल्या तीन विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्हासह रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात येईल. यानिमित्ताने 'घे उंच भरारी' या विषयावर लेखक तथा व्याख्याते प्रा. डॉ. संजय गायकवाड, विचारवंत प्रा. रंगनाथ लहाने आणि वित्त व लेखाधिकारी शरद भिंगारे हे भाष्य करणार आहेत. कार्यक्रमास निवृत्त शिक्षणाधिकारी डॉक्टर टी. पी. पाटील, डॉ. सिताराम जाधव, पी.एम. डहाके, डॉ. मिलिंद पाटील, डॉ. विजय भोसले, टी. एस. कदम, एकलव्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पवन सोनवणे, सागर जाधव, जिल्हा परीषद सदस्य किशोर पवार, भाजपाचे उत्तमराव राठोड, माजी उपनगर अध्यक्ष अब्दुल जावेद, माजी नगर सेवक अहमद अली, सुधाकर देवकर, अरविंद कांबळे यांची विशेष उपस्थिती राहील. पुरस्कारार्थी विद्यार्थ्यांना त्यांची निवड फोनद्वारे कळविण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांनी सन्मान सोहळ्यास आपल्या आई-वडिलांसह उपस्थित राहावे, असे आवाहन उद्योजक मनोज पवार मित्रमंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# किनगाव राजा - पांगरी उगले रस्त्यावर पडले खड्डे

## रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता : पाच किलोमीटरसाठी लागतो अर्धा तास

आधुनिक केसरी न्यूज

**इसाक कुरेशी**

**सिंदखेड :** राजा तालुक्यातील किनगाव राजा ते पांगरी या पाच किलोमीटर गावाला जाण्यासाठी दीडशे ते दोनशे खड्ड्यातून रस्ता शोधावा लागतो खड्ड्यातून प्रवास करावा लागतो खड्ड्यात रस्ते की रस्त्यात खड्डा असा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे मोठाले गटार साचले आहे हा गटार चुकवण्यासाठी गाडी दुसऱ्या गटारात जाते त्यामुळे या खड्ड्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही किनगाव राजा या गावाला जाण्यासाठी दवाखाना, शाळा, व बाजार मार्केट, मध्ये व हा एकमेव रस्ता या गावासाठी उपलब्ध आहे मात्र या रस्त्याची खूप दयनीय अवस्था झालेली आहे या रस्त्याकडे कोणी लोकप्रतिनिधी सुद्धा आता पर्यंत लक्ष दिलं नाही दिले नुसते आश्वासन असा प्रश्न येथील नागरिकाच्या मनामध्ये आहे त्यामुळे या रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरू करावे अशी चर्चा गावकऱ्यांमध्ये आहे या रस्त्यामुळे मोटरसायकल धारक रिक्षा धारक व मोटार वाहन यांना आपली गाडी कोणत्या खड्ड्यात टाकावी व कोणता खड्डा हुकवावा हेच लक्षात येत नाही कारण की खड्डे एवढे मोठे झाले आहे पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे या खड्ड्यामध्ये खूप पाणी साचलेले आहे या सासलेल्या पाण्यामुळे खड्ड्याचा अंदाज येणे मुश्किल होतो अचानक अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि या अगोदर अपघात सुद्धा झालेले आहे त्या मुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याला लवकरात लवकर दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे रस्त्याच्या कडेला असलेली झाडे झुडपे मुळे समोरच्या गाडीचा अंदाज सुद्धा येणे ह्या रस्त्यावर कठीण झाले आहे त्यामुळे या रस्त्याच्या काठावरती जे झाडे आलेले आहेत ते झुडपे आलेले आहेत ते लवकरात लवकर तोडून या रस्त्याची लवकरात लवकर कामाला सुरुवात करावी.

किनगाव राजा लां जाण्यासाठी हाच एकमेव रस्ता आहे या रस्त्यावर मेठ मोठाले खडे पडले आहे पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे या खड्ड्यामध्ये पाणी साचलेले आहे या पाणी साचलेल्या खड्ड्याचा अंदाज येणे खूप मुश्किल होते यामुळे मोठा अपघात होऊ शकतो त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने पांगरी उगले किनगाव राजा या रस्त्याला लवकरात लवकर हिरवी झेंडी दाखवून काम सुरू करावे .

**मनोहर पवार, उपसरपंच पांगरी उगले**

या पाच किलोमीटर किनगाव राजाला जाण्यासाठी आम्हाला अर्धा घंटा लागतो या खड्ड्यामुळे आमच्या गावाला जाण्यासाठी आम्हाला मोठा त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर एक तर दुरुस्त करावे अन्यथा आम्ही गावकरी मिळून मोठे आंदोलन उभारल्या शिवाय पर्याय नाही .

**विकास उगलेस्वाभिमानी शेतकरी संघटना तालुकाध्यक्ष, पांगरी उगले**

माझ्याकडे रिक्षा आहे तीन चाकाची एवढे मोठे खड्डे पडले आहे की मला संध्याकाळी या खड्ड्यामुळे पाठीचा त्रास झालेला आहे कोणता खड्ड्यांमध्ये गाडी टाकावी व कोणता खड्डा हुकूवावा हेच कळत नाही तीन चाकाच्या रिक्षाला एक तर रस्ता चांगला पाहिजेत कधी कधी एखाद्या पेशंटला घेऊन जायचं असल्यास तो पेशंट मधातच जीव सोडेल असा प्रश्न माझ्या मनामध्ये निर्माण होतो त्यामुळे शासनाने हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करावे अशी आमची मागणी आहे .

**शेख साजिद रिक्षा धारक पांगरी उगले**



हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करण्यात यावे अन्यथा आम्ही सर्व गावकरी मिळून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारल्यासमोर बसून मोठा आंदोलन उभारू आम्हाला या खड्ड्यामधून वाट काढण्यासाठी खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे शासनाने याची लवकरात लवकर दाखल घ्यावी आम्हाला पुढचे पाऊल उचलण्यास भाग पाडू नये . **गजानन निकाळजे माजी उपसरपंच पांगरी उगले**



# ऊस बेणे अर्ज भरण्यासाठी कवठे कार्यालयात शेतकऱ्यांची मोठी गर्दी

## भीमाशंकरच्या सुधारित ऊस बेने लावण्याकडे कल

आधुनिक केसरी न्यूज

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील कवठे यमाई परिसरातून गेलेल्या डिंबा उजवा कालवा व घोड नदी मुळे कवठे येमाई परिसरातील बहुसंख्य शेत जमीन गेल्या दहा पंधरा वर्षात बागायती झाल्याचे पहावयास मिळते. एक हमखास उत्पन्न देणारे पीक म्हणून आता शेतकरी ऊस पिकद्वारे प्राधान्याने उत्पन्न घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यातच जवळच असलेला व राज्याचे सहकार मंत्री तथा या भागाचे लोकाभिमुख कार्य करणारे आमदार दिलीपराव वळसे पाटील संस्थापक अध्यक्ष असलेला भीमाशंकर सहकारी साखर कारखाना व रावडेवाडी येथील पराग कारखाना तोडणीवेळेस ऊस देण्यासाठी खात्रीशीर व वेळेत उसाचे पेमेंट देणारा कारखाना म्हणून ज्ञात आहे. सध्या अनेक शेतकऱ्यांची नव्याने ऊस लागवड करण्याची धांदल,गडबड सुरू असून भीमाशंकर सहकारी कारखान्याचे सुधारित २६५ जातीचे ऊस बेणे लावण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. कारखान्याच्या कवठे यमाई विभागीय कार्यालयात आत्तापर्यंत सुमारे ३२५ शेतकऱ्यांनी ऊस बेणे मिळण्यासाठी नोंदणी केली असून गटात सुमारे २५० हेक्टर क्षेत्रात आज पर्यंत ऊस लागवड झाल्याचे व अद्यापही शेतकऱ्यांकडून ऊस बेण्यासाठी मोठी मागणी येत असल्याची माहिती कार्यालयातील लेखनिक बाळासाहेब विरकर यांनी दिली. शेतकऱ्यांना पूर्ण समाधान मिळेल असे कवठे येथील भीमाशंकर कारखान्याच्या विभागीय गट कार्यालयाचे कामकाज असून या कामकाजाबाबत परिसरातील शेतकरी, भीमाशंकर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप दादा वळसे पाटील, युवा क्रांती पोलीस मित्र ग्राहक पत्रकार संरक्षण संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धीप्रमुख तथा मार्गदर्शक प्राध्यापक पत्रकार सुभाष शेटे यांनी समाधान व्यक्त केले आहे. कवठे विभागीय कार्यालयात कारखान्याच्या वतीने रोहिदास विधाटे हे गटप्रमुख म्हणून उत्कृष्ट कार्य करत असून त्यांच्या सोबतीला संतोष नऱ्हे, नितीन पंचमुख,महेश धुमाळ, दीपक जगताप, बाळासाहेब विरकर, संतोष ढोबळे, भरत ढोबळे इत्यादी कर्मचारी शेतकरीभिमुख कार्य करताना दिसून येत आहेत. तर मागील तीन वर्षांपासून छगन हरिभाऊ चव्हाण हे आपल्याकडील चार ट्रॅक्टर व २४ मजुरांचे सहाय्याने भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने कवठे गटात लावण्यात आलेले ऊस बेणे लागवड असलेल्या शेतकऱ्याच्या शेतातून तोडून बेणे मागणी असलेल्या शेतकऱ्याच्या थेट शेतात व वेळेत पोचवण्याचे काम प्रामाणिकपणे करताना उत्कृष्ट सेवा देताना दिसून येत आहेत. तर सुधारित ऊस बेणे लवकर मिळावे म्हणून नोंदणी करता कवठे गट कार्यालयात मोठी गर्दी होतीना दिसून येत आहे आज शनिवार दि.२२ ला प्रगतशील शेतकरी लक्ष्मण नाना मुखेकर,पांडुरंग भोर, एकनाथ रामभाऊ गावडे, पांडुरंग हिलाळ, बाळासाहेब इचके, सागर मुखेकर व अनेक शेतकरी नोंदणीसाठी उपस्थित होते.

**भीमाशंकर सहकारी साखर कारखाना** : कवठे यमाई गाव शेतीचे मोठे क्षेत्र असलेले गाव असून शेतकऱ्यांनी अधिकाधिक ऊस लागवड करण्याकामी कारखान्याच्या वतीने उपलब्ध होत असलेले सुधारित ऊस बेणे घेऊन नियोजनबद्ध लागवड करावी . तसेच कारखान्याच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ऊस शेती विषयी उपयोगी विविध योजनांचा अधिकाधिक फायदा घ्यावा . **डी . जे . कुरकुटे – शेतकी अधिकारी**

# शहरातील नालेसफाई करावी : क्षीरसागर

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** शहरातील नाले सफाई व संपूर्ण स्वच्छेते बाबत तातडीने कार्यवाही करावी अशा सूचना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांना दिलेल्या निवेदनात दिल्या आहेत. आगामी पावसाळा लक्षात घेता बीड शहरातील सखल भाग व इतर भागातील नाले सफाई ची। कामे तातडीने पूर्ण होणे गरजेचे आहे. शहरात सध्या मोठ्या प्रमाणात जागोजागी कचरा जमा झालेला आहे. पाऊस पडल्यावर जमा झालेला कचरा हा नाल्यात जमा होतो व यामुळे नाल्या मोठ्या प्रमाणात तुंबल्या जातात. त्यामुळे शहरातील सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचते व रस्त्यांवर ही मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होऊन नागरिकांना त्रास होतो. या सर्व बाबी पहता शहरातील कचरा तातडिने हटवून नाल्या साफ करणे आवश्यक आहे. शहराच्या मध्य भागातून बिंदुसरा हि नदी वाहते या नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात झाडी आलेली आहे. तसेच अनेक ठिकाणचा कचरा हा नदीच्या पात्रात अडकतो व पाणी तुंबल्या जाते अतिवृष्टी झाल्यास नदीचे पाणी शहरात घुसण्याची शक्यता आहे. यापूर्वी काही वर्षांपूर्वी बिंदुसरा नदीला मोठा पूर आलेला होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जिवित व वित्तहानी झालेली होती. तरी या सर्व बाबींचा विचार करता बीड शहरातील नाले सफाई व कचरा हटविण्याचे काम तातडिने पूर्ण करण्यात यावे या करीता नगर परिषद प्रशासक व मुख्यकार्यकारी अधिकारी नगर परिषद, बीड यांना तातडिने कार्यवाही बाबत सूचित करावे अशा सूचना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# माजी खा. लोखंडे यांनी पराभवाचे खापर आदिवासींवर फोडणे अन्यायकारक

आधुनिक केसरी न्यूज


**शिर्डी :** लोकसभा मतदारसंघातील पराभूत उमेदवार माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी माझ्या पराभवाला राम मंदिर व रावणाला मानत असलेल्या आदिवासी समाजातील लोकांमुळे माझा पराभव झाला असं वक्तव्य केल्याने आदिवासी बांधवांच्या भावना दुखावल्या असून दोन वेळेस खासदार झालेले असताना त्यावेळी त्यांना आदिवासी लोकांनी पाळबळ दिलेले आहे याचा त्यांना विसर पडला आहे मात्र यावेळी त्यांचा नसलेला जनसंपर्क व विकास भिमुख नसलेले काम पराभवा साठी जवाबदार असताना केलेले वक्तव्य बेजबाबदार असल्याचा आरोप अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे राहता तालुक्यातील अध्यक्ष संतोष पवार व एकलव्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय पवार यांनी शिर्डी येथील उपविभागीय कार्यालयात दिलेल्या निवेदनात केले आहे. खासदार सदाशिव लोखंडे हे शिर्डी लोकसभा मतदारसंघात दहा वर्षे खासदार राहिलेले आहे त्यांच्या विजयामध्ये नेहमीच आदिवासी समाजाने पाठिंबा दिलेला असे असताना या समाजातील बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी दहा वर्षात कुठल्याही प्रकारचे काम न करता केवळ पराभव झाला म्हणून माझ्या पराभवाला रावणाला मानणारे आदिवासी समाजातील लोकांच जबाबदार आहे अशा प्रकारचे वक्तव्य करणे चुकीचे असून रामायणात देखील आदिवासी समाजातील शबरीने दिलेली बोरे प्रमुख रामचंद्रांनी खाल्लेली आहे असे असताना या समाजाबद्दल अशा प्रकारचे वक्तव्य करणे हा आमच्यावर मोठा अन्याय असल्याची भावना यावेळी व्यक्त केली याप्रसंगी रवींद्र बर्डे विशाल बर्डे करन जाधव आकाश गवळी रामचंद्र गोरसे गोरख पवार दत्तू साळुंखे भारत गोधडे अजय जाधव आदीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# इंडियन असोसिएशन ऑफ फिज़िक्स टीचर्स परिषदेच्या अध्यक्षपदी प्रो.डॉ. के. एम. जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** इंडियन असोसिएशन ऑफ फिज़िक्स टीचर्स( IAPT ) मध्यवर्ती कार्यकारी समितीने



नुकत्याच घेतलेल्या बैठकीतमराठवाडा उपविभागीय कार्यकारणीलाSUB-RC 08Fमराठवाडा विभाग या नावाने स्वतंत्र मान्यता देण्यात आली आहे. प्रोफेसर डॉ. के. एम. जाधव यांना यापरिषदेचेअध्यक्ष म्हणून मान्यता देण्यात आली आहे. तसेच डॉ. एस. जे. शुक्ला यांची उपाध्यक्ष पदी, डॉ आर जी विधाते यांची सचिवपदी व डॉ. डी. आर. सपाटे यांची कोषाध्यक्षपदी निवड झाली आहे.

नवीन स्थापन झालेल्या मराठवाडा उपविभागीय परिषदेच्या कार्यकारणीमध्ये डॉ. सूरज देशमुख, डॉ. संगीता शिंदे, डॉ. एस. एम. डोंगरगे, डॉ. आर. व्ही. कठारे, श्री एस. एस. राऊत यांना सदस्य तर सह निवड सदस्य (CO-OPTMEMBERS) म्हणून डॉ. जे. एस. कौंसल्ये व डॉ. सुरेन्द्र मोरे यांनामान्यता देण्यात आली आहे. IAPT बद्दलः इंडियन असोसिएशन ऑफ फिज़िक्स टीचर्स (IAPT) ही भारतातिल भौतिकशास्त्राचे शिक्षण आणि संशोधन वाढवण्यासाठी समर्पित राष्ट्रीय नोंदणीकृत नामांकित संस्थाआहे. ही संस्था भौतिकशास्त्राच्या शिक्षकांना ज्ञानदान वाटून, अध्यापन पद्धती विकसित करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये भौतिकशास्त्राची आवड निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून राष्ट्रीय स्तरावर काम करते. नुतन अध्यक्ष प्रोफेसर डॉ. के. एम. जाधव- आदरणीयप्रोफेसर डॉ. के. एम. जाधव हे एक भौतिकशास्त्रज्ञ आहेत. डॉ जाधव हे MGMविद्यापीठात मानद प्राध्यापक म्हणून व मूलभूत व उपयोजित विज्ञान विभागाचे ते प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. डॉ जाधव यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील भौतिकशास्त्र विभागाचे माजी वरिष्ठ प्राध्यापक आणि विभाग प्रमुख म्हणून त्यांनी भौतिकशास्त्रविषयात उल्लेखनीय योगदान दिले आहे.

डॉ. जाधव यांची कामगिरीः चार पेटंटः त्यांच्या नावीन्यपूर्ण वृत्तीचे उदाहरण म्हणून डॉ. जाधव यांच्या नावावर दोन ऑस्ट्रेलियन व दोन भारतीय मान्यतेचे असे एकूण चार पेटंट आहेत.डॉ के. एम. जाधव यांनी संशोधनात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीच्या आधारेSTANFORDUNIVERSITYने प्रकाशित केलेल्या जगातील टॉप2% वैज्ञानिकामध्ये स्थान मिळवले आहे.डॉ. जाधव यांचे संशोधन कौशल्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये सतत सर्वाधिक अल्पर-डोगर सायंटिफिक इंडेक्स (एडी सायंटिफिक इंडेक्स) मिळवून आघाडीवर आहेत. मराठवाड्यात सर्वाधिक CITATIONSव एच-इंडेक्स असणारे ते एकमेव शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मारठवड्यातील 50 हून आधिक संशोधक विद्यार्थ्यांना PH.D. ची पदवी प्राप्त झाली आहे. अनेक आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदेचे त्यांनी यशस्वीरित्या आयोजन केले. तसेच मारठवड्यातील विविध महाविद्याना कार्यशाळा, परिषदा इत्यादि आयोजन करणाच्या दृष्टीने मार्गदर्शन व मदत केली आहे.त्यांनी अनेक परिषदांमद्धे व्याख्याने सुद्धा दिली आहेत. मारठवड्यातील गोर-गरीब विद्यार्थ्यांना, पाध्यापकांना सतत मार्गदर्शन व प्रोत्साहन आसते. त्यांचे ३५० अधिक संशोधन लेख आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय दर्जा च्या संशोधन नियातकालिकांमधे प्रकाशित झालेले आहेत. भविष्यासाठी दृष्टीकोन IAPTच्या मराठवाडा विभागीय अध्यक्ष म्हणून डॉ. जाधव यांचे भौतिकशास्त्राच्या मूलभूत आणि प्रगत ज्ञानाचा विस्तार व्यापक समाजात करण्याचा आहे. त्यांचा उद्देश म्हणजे सैद्धांतिक भौतिकशास्त्र आणि त्याच्या प्रत्यक्ष अनुप्रयोगांमधील दरी दूर करणे हा आहे. मूलभूत विज्ञानविषयी विद्यार्थ्यंना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येते. त्यासाठी मारठवड्यातील सर्व भौतिकशास्त्र प्राध्यापकांची लवकरच कार्यशाळा घेन्यात येणार आहे. डॉ. जाधव यांची IAPTच्या मराठवाडा विभागीय अध्यक्ष म्हणून व कार्यकारणीच्या इतर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे शिक्षण क्षेत्रातील सर्व स्तरांवरून त्यांचे कौतुक होत आहे.

# विठू माऊलीच्या गजरात कंधारवरून दिंडीचे २९ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान !

## संत साधू महाराज संस्थानची ७०० वर्षांची परंपरा

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** श्री संत साधू महाराज खंदारकर संस्थान यांची ७०० वर्षापासून पंढरपूराकडे पायी जाणारी दिंडी याही वर्षी संस्थानचे आठवे वंशज मठाधिपती गुरुवर्य ह.भ.प.एकनाथ महाराज साधू यांच्या नेतृत्वाखाली टाळ-मृदुंगाच्या निनादात व विठोबा -रूक्माईच्या गजरात दि.२९ जुन रोजी पंढरपूराकडे रवाना होणार आहे. साधू महाराज संस्थानातर्फे ७०० वर्षापूर्वी वंशज देशपांडे हे आपल्या ठराविक वारकऱ्यांच्या उपस्थितीत पंढरपूर यात्रा करायचे. त्यावेळी ना फोन ना दुरध्वनी ना वाहतुकीची साधने त्यामुळे सोबतचे वारकरी परत येतील की नाही,हा भरवसा नसतांनाही ही वारी खंडीत पडली नाही. तेव्हाच लावलेल हे रोपट आज वटवृक्षासारख फोफावलं आहे.

आज दोनशे-अडीचशे वारकरी घेऊन निघणारी हि दिंडी पंढरपूरात पोंहचते तेव्हा पंचेविस हजार पर्यंत पोहचते. मराठवाडयातील पहिल्या क्रमांकाची दिंडी म्हणून मानाची दिंडी समजली जाते.प्रतिदिन २०-२५ किलोमीटरवरचे अंतर पायी चालून दिंडी एकादशीच्या दिवशी पंढरपूरात दाखल होते.

पायी दिंडीस जागोजागीचहा पाणी,नास्ता,जेवण,आरामाची सोय केली जाते. दरवर्षी प्रमाणे यंदाही संस्थानचे आठवे वंशज मठाधिपती श्री ह.भ.प.एकनाथ महाराज साधू यांच्या नेतृत्वाखाली सकाळी बारा वाजता श्री संत साधू महाराज संस्थांन पासून सर्व वंशज मठाधिपतीच्या व देवदेवतांच्या आरती करून मार्गस्थ होणार आहेत, ही दिंडी कंधार, लोहा,माळाकोळी,माळेगाव,सांगवी, अहमदपूर,शिरूर,चापोली,चाकुर, घरणी,भातखेडा, लातुर, साकरा, बोरगाव, मुरूड,ढवळाला, तडवळे, येडसी, घारी, जामगाव, बार्शी, म्हैसगाव, कुर्डूवाडी, कुर्मदास, आरण, आष्टी, आढीव, पंढरपूर अशी मार्गस्थ होणार आहे. हि दिंडी ज्येष्ठ कृ.८ दि.२९ जुनला निघून पंढरपूरात आषाढ शुद्ध.आष्टमी ८ दि.१४ जुलै रोजी पंढरपूरात पोहचणार आहे.२९ जुनला सकाळी १२ वाजता मठ संस्थान कंधार येथून निघणाऱ्या दिंडीत सहभागी व्हायचे आहे,त्यांनी संपर्क प्रमुख माने साहेब ९८२३१७७०९६,मारोती येईलवाड ९८१४९०१०७१३,एकनाथ गोठमवाड ८४२१२००२३०,अरूण येईलवाड ९१४६१३०६१९ ,श्रीराम येईलवाड ९४२३६५६८१७,श्रीराम करेवाड ८३२९२६९४३२, संदीप महाराज आलेगांवकर ९४०३३८८९८७ह्याशांशी संपर्क साधावा.दिंडीत सामील होण्यासाठी आपले आधार कार्ड घेऊन येऊन नोंदणी करुन ओळख पत्र प्राप्त करावे असे आवाहन ज्ञानेश्वर साधू महाराज यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले.

गावकऱ्यांकडून व्यवस्था : प्रत्येक दिवशी सुरू होणाऱ्या पायी प्रवासात वारकऱ्यांची चहा,पाणी, नाश्ता,जेवणाची व्यवस्था दरम्यान असलेल्या गावातील भक्तांतर्फे होते . रात्रीचे कीर्तन होते .रात्रीचा मुक्काम झाला,त्या गावचे वारकरी या दिंडीत सहभागी होतात,व पुढे दिंडी मार्गस्थ होते .





# देऊळगाव राजा येथे शाहू महाराज युवाशक्ती करिअर मार्गदर्शन शिबिर उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सिंदखेड राजा आणि देऊळगाव राजा यांचे संयुक्त विद्यमाने शासकीय औद्योगिक प्र संस्था देऊळगांव राजा कार्यशाळा क्र २ गुरुवार १९ जून रोजी छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करीयर मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीराचे उदघाटन तसेच संस्थेतील ओपन जिमचे उद्घाटन उपविभागीय महसूल अधिकारी संजय खडसे याचे हस्ते व प्रमुख मान्यवराच्या उपस्थितीत संपन्न झाले.

शिबाराचे प्रास्ताविक गिरीश वाईकर यांनी केले. सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री खडसे, श्री वसंतराव पालवे (स्वीय सहाय्यक ) मा मंत्री मंगलप्रसादजी लोढा,कौशल्य विकास उद्योजकता रोजगार व नाविन्यता विभाग व्हि.एस जमधडे माजी प्राचार्य तथा आयएमसी सदस्य देXराजा तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री विवेक मनियार उद्योजक तथा आयएम सी चेअरमन देऊळगाव राजा,श्री महेश माळी संचालक जयहिंद ॲकेडमी करिअर मार्गदर्शक,तसेच नागेश टेकाळे शाखा व्यवस्थापक स्टेट बँक ऑफ इंडिया दे.राजा उपस्थित होते. याप्रसंगी श्री.मनियार उद्योजक यांनी यशस्वी उद्योजक तयार होणे करिता लागणारी कौशल्य व विविध रोजगाराच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले. माळी यांनी व्यक्तीमत्व विकास विविध करियर संबंधी मार्गदर्शन केले तर नागेश टेकाळे यांनी बँकेतील कर्ज लोन सुविधा उपलब्ध शिष्यवृत्ती या विषयी मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमास पंचक्रोशीतील विद्यार्थी ३५० प्रशिक्षणार्थी पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन एम सी पटेकर व उद्धव मांटे यांनी केले तर आभार प्रदर्शन शुभांगी गांगुर्डे यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मा प्राचार्य गणेश भावले प्र प्राचार्य शिवानंद नागरे तसेच सर्व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर